
## नवे संस्थानिक !
## एक केंद्रीय मंत्री : वार्षिक उत्पन्न साडेचार लाख.

शनिवार, १२ सप्टेंबर १९७०                                    चाळीस पैसे

# मार्मिक



शनिवार, १२ सप्टेंबर १९७०

# माणूस


| | | |
|---|---|---|
| वर्ष : दहावे | संपादक | सहाय्यक |
| अंक : सतरावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर |
| | | सौ. निर्मला पुरंदरे |

| | | |
|---|---|---|
| किमत | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| चाळीस पैसे | तीस रुपये | साठ रुपये |


## सप्रेम नमस्कार....

□ आपले २६–८–७० चे अंकात, पान ४५ वर 'वसई–सर्वार्थाने विषम सामना' हा मथळा चुकला आहे. वसईचे ऐवजी असई पाहिजे.

जगज्जेत्या नेपोलियनला वाटर्लूचे रणांगणावर हात दाखविणारा लॉर्ड वेलिंग्टन हाच असईचे लढाईत दौलतराव शिंद्यांसमोर लढाईला उभा होता. तेव्हा सर्वार्थाने विषम सामना ही शब्दयोजना ठीकच आहे. या लढाईत तो लॉर्ड नव्हता. साधा जनरल वेल्स्ली होता.

१ सप्टेंबर, १९७० — द. र. पटवर्धन, कल्याण.

□ पंधरा ऑगस्टचा विशेषांक फारच चांगला आहे. मांडवी वाहुं दे पुन्हा खळाळून हा सु. ल. सोमण यानी लिहिलेला लेख गोव्यांतील राजकीय घडामोडीवर प्रकाश टाकणारा आहे.

१७ ऑगस्ट, १९७० — डॉ. महादेव विनायक मांद्रेकर

द्विसाप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक

# नवे संस्थानिक

समाजवादाच्या गप्पा करणं ही अलीकडे फॅशनच झाली आहे. ज्यांचा दूरान्वयानेही समाजवादाशी संबंध नाही अशी मंडळीही समाजवादासंबंधी त्यांना असलेली आस्था (?) दाखवितात. त्यांचं एक राहू द्या. पण समाजवादाचं कंकण हाती बांधलेल्या आमच्या सरकारचे मंत्री तरी किती प्रमाणात समाजवादी आहेत ? की फक्त भरल्यापोटी ही मंडळी 'जनते'ला समाजवादाची महती ऐकवित असतात ?

दिनांक १४ ऑगस्ट रोजी स्वतंत्र पक्षाने 'दि टाइम्स ऑफ इंडिया'त एक जाहिरात दिली होती. पूर्ण कॉलमभर असलेल्या या जाहिरातीत एक गलेलठ्ठ माणूस दाखविलेला असून हा माणूस कोण आहे असा प्रश्न विचारून त्याच्यासंबंधी पुढील माहिती देऊन शेवटी तो कोण आहे याचा (गौप्य) स्फोट केला आहे. या व्यक्तीचं वार्षिक उत्पन्न ४ लाख ४८ हजारांबरोबर आहे. सामान्य भारतीय माणसाच्या ८४८ पट किंवा एखाद्या बड्या कंपनीच्या अत्यंत बड्या अधिकाऱ्याच्या २॥ पट एवढं उत्पन्न आहे. हे महाशय आहेत केंद्रीय मंत्री. वरील माहिती ४ मे रोजी स्वतंत्र पक्षीय खासदार श्री. नारायणराव दांडेकर (पूर्वी ते इन्कमटॅक्स कमिशनर होते) यांनी लोकसभेत सादर केली आणि अजूनपर्यंत ती कोणी खोडून काढलेली नाही. खासदार श्री. मधू लिमये यांच्या मते ही आकडेवारी यापेक्षा अधिक असावी. हे झालं स्वतंत्रपक्षाच्या जाहिरातीबद्दल, पण अलीकडेच 'युनायटेड न्यूज ऑफ इंडिया' या वृत्तसंस्थेने मंत्र्यांची संख्या व त्यांच्यासाठी होणारा खर्च याचा एक पहाणी अभ्यास पूर्ण केला असून या पहाणीत यासंबंधी बाहेर आलेली आकडेवारी हेच दाखविते की मंत्र्यांवरील खर्च दिवसेंदिवस सारखा वाढतच चालला आहे.

जम्मू काश्मीर व केंद्रशासित प्रदेश वगळून (कारण त्यांच्यासंबंधी ही माहिती उपलब्ध होऊ शकली नाही) केंद्र व राज्य सरकारांच्या मंत्र्यांवरील गेल्या दहा वर्षांतील खर्च किती वाढला हे आकडेवारीने यू. एन्. आय. ने स्पष्ट केलं आहे.

सन १९६१ मध्ये देशातील मंत्र्यांची संख्या २९४ होती तर आज (१९७०–७१) ती ४५५ झाली आहे. याचाच अर्थ मंत्र्यांची संख्या दुपटीपेक्षा कमी आहे पण तरीही त्यांच्यावर होणारा खर्च मात्र दुप्पटीहून अधिक झाला आहे.

मंत्र्यांचा पगार, राहाणी, प्रवास व इतर सर्व खर्च गेल्या दहा वर्षात १ कोटी २ लक्षांवरून २ कोटी ७० लक्षांवर गेला आहे.

तामिळनाडूमध्ये डा. एम्. के. सरकार सत्तेवर आलं व त्या सरकारच्या मंत्र्यांनी स्वखुशीने पगारात दरमहा ५०० रु. कपात केली पण त्यांच्या इतर खर्चात कपात झाल्याचं दिसत नाही.

केंद्रीय मंत्रिमंडळात आज ५६ मंत्री आहेत. ६१ साली ही संख्या पाच संसदीय

सचीवांसहित ४७ होती. त्यावेळी त्यांचा पगार, भत्ते व प्रवास यासाठी १९ लाख ३९ हजार ४ शे रुपयांची तरतूद होती. (यापैकी प्रवासासाठी ७ लक्ष रु. होते.) आज ही तरतूद ३० लाख रुपये असून प्रवासासाठी १४ लक्ष ४० हजार एवढी रक्कम खर्च होईल.

पहाणीत आढळून आलेला एक महत्त्वाचा मुद्दा हा की मंत्र्यांच्या प्रवासखर्चात खूपच वाढ झाली आहे.

आंध्र प्रदेशातील प्रत्येक मंत्र्यावर ६१ साली ५१ हजार ५६६ रु. एवढा खर्च होत होता. ७० साली हाच आकडा ७८ हजार १६८ रु. इतका वर गेला आहे.

१९६१ साली पंजाबचाच भाग असलेल्या व आता भाषिक राज्य झालेल्या हरियाणात आज १४ मंत्री व ५ संसदीय सचीव आहेत. त्यांच्या पगारासाठी ४ लक्ष ५८ हजारांची तरतूद आहे. (यात प्रवास व इतर भत्त्यांचा समावेश नाही). जुन्या पंजाब राज्यात १८ मंत्री होते व त्यांचा पगार व भत्ते यासाठी ४ लक्ष ५० हजारांचा तिजोरीवर भार होता.

उत्तर प्रदेश हे देशातील सर्वात मोठं राज्य. अर्थातच राज्याचं मंत्रिमंडळही तितकंच वजनदार. आज या राज्याच्या मंत्र्यांची संख्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आसपास म्हणजे ४६ आहे. म्हणजेच केंद्रीय मंत्रिमंडळापेक्षा ही संख्या फक्त दहाने कमी. ६०–६१ साली ही संख्या २२ होती व खर्च होता ५ लक्ष ८२ हजार ५ शे रुपये. त्यात दुपटीनं वाढ होऊन आता हा खर्च १० लक्ष ७ हजार २ शे रु. एवढा झाला आहे.

तामिळनाडूचे डी. एम. के. चे मंत्री हजार ऐवजी पाचशे रु. पगार घेतात व त्यासाठी १० लक्ष ५७ हजार रुपयांची तरतूद आहे; पण दहा वर्षांपूर्वीचे मंत्री (काँग्रेसचे) हजार रुपये पगार घेऊनही हा खर्च ४ लक्ष २७ हजार एवढाच होता. यावर अधिक भाष्य करण्याची गरजच नाही.

म्हैसूर राज्याने तर याबाबत ताणच केली आहे. मंत्र्यांवरील खर्च तेथे जवळ जवळ ७ पटीनं वाढला आहे. हा खर्च ४ लक्ष ११ हजारांवरून आज २८ लक्ष ५० हजारांपर्यंत गेला आहे.

आपलं महाराष्ट्र राज्यही याबाबतीत मागे नाही. (मात्र राज्यसरकारकडे स्वतःच्या कर्मचाऱ्यांना पगारवाढ देण्यासाठी पैसा नसतो). गेल्या दहा वर्षात मंत्रिमंडळात फक्त चार मंत्र्यांचीच भर पडली आहे; पण मंत्र्यांवरील खर्च मात्र दुप्पटीनं वाढला आहे, आणि इतर भत्ते, तारा, पत्रव्यवहार आदिवरील खर्च तर तिप्पट झाला आहे. दहावर्षांपूर्वी अर्थसंकल्पात मंत्र्यांवरील खर्चासाठी २ लक्ष ८८ हजारांची तरतूद होती तर आज हाच आकडा आहे ५ लक्ष ३ हजार. या साली प्रवासभत्ता म्हणून सरकार १२ लक्ष ५५ हजार रु. खर्च करू इच्छितं. ६०–६१ साली प्रवासभत्ता म्हणून ४ लक्ष १६ हजार रुपये खर्च झाले.

आकस्मिक उद्भवणाऱ्या खर्चासाठी व तारा, पत्रव्यवहार आदीसांठी यावर्षी २ लक्ष ५ हजार रुपये खर्च होतील. तर मंत्र्यांचे व्यक्तिगत नोकरचाकर व सुख-सोयींसाठी होणारा खर्च दहा वर्षात रु. ३ लक्ष १६ हजारांवरून ९ लक्ष ३६ हजार एवढा वाढला आहे.

इतरही राज्यांची थोड्याफार प्रमाणात हीच अवस्था आहे. समाजवादी समाज-रचनेसाठी हे सर्व आवश्यकच आहे, नाही का ? ◻

# रेशनिंगच्या रांगा

रांगा ! रांगा !! रांगा !!! वैताग आणतात ना ह्या रांगा ? बससाठी रांग, सिनेमासाठी रांग. कशासाठी रांग लावावी लागत नाही ? बाकी सर्व राहू देत पण पंधरवड्याचा शिधा मिळविण्यासाठी रांग लागावी लागते याचा बहुतेकांना खूप खूप कंटाळा येत असेल. महिला वर्ग तर अगदी त्रस्तच झाला असण्याची शक्यता आहे. धान्यांच्या दुकानासमोर रांगा लावून. पण हे आता नेहमीचंच झाल्यानं सर्वांनाच अंगवळणी पडू लागलं आहे. आता ही सवय लागून सहनशीलताही अंगी बाणू लागली आहे आपल्या.

आपण तसे खूपसे त्यागी असतो बुवा. राष्ट्रीय आपत्ती वा संकटाला तोंड देण्या-साठी आपण केव्हांही सज्ज असतो. कारण अंती ते आपल्याच हिताचं असतं. आता हेच पहाना. देशातील अन्नधान्य परिस्थिती बिकट होताच अन्नधान्याच्या व्यापारावर नियंत्रण येऊन सरकारमान्य दुकानातून शिधावाटप पद्धती सुरू झाली. थोडीफार कुर-कुर करून आपण ही परिस्थिती स्वीकारली; पण ‘ हरित क्रान्ती ’ची नौबत वाजत असतांनाही मुंबईत शिधावाटप पद्धती का असा आज अनेक मंडळी प्रश्न विचारीत असतात. काही दिवसांपूर्वी सत्तारूढ कॉंग्रेसतर्फे महिलांचा मोर्चा शिधावाटपपद्धती रद्द करण्याच्या घोषणा करीत गेल्याचं अनेकांनी पाहिलं असेल. ९ मार्च रोजी जनसंघानेही विधानसभेवर मोर्चा नेऊन ५ लाख संख्येचा अर्ज सरकारला सादर केला. उद्देश तोच–शिधावाटपावरील बंधनं उठविणे. गेल्या महिन्यात तर स्वतंत्र पक्ष व जनसंघानं एका अभिनव मार्गानं या प्रश्नाकडं अनेकांचं लक्ष वेधलं. हा मार्ग होता १ रु. किलो भावानं तांदूळ व ९० पैसे किलो भावानं गहू त्यांनी सरकारी बंदी-हुकूम मोडून जाहीररीत्या विकला. म्हणजे एकूण शिधावाटपावरील बंधनं रद्द करण्याबाबत निरनिराळी मंडळी निरनिराळ्या प्रकारे जनमत तयार करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

ही पद्धती रद्द करा असं ज्या मंडळींचं म्हणणं आहे त्यांचा याबाबत दावा असा की ‘ हरित क्रान्ती ’मुळे आपली अन्नधान्य परिस्थिती सुधारली आहे एवढंच नव्हे

तर पुणे, नागपूर, सोलापूर इत्यादि शहरांतील रेशनिंग उठलं आहे. मुंबईच्या आसपासच्या उपनगरांतून काळ्याबाजारात चांगला तांदूळ उपलब्ध असतो. अनेक लोक टिटवाळ्याला श्रीगजाननाचं दर्शन घ्यायला जाण्यापेक्षा तेथे मिळणारा तांदूळ आणावयास जातात. राष्ट्रीय वृत्तीनं लोकांनी रेशनिंग पत्करलं तेव्हा वर्षन् वर्षे लोकांनी किती रांगेत उभं रहायचं? मुंबईत राजरोसपणे बेकायदेशीररीत्या तांदूळ व गहू येत असतो एवढंच नव्हे तर आरोग्यास घातक अशा प्रकारे हे धान्य येत असतं. हजारो अस्वच्छ लोक लोकल गाड्यांतील बाकाखालून गहू व तांदूळ आणीत असतात. सरकार एकाधिकार पद्धतीनं धान्य खरेदी करतं तर मग हा गहू व तांदूळ येतो कसा? शिधावाटपामुळे मिळणारं धान्य अपुरं, अनियमित व निष्कृष्ट असतं. त्यात खूप कचरा, लोखंडाचे तुकडे वगैरे गोष्टी असतात. रांगांमध्ये लोकांना वेळ घालवावा लागतो. लोकांच्या तक्रारींची शिधावाटप खात्याकडून योग्य ती दखल घेतली जात नाही. अनेक गरीब झोपडपट्टीवाल्या मंडळींकडे कार्डस् नसतात व कार्डं काढताना त्यांना भलताच त्रास होतो. वेळी प्रसंगी त्यांचा रोजगार बुडतो व येथेच लाचलुचपतीला वाव मिळतो. नियंत्रण म्हणजे काळाबाजार व टंचाईला उत्तेजन होय. शिवाय केंद्रसरकारच्या देशातील एकूण कराच्या रक्कमेच्या २३ टक्के इतकी रक्कम एकट्या मुंबईतून जाते. असं असताना मुंबईच्या नागरिकाला शिधावाटपात मिळणारं वाईट अन्न का? शिधावाटपावरील बंधन रद्द करणं म्हणजे ती यंत्रणाच रद्द करावी असं या लोकांना वाटत नाही. किंबहुना सरकारमान्य स्वस्त धान्याची दुकानं चालूच रहावीत अशीही त्यांची मागणी आहे.

तर धान्यनियंत्रण रद्द करू नये असं म्हणणाऱ्यांना असं वाटतं की एकदा का नियंत्रण उठविलं की व्यापारी त्याचा फायदा घेतील व पुन्हा भाववाढीलाच याची मदत होईल. भाव अधिक मिळतो म्हणून शेतकरीही आपल्याजवळील सर्व धान्य विकेल म्हणजे पुन्हा बिचाऱ्या शेतकऱ्यावर स्वतःसाठी चढत्या भावानं तांदूळ वा गहू विकत घेण्याची पाळी येईल. शिधावाटप पद्धतीमुळे आज प्रत्येकाला प्रत्येक पंधरवड्याला ठराविक धान्य मिळण्याची शाश्वती आहे. ही शाश्वती धान्यावरील बंधनं उठल्यास कशी राहील? आवश्यक त्या अन्नधान्याची साठेबाजी होऊन काळ्याबाजाराला ऊत येईल. आज देशात असे काही व्यापारी आहेत की देशातील सर्व तांदूळ एका दिवसात खरेदी करण्याची त्यांच्यात कुवत आहे. तेव्हा या व्यापारी-मंडळींचा काय भरवसा द्यावा?

आपला भगिनीवर्ग या रांगात उभा रहातो व घरी आल्यावर त्यांच्याच माथ्यावर तर निवडणं, पाखडणं करण्याची पाळी येते. रांगेत उभ्या असलेल्या या भगिनींना याबाबत प्रश्न विचारले की त्याही संतापतात. हा संताप रांगेत उभं रहाण्याबद्दलचा नसतो तर तो असतो धान्यात मिळणाऱ्या प्रचंड घाणीबद्दल. त्यांचं म्हणणं आम्हाला दुसरी काही कामं नाहीत असं सरकारला वाटतं म्हणून निवडणं वगैरे

करण्याची, पर्यायाने अनेक तास फुकट घालविण्याची ही अशी कामगिरी सरकार आमच्यावर लादीत आहे काय ? गहू—तांदुळात किती घाण असते ते आम्हालाच माहिती.'

'रवा तर लोहयुक्तच असतो म्हणजे सरकार आम्हाला एक व्हिटॅमिन विनामूल्य देतं, असं म्हणायला हरकत नाही' — एका महिलेची प्रतिक्रिया.

'सणासुदीलाच लाल गहू व जाडाभरडा घाणेरडा तांदूळ आम्हाला पुरवायची सरकारला कशी बुद्धी सुचते कोण जाणे.' दुसरी एक महिला.

'व्यापारी वजनात लफंगेगिरी करतात.' अशी एकीची तक्रार होती.

रांगेत उभ्या असलेल्या एका साधारण वयस्कर महिलेनं तर अत्यंत संतापानं मला प्रश्न विचारला, 'मंत्र्यांनाही असंच घाणेरडं धान्य मिळतं का ?'

अर्थातच रांगेत उभ्या असलेल्या काही बायका—पुरुषांनी रेशनिंग उठविणं योग्य होईल असं मत दिलं तर काहींना भाववाढीचं भय वाटल्यानं त्यापेक्षा असलेली पद्धतीच बरी असं वाटलं.

दुकानदारांचाही रोष सरकारवरच. त्यांपैकी सर्वांचंच एकमत पडलं की धान्यात घाण फारच असते. परिणामी लोकांच्या शिव्या मात्र त्यांना खाव्या लागतात. सरकारनं स्वतःच धान्य चाळण्याचे अधिक कष्ट घ्यावेत व हवं असल्यास तो खर्च थोडी भाववाढ करून काढून घ्यावा अथवा दुकानदारांना नाममात्र भाववाढ करून घेण्याची मुभा देऊन त्यांच्याकडेच साफसफाईचं काम सोपवावं. दुसऱ्या तक्रारी म्हणजे एकाच वेळी एकाच विभागातील निरनिराळ्या दुकानात निरनिराळ्या प्रकारचा गहू वा तांदूळ येतो. कमसेकम त्या सर्व दुकानांना एकसारखा माल मिळावा. याबाबतीत दुकानादुकानात भेदभाव का ? धान्य खराब आल्यास ७२ तासात त्यासंबंधी तक्रार करता येते हे जरी खरं असलं तरी दुकानदार हा खटाटोप करायला तयार नसतात, कारण तक्रारीची दखल घेतली जाईपर्यंत खूप काळ जातो व ती पोती परत करण्याची हमाली काही सरकार देत नाही.

एका दुकानदाराने समव्यावसायिकाबद्दलचा हा अनुभव सांगितला.

'सरकारी यंत्रणेतील लोकांना पैसे चारावे लागत असल्याने त्याला तो तोटा भरून काढण्यासाठी वजनात लबाडी करावी लागते वा तसाच अन्य मार्ग अवलंबावा लागतो.'

बनावट कार्डासंबंधी एका व्यापाऱ्यास प्रश्न विचारताच त्याने उलट प्रश्न केला, 'कोण देतं ही बनावट कार्डस् — व्यापारी की सरकारी यंत्रणेतील हितसंबंधी लोक ?'

हो ! बरी आठवण झाली बनावट कार्डाच्या निमित्तानं. साधारणपणे १० टक्के कार्डस् बनावट असतात. आज मुंबईत एकूण १४, २३, ९०८ कार्डस् आहेत. (१२, २६, ६०९ कायम कार्डस् व १, १७, २९९ तात्पुरती कार्डस्) तर या कार्डांवर ज्यांना शिधा मिळतो त्यांची एकूण संख्या आहे ६०, २२, ००९ इतकी.

दुसरीही काही मजेदार आकडेवारी आपलं निश्चितच मनोरंजन करील. आपण

मुंबईकर मंडळी राक्षस आहोत राक्षस — ६० लाख मुंबईकरांना प्रत्येक दिवशी ५३५ टन तांदूळ, १ हजार टन गहू आणि ३१६ टन साखर लागते. मुंबईसाठी तांदळावर दरसाल २४ कोटी तर गहू आणि साखरेवर अनुक्रमे ३८ कोटी व १ कोटी ५ लक्ष एवढा प्रचंड खर्च केला जातो. म्हणजे मुंबई महापालिकेच्या वार्षिक अंदाजपत्रकाच्या (४० कोटी) दीड पट हा खर्च आहे. मुंबईतील शिधा वाटपाचं काम १२०६ खाजगी दुकानदार, २८८ सहकारी दुकानदार व ८९ निरनिराळ्या कंपन्यातील ग्राहक मंडळीकडून होतं. प्रत्येक दुकानात साधारणपणे १०० कार्डस् असतात व एक दुकान साधारणपणे ४ हजार लोकांना शिधा देण्याचं काम करतं.

सरकार शिधावाटपासाठी अन्नधान्याच्या दर क्विंटलमागे ११ रु. खर्च करतं तर साखरेच्या दर क्विंटलमागे १२॥ रु. खर्च करतं. साधारणपणे सरकार शिधा-वाटपासाठी दर माणशी प्रत्येक दिवसाला सुमारे १२ रुपये खर्च करतं.

शिधावाटपाबाबत एकूण दोन विभाग आहेत. एक महाराष्ट्र विभाग — (या विभागात गव्हावर नियंत्रण आहे.) व दुसरा मुंबई विभाग (येथे तांदळाच्या हालचालीवर नियंत्रण आहे)

मुंबईचा विचार करता मुंबईत तांदळाची चणचण आहे २ लाख टनांची. महाराष्ट्रात एकूण १४ लाख टन तांदूळ पिकतो व महाराष्ट्रातील तांदळाचा खप आहे १२ लाख टन. म्हणजे यात गंमत अशी आहे, की २ लाख टन तांदूळ (ज्याला मार्केटेबल सरप्लस म्हणतात) महाराष्ट्रातच उपलब्ध आहे व मुंबईची गरजही तेवढीच आहे.

सरकारची या प्रश्नाबाबतची भूमिका व लोकांच्या आक्षेपांना उत्तरं अशी आहेत—

जोपर्यंत केंद्र सरकार धान्यविभाग रद्द करीत नाही किंवा मुंबईला लागणारे धान्य पुरविण्याची हमी देत नाही तोपर्यंत रेशनिंग उठविणं अशक्य आहे. शिवाय रेशनिंग उठवायचं म्हटल्यास या विभागात काम करणाऱ्या ३ हजार २०७ कर्मचाऱ्यांचा प्रश्न समाधानकारकरीत्या सोडविणं आवश्यक आहे. त्यामुळे याबाबत क्रमाक्रमानं व योग्य ते निर्णय घेणं आवश्यक आहे. शिवाय छोट्या शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला योग्य तो भाव मिळवून देण्याबरोबरच त्यांना इतर धान्य स्वस्त किमतीत उपलब्ध करून देणंही आवश्यक आहे.

सरकारपुढेही अनेक अडचणी असतात असाही सरकारी पक्षाचा दावा. पहिलं म्हणजे वाहतुकीच्या सोई कमी. केंद्रसरकार 'फूड कार्पोरेशन ऑफ इंडिया'तर्फे देशातील अन्नधान्य वाटप करतं. त्यांच्याकडून जसा माल येतो तसा घेणं सरकारला भाग पडतं. एकाधिकार पद्धतीत धान्य खरेदी करूनही महाराष्ट्र हे तुटीचंच राज्य रहातं. त्यामुळे वरील कॉर्पोरेशनवर अवलंबून रहावं लागतं. एकाधिकारपद्धतीनं खरेदी करताना शेतकरी चांगलं धान्य स्वतःकडे ठेवून घाणेरडं धान्य सरकारजमा

पृष्ठ ६४ वर



अरुण गोसावी

# घसरगुंडी

सध्या आंतरराष्ट्रीय राजकारणात हिंदुस्थानचा जसा अगदी ढांग नंबर लागतो तसाच भारतीय राजकारणात महाराष्ट्राचा. का कुणास ठाऊक, पण गेल्या एक दोन वर्षांत महाराष्ट्राचा नंबर जो एकदम खाली घसरला आहे तो एकदम तळालाच टेकला आहे. मराठी माणसाला आता दिल्लीत पूर्वीसारखा भाव नाही.

पूर्वी महाराष्ट्राचा केवढा दबदबा होता ! टाकलेला शब्द खाली पडत नसे. पूर्वी म्हणजे नेहरू–शास्त्रींच्या काळात. सुरुवातीला इंदिराबाईंच्याही काळात महाराष्ट्राची शान होती. पण आता सारे बदलले आहे. महाराष्ट्र म्हटले की दिल्लीवाले गप्प बसतात, फाईल बाजूला ठेवतात किंवा फार सौजन्यशील असतील तर सहानुभूतीने हसतात. काही कुत्सितपणे. सारेच बदलले आहे.

महाराष्ट्राला खरा भाव होता शास्त्रीजींच्या काळात. अमुक कारखाना पाहिजे. आला. तमुक पाहिजे. तोही आला. शब्द नुसता उच्चारायचा अवकाश तो झेलला जात असे. पण आता सारे विचित्र झाले आहे. महाराष्ट्राला नीट कुणी विचारीत नाही अशी भावना झाली आहे मोठे मोठे कारखाने सोडाच पण छोटे–छोटे प्रकल्प-देखील या राज्यात येण्यासाठी कसरत करावी लागते. वास्तविक पाहता कारखान्यां-साठी महाराष्ट्रात किती सोयी-सवलती आहेत. कोणत्याही समाजवादी सरकारला लाज वाटेल एवढ्या सोयी इथे कारखानदारांना मिळतात. म्हणून खासगी कारखाने येतात. पण सार्वजनिक क्षेत्र ? नाव नको. इतर राज्यात ज्या सोयी सवलती मिळा-यला तीन-चार वर्षे लागतात त्या इथे एक आठवड्याच्या आत मिळतात. मग असं का ?

महाराष्ट्राच्या कितीतरी पाटबंधाऱ्याच्या योजना, सहकारी प्रकल्प, साखर कारखाने मंजुरीसाठी दिल्लीला पडून आहेत. सार्वजनिक क्षेत्रात निघणाऱ्या कितीतरी कारखान्यांसाठी महाराष्ट्राने मागणी केली आहे. पण दिल्लीहून एक नाही न् दोन नाही.

सोयी सवलती द्यायला महाराष्ट्र सरकार किती झटत असतं याचं उत्तम उदाहरण म्हणजे मुंबईच्या इंटरनॅशनल बिझनेस मशीन्स या सुप्रसिद्ध कंपनीचा कारखाना ! कारखाना वाढवायचा असल्याने तो बंगलोरला हलविण्याचा विचार कंपनीने केला. लगेच महाराष्ट्र सरकारची धावपळ सुरू झाली. कारखाना हलवताहेत म्हटल्याबरोबर सगळी चक्रे हलू लागली. अमुक सवलती घ्या, तमुक घ्या. दिल्लीला संदेश. शेवटी दिल्लीहून आदेश आला. महाराष्ट्रातच वाढीसाठी योग्य त्या सवलती मिळत असतील तर कारखाना बंगलोरला हलविण्यात येऊ नये. विस्तारासाठी कारखान्याला मुंबईतच जागा हवी आहे आणि मुंबईचे औद्योगिक विकेंद्रीकरण करावे म्हणणारे सरकार ती जागा आता उपलब्ध करून देणार आहे.

असो. तर हा एक बाजूचा मुद्दा. मूळ गोष्ट ही की महाराष्ट्राचे भाव सध्या भलतेच उतरले आहेत. याची राजकीय कारणं अनेक सांगितली जातात. आता ती खरी असतीलच असं म्हणता येत नाही. पण असं बोललं जातं खरं.

संजीव रेड्डीला मोठ्या जोरात मत देणारी महाराष्ट्र काँग्रेस गिरी निवडून येताच एका क्षणात बदलली कशी ? राष्ट्रपतींच्या निवडणुकीतील राजकारणाचे परिणाम महाराष्ट्राला भोवताहेत असे म्हटले जाते. त्या निवडणुकीच्या वेळी सबंध देशाचे तात्पुरते का होईना डावे आणि उजवे असे ध्रुवीकरण झाले होते. अशा आणीबाणीच्या प्रसंगी महाराष्ट्राचा कल उजव्या बाजूला ? यामुळे काँग्रेसमधील डावे गट महाराष्ट्रावर नाराज झाले. इंदिराबाई महाराष्ट्राचा हा अपराध अजून विसरल्या नाहीत. आणि नंतर गिरींचा विजय झाला. इंदिरा-गट शक्तिशाली होतो आहे असे दिसताच सबंध महाराष्ट्र काँग्रेसने प्रचंड कोलांटी उडी मारून इंदिराबाईंना पाठिंबा दिला. म्हणजे महाराष्ट्र काँग्रेसला काही मानपान आहे की नाही ?

त्या कोलांटी उडीमुळे पुन्हा महाराष्ट्राचं प्रेस्टीज घसरलं. यशवंतरावांवरचा विश्वास उडाला. आणि आता गृहखात्यातून उचलबांगडी होऊन अर्थखात्यात यशवंतरावांची बदली झाली. तेव्हापासून महाराष्ट्राचे हाल विचारू नका. त्यात भर आणखी सीमा-प्रश्नावरील माकडचेष्टांची. मागच्या अधिवेशनाच्या वेळी. बाहेर बसू, घेराव करू, मतदानात भाग घेणार नाही अशा धमक्या महाराष्ट्र काँग्रेसने दिल्या. त्या सगळ्या फुकट गेल्या. यंव करू त्यंव करू अशा महाराष्ट्र काँग्रेसच्या नुसत्या वल्गना. कृतीत काहीच नाही. कृती काहीही असो, जो माणूस

धडाडीने काहीतरी करतो,–चूक असो बरोबर असो–त्याच्याबद्दल लोकांचा आदर वाढतो. पण महाराष्ट्र काँग्रेसने, म्हणजे खुर्चीबद्ध असलेल्या महाराष्ट्र पुढाऱ्यांनी तेवढीही धमक दाखवली नाही. मग काय! हवाच गेली. महाराष्ट्र म्हणजे नुसता पोकळ फुगा. काही दम नाही असा समज दिल्लीत निर्माण झाला आहे.

ताकद वापरण्याची महाराष्ट्र काँग्रेसला मागे संधी होती. तीही आता निघून गेली. कारण परवाच पार्लमेंटात आपण किती पाठिंबा मिळवू शकतो हे इंदिराबाईंनी माजी नरेशांच्या तनखेबंदी विधेयकावरील मतदानाच्या वेळी दाखवून दिले. त्यांना आता महाराष्ट्र काँग्रेसच्या कुबड्यांची गरज नाही.

असे असतांनाही महाराष्ट्र काँग्रेसची बेळगाव आणि सीमा-प्रश्नावर पुन्हा अशीच निष्क्रिय, दांभिक भूमिका होत राहिली तर तिच्याविषयीचा दिल्लीतील आदर आणखी कमी होईल आणि महाराष्ट्राचा भाव पार तळाला टेकेल. भारतीय राजकारणात महाराष्ट्राचा भाव उतरविण्याचं थोडं श्रेय शिवसेनेलाही द्यायला हरकत नाही. इथे हेही स्पष्ट करायला हवं की शिवसेना केवळ मुंबईपुरतीच मर्यादित असल्याने हे असं होतं. ती जर साऱ्या डी. एम्. के. सारखी महाराष्ट्रभर प्रबळ असती तर असे झाले नसते. उलट महाराष्ट्राचे प्रेस्टीज एकदम वर चढले असते.

तर सध्या हे असे आहे. आठ-दहा वर्षापूर्वीचा काळ असा होता की महाराष्ट्राबाहेर मराठी म्हणून सांगितले की तुमच्याकडे आदराने बघितले जात असे. आज तशी स्थिती आहे का? आज कदाचित कुत्सितपणे हसले तरी जाते किंवा 'ओ! शिवसेना!' अशी सलामी होते. या सलामीमध्ये अपमानासारखे काही नाही. शिवसेनेच्या मर्यादा समजावून सांगितल्या तर बाहेरच्या लोकांना ते पटते. पण काही लोकांना तर यामुळे बाहेर आपण मराठी आहोत हेच सांगण्याची लाज वाटते! असा प्रसंग कधी महाराष्ट्रावर आला होता?

मागच्या आठवड्यात शिवसेनेतर्फे निघालेल्या भारतीय कामगार सेनेने गुमास्ता कामगारांना पाठिंबा देण्यासाठी दादर बंदचा आदेश दिला होता. इंदिरा गांधींनी केंद्रीय गृहखाते हाती घेतल्यानंतरची ही शिवसेनेची पहिली कृती होती. मागोमाग दिल्लीहून संदेश आले. कडक बंदोबस्त ठेवा. कोणताही अनुचित प्रसंग घडता कामा नये. दीड-दोन हजार पोलीस दादरमध्ये बंदोबस्तासाठी ठेवण्यात आले. पोलिसांनी दुकानदारांना सांगितले दुकाने उघडी ठेवा. आम्ही आहोत तुमच्या रक्षणासाठी. हे दृष्य नेहमीपेक्षा वेगळे होते. एरवी शिवसेनेची सभा जर असली तरी पोलिस दुकानदारांना दुकाने बंद ठेवण्याचा सल्ला देत. यावेळेस उलट दिसत होते. भीतीने दुकाने बंद करणाऱ्यांना पोलीस धीर देऊन दुकाने चालू ठेवायला सांगत होते. 'दादर बंद' फसले.

अखेर कामगार सेनेने पत्रक काढून बंदचा आदेश मागे घेतला. कामगार सेनेचे

सरचिटणीस अरुण मेहता म्हणाले, दादर बंद फसला नाहीच मुळी. कारण आम्ही बंद मागे घेतला होता. पोलिसांनी दहशतीचे वातावरण निर्माण केले होते. काही अनुचित प्रकार होऊ नये म्हणून आम्ही आपण होऊनच आंदोलन स्थगित केले. ◻

# त्याग !

महाराष्ट्राचे राजीनामा-फेम मंत्री, गोरगरिबांचे एकमेव कैवारी, लाडके नेते श्री. बाळासाहेब देसाई यांनी परवा एक जाहीर स्पष्टीकरण करून सर्वांना सुखद आश्चर्याचा गोड धक्का दिला. वसईच्या एका समारंभात बोलताना बाळासाहेब म्हणाले, की गरिबांच्या कल्याणासाठी मंत्रिपदाच्या सत्तेचा वापर करता येत नव्हता म्हणून मी सत्तेचा त्याग केला !

थोडे अंतर्मुख होऊन गोरगरिबांचे कैवारी बाळासाहेब म्हणाले की सत्ता म्हणजे जीवन सर्वस्व अशी एक सर्वसाधारण समजूत सर्वत्र पसरली आहे. सत्तेचा वापर गरीब, दीनदुबळ्या जनतेच्या कल्याणासाठी निश्चितपणे करता येतो हे मी अनुभवाने सांगतो. पण मंत्रिपदाच्या सत्तेपेक्षा लोकसत्तेला मी अधिक मानतो. त्यामुळे गरिबांच्या कल्याणासाठी शासनसत्तेचा वापर करण्यास परिस्थिती आड येत आहे अशी खात्री पटली तेव्हाच मी राजीनामा दिला.

अहाहा ! केवढा हा दिव्य त्याग ! बाळासाहेब आपण हे अगोदर का नाही सांगितलेत हो ? कितीतरी जणांनी आपल्याबद्दल घोर गैरसमज करून घेतले होते. म्हणजे तसे आपण आपल्या भाषणांमधून अधूनमधून सूचित करीत होताच. पण एवढे स्पष्टपणे कधीच सांगितले नाहीत. मुंबईहून आपण घाईघाईने दोन अश्रू ढाळून निघून गेलात. कुणाशी धड बोलला नाहीत. नंतरही कुणाजवळ आपले रहस्य प्रकट केले नाहीत. आणि आता ही एवढी महान घोषणा केलीत ती कुठे तर वसईला. रुग्णोपयोगी साधन केंद्राचे उद्‌घाटन यासारख्या एका क्षुद्र समारंभाच्या वेळी. कुणीही तुमच्या स्पष्टीकरणाची फारशी दखल घेतली नाही हो ! राजीनामा देताना सांगितले असते तर बॅनर लाईन्स मिळाल्या असत्या. विधानमंडळात निवेदन केले असते तरी बॅनर मिळाली असती. मुंबईच्या एखाद्या समारंभात बोलला असता तर मोठ्या-छोट्या वृत्तपत्रांनी चांगली दखल घेतली असती.

आपण मुद्दाम तर हे केले नाही ना ? की हाही आणखी एक त्याग म्हणावा. प्रसिद्धीच्या झोतापासून दूर मुद्दामच आपण निवेदन केलेत ? केवढा हा थोरपणा !

महाराष्ट्रातला काय दुसरा कोणताही मंत्री याबाबतीत बाळासाहेब देसायांच्या पासंगालाही पुरणार नाही.

निदान बाळासाहेबांनी काही चेष्टेखोर लोकांच्या मनातील गैरसमज तरी दूर करायला हवे होते. त्यांना वाटते बाळासाहेबांनी वैयक्तिक मतभेदांवरून राजीनाम दिला. त्यांना मुख्यमंत्री व्हायचे होते. पण काही दुष्ट लोक आड येत होते म्हणून त्यांनी राजीनामा दिला. मंत्रिमंडळात त्यांना काहीच किंमत उरली नव्हती म्हणून त्यांनी राजीनामा दिला. मुख्यमंत्र्यांविरुद्धचे त्यांचे कारस्थान दिल्लीत उघडकीला आले म्हणून राजीनामा दिला. इतकेच नव्हे तर त्यांना अगदी काढूनच टाकणार होते म्हणून त्यांनी राजीनामा दिला....एक नाही न् दोन नाही...अनेक तर्क-कुतर्क. त्यांना काही कशाचा आधार नाही न् काही नाही. नुसतीच आपली टवाळ-खोरी ! बरं झालं बाळासाहेबांनी स्पष्टच सांगून टाकलं की त्यांनी आपल्या गोर-गरिबांच्या कल्याणासाठी राजीनामा दिला. या लोकांची तोंडं तरी बंद पडतील. नाही तर काय ! वाटेल ते आरोप करायचे. उचलली जीभ की लावली टाळूला. त्याला काही अर्थ ?

पण आमची तक्रार एकच आहे. गोरगरिबांचे एकमेव कैवारी बाळासाहेब देसाई यांनी हे स्पष्टीकरण आधी करायला हवे होते. निदान मोठ्या समारंभात, विधान-सभेत तरी करायला हवे होते. म्हणजे त्याला चांगली प्रसिद्धी मिळाली असती आणि बाळासाहेबांवरील अन्याय दूर झाला असता.

असो. जे झाले ते झाले. बाळासाहेबांनी केलेले स्पष्टीकरण काही छपून राहणार नाही. हळू हळू त्याचा सुगंध सर्वत्र पसरेलच आणि या आरोप करणाऱ्यांना आपण बाळासाहेबांवर केवढा घोर अन्यय करीत होतो याची जाणीव होऊन शरमेने त्यांची मान खाली होईल. सुगंध का कुठे दबून राहू शकतो ? सूर्यप्रकाश का छपून राहू शकतो ! गोरगरिबांचे एकमेव कैवारी श्री. बाळासाहेब देसाई यांनी केवढा महान त्याग केला आहे हे आज ना उद्या अखिल जगताला खचितच ज्ञात होईल आणि त्यांच्या सत्कीर्तीचा परिमल चहूकडे पसरू लागेल. दिल्लीलाही तो पोचेल. आणि मग एके दिवशी खुद्द दिल्लीश्वर आपली गाडी बाळासाहेबांना सन्मानाने बोलावण्यासाठी मुंबई किंवा पाटण येथे पाठवितील. १९७२ नंतर तर गोरगरिबांचे कैवारी बाळासाहेब कदाचित मुख्यमंत्रीही होऊ शकतील. नाहीतरी एका ज्योतिषाने नुकतेच तसे भविष्य वर्तविले आहेच.

□ □ □

## □ सुधाकर – आणखी थोडी घ्या !

सरकारी सेवक कसा असावा ? कसा नसावा ? हे सगळे महाराष्ट्र सरकारने आता नक्की केले आहे. ब्रिटिशांना सरकारी सेवक जसे हवे असत, तसे त्यांनी त्यांच्या वागणुकीचे नियम बनवले होते. स्वातंत्र्य मिळून पंचवीस वर्ष होत आली, तेव्हा आता त्वरित या नियमात काही दुरुस्त्या करण्याचे महाराष्ट्र सरकारने ठरवले ही गोष्ट अभिनंदनीय होय ! सरकारी कामे इतपत झटपट झाली तरी आम्ही म्हणतो खूप झाले ! मूळ नियमात काही नियम फारच चमत्कारीक आहेत. ब्रिटिशांनी केलेल्या नियमात एक नियम असा आहे – 'सरकारी सेवकाने पैसा गुंतवण्याच्या कामी सट्टा (speculation) खेळू नये.' आता महाराष्ट्र सरकारने शेतातील हरितक्रांतीबरोबरच, पोत्याने पैसा देणारी जी त्वरित क्रांती, लॉटरी मार्गे चालू केली आहे, त्या लॉटरीची तिकिटे सरकारी नोकर घेणारच हो ! हजारो सरकारी नोकर घेतात याबद्दल आम्हाला संशय नाही. कारण लॉटरीचा निकाल असतो, तेव्हा कचेऱ्यातून सकाळी जवळजवळ शुकशुकाट असतो. प्रत्येकाला वाटते जर अडीच लाखाचे बक्षिस लागले तर उद्यापासून 'मस्टर'वरची सही बंद ! तेव्हा हा नियम आता बदलून, सरकारी सेवकाने सरकारी लॉटरीची तिकिटे न चुकता घेणे, हे त्याचे परमपवित्र कर्तव्यच होय, असा नवा नियम करायला हवाच होता. या नियमाबद्दल जरी महाराष्ट्र सरकारने अजून काही केलेले नसले, तरी जे केले आहे ते काही कमी नाही !

सरकारी सेवकांना अशी वाईट खोड असते की कुठल्याही वरच्या साहेबांकडे काम असले की प्रथम त्याच्या जातपातीची बारीक चौकशी करायची. साहेब 'साऊथ इंडियन' असला, की 'काम बोंबललेच !' किंवा 'आपल्यापैकी' असला तर 'काम झाल्यासारखेच आहे !' असे सगळे मोठमोठ्याने बोलतात ! किती बरे ही वाईट गोष्ट ! म्हणून सरकारने ठरवले आहे–'सरकारी सेवकाने, निरनिराळ्या जातीपातीचे संबंधात, 'द्वेष निर्माण होईल, अथवा निरनिराळ्या जमातीत धार्मिक, वांशिक, प्रांतिक, जातीय वा अन्य कुठल्याही प्रकारचे वैमनस्य निर्माण होईल असे, लेखणीने, वाणीने वा कृतीने करता कामा नये.'

सरकारी नोकरांना अत्यंत 'निर्विकारपणाने' आणि 'उदासीन' राहून सर्व-सामान्य 'लेखन' लिहिण्याची तर चांगलीच सवय असते. त्यांचे सगळे कसे 'जेहेत्ते कालाचे ठायी'–म्हणजे 'In due course' चालू असते. लिखाणात ते अत्यंत कनवाळू असतात. आमचा अनुभव सांगतो–.

खूप वर्षापूर्वी आम्ही 'गृहरचना संस्था मर्यादित' स्थापन केली. आम्ही 'नको'

'नको' म्हणत असताना, संस्थेचा चिटणीस जरा तरुण आणि चटपटीत असावा, म्हणून 'मर्यादित' आग्रह होऊन आम्ही या संस्थेचे चिटणीस झालो. सरकारी कचेऱ्यातून या निमित्ताने आमचे हेलपाटे सुरू झाले. निरनिराळे सरकारी सेवक आम्हाला निरनिराळ्या गोष्टी – प्रोडयूस करा! असे सांगू लागले. एक गोष्ट – 'प्रोडयूस' केली की लगेच दुसरी कोणती 'प्रोडयूस' करायला पाहिजे, या-संबंधी सेवक कळवीत असत. खूप वर्षे अशी गेली. आम्ही एकदा चिडून एका सेवकाला विचारले–

'अहो महाराज, जे काय प्रोडयूस करायचे ते सर्व एकाच पत्रात एकदम का कळवत नाही?'

सरकारी सेवक कनवाळूपणे हसला. तो म्हणाला, 'साहेब सांगतील तसे आम्ही लिहितो. मुलाला भरवताना आई भाताचे लहान लहान घास करून ते भरवते ना? कारण तिला मुलाची काळजी असते–!'

आम्ही खजिल झालो. त्याची केलेल्या उद्धटपणाबद्दल जियल्या तिथे माफी मागितली. जेहेत्ते कालाचे ठायी, सोसायटी रजिस्टर होऊन जमीन सोसायटीच्या ताब्यात येऊन, कर्जे मिळून घरे बांधली जातील या मर्यादित आशेवर आमची सोसायटी अजून तगून आहे. परवाच मोठ्या कौतुकाने सभासदांनी माझी षष्टयब्द्य-पूर्तिसमारंभ केला, व गेली वीस वर्षे आम्ही या 'गृहरचना संस्था मर्यादित' या संस्थेची जी सेवा केली, त्याबद्दल त्यांनी आम्हाला धन्यवाद दिले. आम्ही आमच्या उत्तरादाखल केलेल्या भाषणात–'संस्थेने आता एखादा नवा तरुण चिटणीस आमचे जागी निवडावा अशी सूचना केली, व याचि देही याचि डोळा, सभासदां-बरोबर आम्हालाही आमची 'गृहरचना' झालेली दिसेल, अशी आशा व्यक्त केली.' या भाषणानंतर जवळजवळ दीड तास चाललेला हा अभूतपूर्व समारंभ संपला.

हां! तर तात्पर्य, सरकारी सेवक हा लेखणीने इतका घास करून भरवणाऱ्या मातेप्रमाणे कनवाळू असल्यामुळे, तो लेखणी चालवून 'द्वेष' वा 'वैमनस्य' निर्माण करील ही मुळीच शक्यता नाही. आता 'कृती' म्हणाल, तर सामुदायिक रजा मागण्याचा अर्ज करणे, यापलीकडे महाराष्ट्र सरकारी नोकरांनी अन्य काही कृती केल्याचे आतापर्यंत नमूद नाही. सरकारी नोकराने जिभेवर मात्र ताबा ठेवला पाहिजे. इथे आता अडचण ही आहे की समजा एखादा सरकारी सेवक जातीय द्वेष निर्माण करणारे वगैरे काही बोलला, तर त्याच्यावर कारवाई करायची कशी? ते काहीही असले तरी सरकारी सेवकाने धार्मिक, वांशिक, प्रांतीय, जातीय, आंतर-देशीय, आंतरप्रांतीय असे काहीही बोलू नये.

या नियमाची सरकारी सेवकांना फारशी भीती म्हणूनच नाही.

पुढचा नियम. 'सरकारी सेवक हा कुठल्याही राजकीय पक्षाचा सभासद असता कामा नये किंवा राजकारणात भाग घेणाऱ्या संघटनांच्या कार्यातही त्याने भाग

घेता कामा नये.' राजकारणात भाग घेणारे राजकीय पक्ष हे मुख्यतः निवडणुकांना प्राधान्य देतात व त्या हिशोबाने काय करायचे ते करीत असतात. समजा एखादी संस्था म्हणाली – 'आम्ही निवडणुकात भाग घेत नाही. राजकारणाशी आमचा संबंध नाही. आम्ही नुसते आपले सांस्कृतिक मानव आहोत. ही पहा आमची घटना!' तरीसुद्धा सरकारी सेवकाने फसता कामा नये. कारण सरकार सांगते– 'एखादी संघटना राजकारणात भाग घेते की नाही हे सरकार ठरवील.' आता बोला! म्हणजे कोणकोणत्या संघटना सरकारी सेवकांना वर्ज, हे सरकार सांगणार नाही. कारण सुप्रीम कोर्ट सरकारची मग उगाचच फजिती करते. पण सरकारच्या मनात काय आहे, हे सरकारी नोकराने चतुराईने हेरून त्याप्रमाणे आपले वागणे ठेवले पाहिजे हा भावार्थ!

या नियमाचे कसे काय व्हायचे काही कळत नाही. कारण इंदिरा काँग्रेसमध्ये नुकतेच दाखल झालेले श्री. सुधाकर लोणे! सरकारी नोकरीत असून हे सुधाकर गेली काही वर्षे शिवसेनेचे धडाडीचे कार्यकर्ते होते! नुकताच श्री. लोणे यांनी आपल्या अनुयायांसह शिवसेना सोडून इंदिराकाँग्रेसमध्ये प्रवेश केला, आणि या सोहळ्यासाठी केंद्रिय आरोग्यमंत्री का. का. शहा हे मुद्दाम मुंबईला आलेले होते.

खरे पहाता श्री. सुधाकर लोणे कोण आहेत हे जनतेला कळलेही नसते. त्याचे असे झाले. श्री. लोणे यांनी 'शिवसेना' सोडताच, 'लोणे हा गुंड आहे' असे शिवसैनिकांनी प्रथमच जाहीर केले. श्री. लोणे यांनी मग पत्रक काढून विचारले–

'मी जर गुंड असेन, तर 'ॲटॉमिक एनर्जी कमिशन' कचेरीत मी इतकी वर्षे सरकारी नोकरीत कसा राहू शकलो?'

ॲटॉमिक एनर्जीत तयार झालेला हा अणुबॉम्ब, असा काका शहांच्या टोपीवर पडला. जर काका शहांनी लगेच केंद्र सरकारी नोकरांचा नियम या सुधाकराला दाखवला असता, तर हा सुधाकर कदाचित म्हणाला असता–

'सेनापतींसकट शिवसेनेला आणि काकांसह काँग्रेसला या सुधाकराचा आता अखेरचा रामराम–!'

परंतु काका शहा तर म्हणाले–'सुधाकर! आणखी थोडी घ्या!!'

केंद्र सरकारी सेवकांसाठी असलेले नियम, आणि राज्य सरकारी सेवकांसाठी असलेले नियम हे सारखेच असताना हे काय गौडबंगाल आहे असा प्रश्न समस्त सरकारी नोकरांना पडणे अगदी स्वाभाविक होय.

यात गोंधळात पडण्यासारखे खरोखर काय आहे? सर्व नियमांचा एक नियम हा असतो, की नियम हे कधी सुधाकर – तळीराम वा खुदाबक्ष यांना लागू नसतात. ते असतात फक्त पातिव्रत्य पाळणाऱ्या 'सिंधू'साठी!

पति हा देवचि अबलांना!

सुधाकर – तुम्ही आणखी थोडी घ्या!

¤ ¤ ¤

१२ सप्टेंबर १९७०

रातराणी । विजय तेंडुलकर

गोंड चित्रांचे प्रदर्शन

# सायकेडेलिक

लांब पिंगट अस्ताव्यस्त केसांचे, शून्य नजरेचे आणि चित्रविचित्र पोषाखातले मुंबईच्या रस्त्यारस्त्यात भेटणारे हिप्पीज इथे नावालाही या वेळी नाहीत; आहेत ती सगळी तुमच्या-माझ्यासारखी माणसे. पण ही हिप्पींची अंधारी गुहा आहे.

स्प्रिंगचे दार ढकलून आत प्रवेश केला की अंधार! समोर दोन तीन मोठाली चित्रे आणि त्यावर प्रकाशाचे त्रुटित पण प्रखर झोत वेगाने सपासप मारणारा एक दिवा वर कुठे तरी. एका चित्रात फक्त वर्तुळेच वर्तुळे. सगळ्यात लहान; त्याच्या-बाहेर जरा मोठे, त्याच्याबाहेर आणखी मोठे, त्याबाहेर अधिक जरा मोठे–करता करता सगळ्यात एक बाहेरचे मोठे वर्तुळ. प्रकाशाच्या त्रुटित आणि वेगातल्या सप-काऱ्यात ही वर्तुळे पहाता पहाता गरगरा गरगरा फिरू लागतात, एकमेकात मिसळत रहातात. चित्रच जणू फिरू लागते. नकळत गरगरायला लागते. पोटात कळमळते-देखील. घाईने आपण कसेबसे दुसऱ्या चित्राला नजरेने धरतो आणि सावरतो, झाले. लवचीक जाड रेषांचे एक वळणे घेत कागदाच्या वरच्या कोपऱ्यात एकवटलेले वहाते डिझाइन. त्यात एक होडी. त्यात काही पुराणकालीन वाटणारी माणसे. वरच्या उघडझाप करणाऱ्या प्रकाशात, जणू रेषांचा एक प्रवाहच न संपता, न थांबता वर वर आपला वहात रहातो आणि त्यात ती होडी. तिसऱ्या चित्रात एक बागेसारखे पण फुले फळे नसलेले काही; त्यात अनेक धावत्या घुशी. प्रकाशाच्या जादूने या घुशी नॉनस्टॉप एकाच जागी पळत राहतात आणि आपण जागे आहोत की स्वप्नात ते न कळून पहात रहातो.

कुठून तरी संगीत ऐकू येत असते. पाश्चात्य संगीत. मधनच कर्कश होणारे. मधूनच मलूल पडणारे.

पलीकडे डोकवावे तर दालनभर बराच काळोख आणि त्यात उजळून उठणारी अनेक मोठी मोठी रंगीबेरंगी, रेखीव चित्रे. थोडी तरी भडक. मुख्यतः रेषांच्याच

मजेदार रचनांनी नजर गुंग करणारी. काही तर चक्क वेलपत्तीच्या रांगोळ्याच; फक्त कागदावर काढलेल्या.

फक्त काळोखातच विलक्षण उजळून उठणारे या चित्राचे रंग फ्लुअरोसंट म्हणून ओळखले जातात. पोस्ट वगैरेसाठी ते अलीकडे फार वापरले जातात.

काळोखात हातचे चित्रांच्या आणि चित्रकर्त्यांच्या नावाचे छापील कार्ड आपण न्याहाळून पाहू लागतो तर काय गंमत! तेदेखील उजळून उठलेले; फ्लुअरोसंट शाईत छापलेले!

संगीत आता जोरात असते. मधोमधच्या पडद्यावर सिनेमाप्रमाणे नुसतेच रंग नाचत असतात. या रंगांना आकार नाहीत. नुसतेच, अनिश्चित नाचरे रंग. (मनाशी उगीच लेबल: रंगसंगीत...)

काही माणसे समोर काळोखातल्या खुर्च्यांत बसून हे पहात आणि ऐकत असतात.

एकीकडे एक चित्र एका बैठकीवर आडवे फिरते ठेवलेले असते. आपली नक्षीतली दोन पाने एकमेकाला पूरक करून मांडावीत तशा ओघवत्या रेषांच्या दोन आकृती वेगवेगळ्या रंगात मांडलेल्या. फिरताना पहात राहिले की रेषात गुरफटून आपणच मनोमन फिरत रहातो. असे फिरताना छोट्या चौकोनी चौकटीच्या चित्राचा अक्षरशः रेषांचा समुद्र होतो नि आपण नजरेच्या विमानात बसून त्यावरून भिरभिरत रहातो.

तिकडे दुसरे चित्र उभे फिरत असते. बैठकच नसलेल्या लाकडी स्टुलासारखी काहीशी दिसणारी ही गोल फिरणारी चौकोनी पोकळ आकृती आपल्या नकळत आपल्याला जमिनीवरून उचलून घेऊन अधांतरी फिरते. गडबडीने आपण कसेबसे खाली उतरतो.

आणखी एका चित्रात रेषांच्या आणि ठिपक्यांच्या चक्रव्यूहात एकदा नजर शिरली की वेगवेगळ्या रचनांमधून ती टेनिसच्या चेंडूसारखी उड्या घेतच फिरत रहाते; आणि या रचना जणू पसरत, वाढत आपले सारे अस्तित्व व्यापतात. आपण त्यात क्षुद्र, खूप क्षुद्र होऊन हरवत रहातो.

इथल्या या अंधारातल्या चित्रात मोर असतो, पक्षी असतात, फुलपाखरे असतात, ढग असतात, बागा असतात, घरे असतात, 'आय लव्ह यू'ची डिझाइन्स असतात, अंतराळ असते, पण या साऱ्याला व्यवहारातले रोकडे रूप नसते. सुंदर विशुद्ध रंग, अतिशय रेखीव रेषा, मजेदार स्वप्निल आकार यांनी हे सारे तपशील व्यवहारापलीकडे, त्यातल्या गुंतागुंतीपलीकडे नेलेले असतात. एका निरागस स्वप्निल प्रतिभेने जणू हे टिपलेले असतात आणि एका अतिशय स्वच्छ मनाने कागदावर रेखलेले असतात. फ्लुअरोसंट रंगांनी त्यांना एक विलक्षण अद्भुतता येते. सर्व आकार जणू आत–आतून कसल्यातरी गूढ तेजाने नुसते फुलून येतात. आपल्या आत–आतपर्यंत हे तेजाचे आकार पहाता पहाता झरत, पोचत राहतात. आपणच तेज होतो. त्या आकारातला अणूरेणू होतो. आपण आपण रहातच नाही, आपण

तो वर वर साधा सोपा परंतु पहावे तितका जास्तच गुंतवत रहाणारा आकार होतो.

एक चित्र तर विलक्षण गोड असते. फरशीचे केवढाले तरी अंगण; कुठे उंच कुठे सखल. फरशांच्या चौकोनांच्या मजेदार विषम रचनांनी त्यांचे एक डिझाइनच तयार होते. त्यात पक्षी. दाणे टिपणारे. उडून येऊन बसणारे. उडणारे. आणि नीट पाहिले म्हणजेच जाणवणारा एक आकार मधोमध बसलेला. ही एक छोटी मुलगी. बहुधा थंडीच्या कपड्यातली. पक्षांना दाणे घालता घालता स्वतःला जणू पुरती हरवून बसली आहे. रंगांच्या नुसत्या आकारांपलीकडे उरलेलीच नाही. फरशांचा समुद्र; त्यात रंगात विरघळून उरलेली मुलगी. आणि पक्षी.

आपण खूष होऊन जातो. एक तर ही चित्रे वर वर तरी भानगडीची वाटत नाहीत. आपल्याला प्रथमदर्शनीच ती झिडकारीत किंवा मूर्ख लेखीत नाहीत. त्यांच्या वरपांगी साधेपणाने आपण त्यात रस घेतो. आणि बघता बघता गुंततच जातो. त्यांच्या वरपांगी साधेपणाच्या पोटात एक साधेपणा, त्या साधेपणाच्या पोटात आणखी एक साधेपणा, अशी गंमत होऊ लागते, ती वाढतच जाते, आणि भोवतालच्या अंधारात आपण आपले रहात नाही, आपण त्या चित्रांच्या आत आत निघून जातो. मोठ्या कष्टांनी स्वतःला वेगळे करावे लागते. झालेच तर काही चित्रे – उदाहरणार्थ पक्षी नि मुलीचे किंवा मोराचे किंवा ते 'आय लव्ह यू' चे डिझाइन – आपण काढायला हवी होती असे वाटण्याइतकी कोवळी नि गोड असतात.

हातचे माहितीपत्रक सांगते, ही हिप्पींची सायकेडेलिक कला. ही कला पाहिल्यावर हिप्पी आपल्याला वेगळेच भासतात. वरवरच्या जटा नि दाढ्या नि लोकविलक्षण कपड्यांआत एक कोवळीक आणि चक्कर वृत्ती जपणारे. कळकट मळकट शरीरांनी या चित्रांसारखी अंधारात रंगाच्या अणू अणूतून फुलणारी, बहरणारी चित्रांची देखणी सूर्यफुले निर्माण करणारे. उत्सुकतेने आपण डोळे वटारून अंधार न्याहाळतो पण एकही हिप्पी औषधालासुद्धा आढळत नाही. सगळे तुमच्या माझ्यासारखे नोकरवाले संसारी लोक नाही तर कॉलेजची फाकडी मुले. वाटते की मुंबईच्या या अमेरिकन कल्चरल सेंटरने या प्रदर्शनात चित्रांप्रमाणे आणि रंगसंगीताप्रमाणे काही हिप्पीही ठेवायला हवे होते. म्हणजे त्यांचे हात हाती घेऊन त्यांना सांगता आले असते की आम्हाला तुमची ही गंमतीशीर कला फार आवडली.

अर्थात त्यांना यात रस वाटलाच नसता कारण त्यांना मुळी ते सोडून कशातच रस नाही. आपली सर्वांची, आपल्या या पोटार्थी नि धावाधावीच्या यांत्रिक आयुष्याची नि जगाची आशा त्यांनी केव्हाच सोडून दिली आहे.

तरी काय झाले ! आपण नाही त्यांची आशा सोडलेली. इतकी मजेदार चित्रे जे काढतात आणि ज्यांना आवडतात त्यांची आशा कोण सोडील ?

□ □ □

# चक्क पंधरा दिवस कापूस व्यापारी संपावर होते !

प्रतिनिधी

तसं पहाता पूर्वी संप होत असत ते प्रामुख्याने कामगारांचेच, पण त्यानंतर ' व्हाईट कॉलर ' वालेही संप पुकारू लागले. ही संपाची लागण आता सर्वत्रच झाल्याचं आपल्याला दिसतं. ऊठसूठ कोणीही आता संप करू लागतो. काही वेळा योग्य मागण्या पदरात पाडून घेण्याकरिता संप होतात तर काही वेळा अगदीच फालतू कारणांकरिताही संप पुकारला जातो. बंगालमध्ये तर संप हा शब्द सारखा सारखा वापरून अगदीच गुळगुळीत करून टाकला आहे बंगाल्यांनी.

हूं ! तर मुद्दा असा आहे की व्यापारीही आता संप करू लागले आहेत. झटका बसल्यागत वाटलं ही बातमी वाचून ! शक्य आहे कदाचित. त्याचं असं झालं. अलीकडे म्हणजे ४ ऑगस्ट ते १९ ऑगस्ट म्हणजे चक्क पंधरा दिवस कापूस व्यापारी संपावर होते. (अर्थातच त्यांनी संपासाठी वापरलेला शब्द होता ' Suspension of Business ' ). हा संप पुकारला गेला असूनही अनेकांच्या तो लक्षात आला नाही किंवा त्याची किंचितशी झळही लागली नाही. थोड्या फार प्रमाणात काही जणांनी यासंबंधी बातम्या वाचल्या असतील पण ही मंडळी संपावर का गेली हे कोडं वाटतं ना ?

बहुतेक करून ' न्यूयॉर्क कॉटनचे वायदे बाजार ' या पलीकडे कापूस व्यापाराची तुम्हा आम्हाला काडीचीही माहिती नसते. त्यामुळे या संपाची आपल्यासारख्या सामान्यांनी विशेष दखलही घेतली नाही. तो आपल्या निदर्शनाला आला नाही.

संपाचं कारण होतं सरकारचे कापूस व्यापारविषयक नवं धोरण. म्हणजे सरकार आता आयात व्यापार स्वतःच्या हाती घेऊ इच्छित असून कापसाच्या अंतर्गत व्यापार एकाधिकार पद्धतीने क्रमाक्रमाने हाती घ्यावा असाही सरकारचा

केत आहे व याची अंमलबजावणी व्हावी म्हणून 'कॉटन कॉर्पोरेशन'ची स्थापनाही करण्यात आली असून कॉर्पोरेशनची मुख्य कचेरी मुंबईत राहील.

हे सर्व प्रश्न समजावून घेण्यासाठी भारतात कापूस कुठे पिकतो, आयात किती व कुठून करावी लागते, या व्यापारात व सध्याच्या या 'कॉटन क्रायसेस'मध्ये कोणाकोणाचे कसे (हित) संबंध गुंतलेले आहेत, नव्या सरकारी धोरणाचा कोणाकोणावर काय परिणाम होईल व त्यासंबंधी प्रत्येकाची भूमिका काय, व सर्वांत महत्त्वाचं म्हणजे तुमच्या आमच्यासारख्या सामान्य जनांवर याचा काही परिणाम होईल काय, वगैरे सांगण्याचा या लेखात प्रयत्न करीत आहे.

अमेरिका, इजिप्त, सुदान, रशिया, ब्राझील व भारत हे देश कापूस उत्पादक देश समजले जातात. जगात कापूस लागवडीखाली सुमारे ८ कोटी एकर जमीन आहे व सुमारे ५ कोटी ३५ लक्ष गाठी एवढे कापूस उत्पादन प्रतिवर्षी होत असतं. भारतातील कापूस लागवडीखाली असलेली जमीन २ कोटी एकर असून कापसाचे उत्पादन सुमारे ६० लक्ष गाठीपर्यंत होत असतं. महाराष्ट्र व गुजरात ही राज्ये प्रामुख्यानं कापसाचं उत्पादन करतात. जगातील दर एकरी कापूस-उत्पादनाच्या मानाने येथील उत्पादन फारच कमी आहे. (अमेरिकेत दर एकरी ४८० पौंड तर इजिप्त मध्ये ५१७ पौंड एवढं कापूस उत्पादन होतं.) आपल्याकडे दर एकरी उत्पादन ११४ पौंड इतकंच होतं. (महाराष्ट्रातील काही भागात मात्र दर एकरी १९५ पौंड एवढं कापसाचं उत्पादन होतं). यामुळे दर वर्षी सुमारे १०० कोटी रुपये खर्च करून ७ ते ८ लक्ष गाठी कापूस आपल्याला इजिप्त व सुदान येथून आयात करावा लागतो. याचाच अर्थ असा की आपण हे मूल्यवान परकीय चलन वाचविण्याकरिता आपले एकरी उत्पादन वाढविले पाहिजे. आधुनिक पद्धतीने लागवड सुधारलेले बी-बियाणं, खत, वगैरेचा या कामी उपयोग करणं अत्यंत आवश्यक आहे.

ही कापूस उत्पादनाबद्दलची थोडक्यात सांगता येण्यासारखी पार्श्वभूमी. आता यातील हितसंबंधी कोण असा प्रश्न सहाजिकच पुढे येतो. त्याचं उत्तर पुढीलप्रमाणे : १. कापूस पिकवणारा शेतकरी. २. हा कापूस त्यांच्याकडून खरेदी करणारा व्यापारी. ३. कापडासाठी कापूस खरीदणारा गिरणी मालक. ४. कापड खरेदीदार–म्हणजे तुम्ही आम्ही व ५. सरकार. कापूस वेचणीचा हंगाम साधारणपणे सप्टेंबर–ऑक्टोबरच्या सुमारास चालू होतो. हा सर्व कच्चा कापूस नोव्हेंबर ते मार्च या सुमारास विक्रीसाठी बाजारात आणला जातो. हंगामानंतर म्हणजे जानेवारी-फेब्रुवारीत या कच्च्या कापसाचे भाव फारच खाली असतात. कारण भरपूर कापूस उपलब्ध असतो. नंतर मात्र हे भाव चढते असतात. पण ज्यावेळी कापसाला भाव मिळू शकेल अशा वेळी शेतकऱ्यांकडे कापूस नसतो (कारण पहिल्या चार महिन्यातच त्याला कापसाची विक्री करून पोटापाण्याची व्यवस्था करावी लागते). त्याच्याकडे कच्च्या कापसावर प्रक्रिया करून गाठी बांधण्याची व साठविण्यासाठी गोदामांचीही हवी

तशी व्यवस्था नसते. त्यामुळे शेतकऱ्याला कापूस पहिल्या चार एक महिन्यात बाहेर काढावा लागतो. (मात्र कापसांच्या गाठीचा व्यापार वर्षभर चालू असतो). शिवाय आजूबाजूच्या गिरण्या मागील हंगाम चांगला गेला असल्यास चालू हंगामातही चांगले साठे करून असतात, हेही कापूस लगेच विकण्यामागचं कारण असतं.

उत्पादनच मुळात कमी म्हणून शेतकऱ्यांना विशेष झळ न लागता साधारणपणे चांगले भाव मिळतात.

त्यानंतरचा या व्यापारातील घटक म्हणजे कापूस व्यापारी व त्यांचीच सरकारच्या नव्या धोरणाविरुद्ध ओरड चालू आहे. चळवळीला आरंभ झाला तो डिसेंबरमध्ये मुंबईत भरलेल्या सत्तारूढ काँग्रेसच्या अधिवेशनानंतर. या अधिवेशनात कापसाचा आयात व्यापार सरकारी पातळीवर हातात घेण्याचा व क्रमाक्रमाने अंतर्गत व्यापारात एकाधिकारपद्धती सुरू करण्याचा ठराव करण्यात आला. तसं पाहता हा निर्णय केवळ राजकीय असल्याचं म्हटलं जातं. ते कसंही असो, निर्णयाची अंमलबजावणी करण्या-करता सरकार सज्ज झालं असून कॉटन कॉर्पोरेशनची स्थापना व तिच्या संचालक-पदी श्री. ना. श्री. कुळकर्णी यांची नेमणूक हेच दर्शविते. या ठरवामुळे कापूस व्यापारीवर्गात खळबळ माजून त्यांनी याविरुद्ध लढा देण्याचं ठरविलं.


व्यापारी वर्गाचा असा दावा की आज अनेक वर्षे–ब्रिटिशांच्या काळापासूनही हा व्यापार ते 'फारच थोडा' नफा घेऊन करीत आले आहेत. सरकारने घेतलेला निर्णय त्यांच्यावर अन्याय करणारा आहे व हा व्यापार सरकारने हाती घेतल्यावर सुमारे ३ लक्ष लोक व सुमारे १२ लक्ष त्यांच्यावर अवलंबून असलेली कुटुंबीयमंडळी बेकारीच्या खोल गर्तेत पडतील. (अर्थातच वरील आकडे काहीसे अतिशयोक्तिपूर्ण असल्याचं काही माहितगार व तज्ज्ञ मंडळींचं मत आहे.)

हे व्यापारी 'थोड्या नफ्यात' (सुमारे १ ते २ टक्के नफ्याचे प्रमाण असं त्यांचं म्हणणं.) व्यापार करून त्यांच्या ग्राहकांना अनेक सेवा उपलब्ध करून देतात. उदा. काही वेळा खरेदीदाराकडे पैसा नसतो अशा वेळी त्याला आगाऊ पैसे न घेता माल पुरविणे. गिरण्यांच्या गोदामात जागा नसल्यास स्वतःच्या गोदामात तो साठवून ठेवणे. शिवाय प्रत्येक गिरणीला कोणत्या प्रकारचा कापूस केव्हा व किती लागतो याची त्यांना माहिती असल्याने त्या प्रकारचा कापूस योग्य वेळी त्या त्या गिरण्यांना उपलब्ध करून देणं हे सर्व ही व्यापारी मंडळी करतात. शिवाय हे सर्व करूनही जगातील इतर देशांच्या मानाने त्यांचा नफा कमी असतो व त्यामानाने व्यापारा-तील जोखीम अधिक, हाही मुद्दा कापूस व्यापाऱ्यांतर्फे पुढे केला जातो. आज या व्यापारात असलेली बहुतेक मंडळी विशेष शिकलेली नाहीत. पण व्यापारातील त्यांचं कसब अप्रतिम असून सरकारने हा व्यापार हाती घेतल्यास व्यापारातील तांत्रिक-ज्ञानाची अचूक माहिती असलेली ही मंडळी (Expertise) व हा सर्व व्यापार योग्य-प्रकारे चालविणारी यंत्रणा सरकारपाशी नसल्याने शेवटी सर्वच सावळा गोंधळ

होईल व परिणामी कापसाचे भाव वाढतील असंही ' इस्ट इंडिया कॉटन असोसिएशन 'चं म्हणणं. शिवाय हा व्यापार हाती घेण्यासाठी योग्य ती कारणंही सरकारपाशी नाहीत असंही मत २२ व २३ जून रोजी दिल्लीत झालेल्या दि ऑल इंडिया कॉटन कॉन्फरन्समध्ये परिषदेचे अध्यक्ष श्री. मदनमोहन रुइया यांनी व्यक्त केलं. ही झाली व्यापारीवर्गाची बाजू.

गिरणी मालकांचा अर्थातच व्यापाऱ्यांना पाठिंबा आहे. कारण व्यापाऱ्यांकडून त्यांना अनेक सवलती मिळू शकतात. त्या म्हणजे वर म्हटल्याप्रमाणे त्यांना योग्य वेळी योग्य तो कापूस हवा तेवढा उपलब्ध होऊ शकतो. काही वेळा आगाऊ पैसे दिले नाहीत तरी हवा असणारा माल त्यांना मिळू शकतो. वेळीप्रसंगी त्यांची गोदामं भरलेली असल्यास व्यापारी त्यांचा माल ठेवण्याची व्यवस्था करतात, पण सर्वात महत्त्वाचं म्हणजे हा व्यापार स्पर्धेनं चालतो. त्यामुळे त्यांना कापूस योग्य त्या भावात मिळू शकतो. शिवाय काही गिरण्यांच्या कापूस व्यापार करणाऱ्या ' भगिनी संस्था ' वा एजन्सीज आहेत. असं जरी असलं तरी एकूण असं दिसतं की त्यांचा नव्या सरकारी धोरणाला फार विरोध नाही किंवा फार मोठ्या प्रमाणात सरकारी धोरणाला पाठिंबाही नाही.

सरकारची भूमिका अशी की उत्पादकाला कच्चा कापूस विकावा लागत असल्यामुळे व्यापारी व दलालांच्या कारस्थानांना बळी पडावं लागतं, त्यांचं शोषण होतं म्हणून उत्पादकाला कच्च्या कापसाची विक्री करावी न लागता पक्क्या कापसाच्या



रहावी. कापसाचं उत्पन्न वाढविण्याकरिता त्यांना लागणारा पैसा पुरविणं जरूर असून हा पैसा मालाच्या विक्रीतून वसूल करण्याची व्यवस्थाही असणं अवश्यक आहे. आज गुजरायने याबाबत आघाडी मारलेली असून कापसाच्या उत्पन्नापैकी ७५ ते ८० टक्के व्यवहार सहकारी सोसायट्यांमार्फत होतो. कच्च्या कापसावर तेथे प्रक्रिया केली जाते व गाठी बांधूनच तो कापूस व्यापाऱ्यांपर्यंत पोहोचतो. त्यामुळे त्यांना खंडी-मागे सुमारे ४५ रुपये अधिक मिळतात. तेव्हा उत्पादकाला या सर्व व्यापाऱ्यांच्या 'शोषणा'पासून वाचविण्याकरिता वरील धोरणांचा अवलंब करणं आवश्यक असल्याचं सरकारचं म्हणणं. शिवाय व्यापाऱ्यांकडे असलेल्या तंत्रज्ञानाचा उपयोग करून घेण्याचीही सरकारची इच्छा असल्याने कोणी बेकारीच्या खाईत लोटले जाईल असा संभव नाही असाही सरकारपक्षाचा दावा.

काही तज्ञमंडळी व्यापाऱ्यांच्या चळवळीच्या संदर्भात म्हणतात की व्यापारी जरी नफ्याचं प्रमाण १ ते २ टक्के म्हणत असले तरी प्रत्यक्षात त्यांना यापेक्षा अधिक फायदा होतो. सरकारी धोरणाची अंमलबजावणी झाली तर निव्वळ एजंट म्हणून त्यांना काम करावं लागेल, म्हणजे 'मलई खाणं' जमणार नाही म्हणून त्यांचा या धोरणाला प्रखर विरोध आहे. १३ जुलै, २७ जुलै, १ ऑगस्ट रोजी व्यापाऱ्यांनी निरनिराळ्या प्रकारे त्यांचा निषेध व्यक्त केला व ४ ते १९ ऑगस्टपर्यंत संप पुकारला. (अर्थातच या काळात त्यांनी गिरणी मालकांची अडचण होऊ दिली नाही—वाचकहो आपण याचं कारण जाणताच.)

या झाल्या या प्रश्नांच्या चार बाजू. या सर्वांचा तुमच्या आमच्यावर काही परिणाम होणार असेल तर दूरान्वयाने का होईना आपणही या प्रश्नाचे एक भाग बनतो. तुम्ही आम्ही एकच पहाणार, कापूस व्यापार कोणाच्याही हाती राहो पण यात आपला काही तोटा आहे काय ? 'कॉटन कॉर्पोरेशन'कडे व्यापार गेल्यानंतर 'लाल-फिती'चा व सरकारी 'गलथान'पणाचा परिणाम आपल्यावर होईल काय ? हे सर्व व्यवस्थापनावर अवलंबून असतं. बिर्ला-टाटा यांचे कारखाने नफ्यात चालतात कारण व्यवस्थापनाकडे त्यांचं बारीक लक्ष असतं. सरकारी क्षेत्राचं एक उदाहरण घेऊ—बंगलोरमधील एच्. एम्. टी. कारखाना नफ्यात चालतो तर रांची येथील एच्. एम्. टी. कारखाना तोट्यात चालतो—अर्थातच येथे व्यवस्थापनाचा भाग येतो. म्हणूनच म्हणावसं वाटतं की 'कॉटन कार्पोरेशनने' उत्पादक व ग्राहक (कन्झ्युमर) यांचा सतत विचार करून योग्य त्या दिशेने व्यवस्थापन केल्यास, तंत्रज्ञान मिळविल्यास व हे सर्व चालविणारी यंत्रणा निर्माण केल्यास, सामान्य लोकांवर १२ रुपयाचे कापड १४ रुपयास घेण्याची पाळी येणार नाही व हे धोरण यशस्वी होऊ शकेल.

□ □ □

शिवाजी उद्यानाजवळच्या विस्तीर्ण जागेत डॉ. देशपांड्यांचा अद्ययावत नवा दवाखाना! गावाच्या एका बाजूला ऐटीत, दिमाखात उभा! आऊटडोअर पेशंट्सकरिता तळमजल्यावर व इनडोअर पेशंट्सकरिता पहिल्या मजल्यावर सोय केलेली! डॉक्टर नव्यानंच या गावात आले होते, पण थोड्याच अवधीत बराच जम बसलेला! रोगाचं अचूक निदान, सुयोग्य औषधयोजना नि मिठ्ठास वाणी! हा हा म्हणता डॉक्टर खोऱ्यानं पैसा ओढू लागले.



नेहेमीप्रमाणे सकाळी डॉक्टरांची राऊंडची वेळ झाली नि बरोबर साडेआठ वाजता डॉक्टरांची काळीशार फियाट हॉस्पिटलच्या आवारात शिरली. चपराशी त्वरेनं पुढे आला. मोटारचा हॉर्न वाजला, की वॉर्डबॉईज, नर्सेस, आया तत्परतेनं धावपळ करून कामाला लागायचे, हे सारं ठरून गेल्यासारखं ! आताही पांढऱ्या कपड्यांची द्रुतगतीनं हालचाल झाली.

डॉक्टरांचं व्यक्तिमत्त्वच एकूण रुबाबदार ! ओठावर नेहेमी स्मितहास्य, सौजन्यपूर्ण चेहरा, बुटांचे टाक् टाक् आवाज करीत झोकात चालणं, लाघवी बोलणं ! डॉक्टरांची पेशंट्सवर चांगलीच छाप होती. डॉक्टरांची राऊंड सुरू झाली.

---



कोणाकरता बरी होऊ ?

कोणाकरता ?

मला फसवलंय... फसवलंय डॉक्टर...

**सौ. सुलोचना घोटीकर**

---

मागोमाग लवाजमा होताच.

मृणालनं डोळे उघडले तेव्हा डॉक्टर एक्स-रे पाहात होते.

" फ्रॅक्चर नाही बरं का ! सिस्टर, ब्लडप्रेशर... "

मृणालनं सभोवती पाहिलं. पहिल्या मजल्यावरील एका प्रशस्त वॉर्डमध्ये एका कॉटवर ती पडून होती. डॉक्टर, आई, दादा-सारेजण तिच्या मलूल चेहऱ्याकडे उत्सुकतेने पाहात होते. आई चटकन पुढे झाली.

" मृणाल, कसं वाटतंय आता ? " आईनं विचारलं.

" म्हणजे मला ॲक्सिडंट झालाय तर ! " मृणाल मनाशीच पुटपुटली... डोळे मिटून सुन्न पडून राहिली.

सारा चित्रपट तिच्या डोळ्यासमोर उभा राहिला.

किती तरी वेळा मुकुंदला भेटण्याचा तिनं प्रयत्न केला होता. पण छे ! त्यानं मुळी तोंडच दाखवलं नव्हतं. तिला राहून राहून आश्चर्य वाटायचं, असं का करतो

मुकुंद हल्ली ! ती आर्जवं, ती मधुर संभाषणं, ती ओढ, ती हुरहूर. ते प्रेम... कुठे गेलं सारं ? एकदम आटलं कसं ? काही चुकलं का माझंच ? मुकुंदला विचारलं पाहिजे ! हवं तर क्षमा मागेन... हव्या तितक्या वेळा ! आपल्याच माणसापुढे कसला मानापमान ! पण तो भेटेल तेव्हा ना ! प्रयत्न करून करून थकून गेले.

मृणालला कमालीचा थकवा आला होता. मनाचा नि देहाचा अणुरेणु बोलत होता. डोळ्यावर ग्लानीही ! तिनं पुन्हा डोळे मिटून घेतले. आईनं तिच्या कपाळावर हलकेच थोपटले.

" अं हं, निजू द्या त्यांना... डिस्टर्ब करू नका... " नर्सनं बजावलं.

डॉक्टर पुढच्या बेडकडे निघाले. त्यांच्याबरोबर नर्सही लगबगीनं निघाली.

दोन तीन तास मृणाल अर्धवट जागी, अर्धवट गुंगीत होती.

" मृणालला साबुदाण्याची लापशी देऊं जरा ? " आईनं संध्याकाळी नर्सला विचारलं.

" हो, द्याना ! आता बरं आहे त्यांचं ! "

रात्र झाली. सगळ्या वॉर्डमध्ये नीरव शांतता ! सर्व दिवे मंद ! नर्सनं येऊन साऱ्या पेशंट्स्ना औषधं दिली. चार दोघांना इंजेक्षन्स् दिली. त्यांची टेंपरेचर्स घेतली. थर्मामीटर ग्लासातल्या अल्कोहोलमध्ये उलटं बुडवून ठेवलं. एका बाजूला टेबलापुरत्या ठेवलेल्या दिव्याच्या प्रकाशात खुर्चीवर काही वाचत बसली. मृणालची आई घरी गेली होती. पेशंट्स्‌जवळ रात्री बसायची परवानगी नव्हती. पेशंट्स्‌करता ठेवलेल्या रेडिओतून कुणी गायिका ठुमरी गात होती—

'बता दे सखी कौन गली गये शाम...
गोकुल ढूंढी, बिंदराबन ढूंढी...
ढूंढ फिरे चारों धाम... कौन गली गये श्याम...'

खरंच, मृणालनं नाहीका मुकुंदचा असाच शोध केला ? धारदार नाकाचा, सावळा, वळणदार झुलपं ठेवणारा मुकुंद तिचा कृष्णच नव्हता का ? शंकराच्या देवळाच्या मागे, टेकडीच्या बाजूला, नदी किनारी, कॉलेजच्या लायब्ररीत त्याला शोधत ती नाही का फिरली !

गेले दहा पंधरा दिवस घरी जाताना मृणाल अतिशय चोरट्यासारखी होऊन जाई. घरातही ती मोठ्या संकोचानं नि बावरल्यासारखी वागे. आईचे शोधक डोळे तिच्या मनाचा ठाव घेण्याचा प्रयत्न करीत असत. तिचं व मुकुंदचं काही बिनसल्याचं आईला मनोमन समजलं होतं. दादाही काही विचारत नसला तरी तो सुद्धा अस्वस्थ झाला होता. बाबाही कधी नाही ते विचारू लागले,

" मृणाल, आज लवकर घरी ? "

" अं...! म्हणजे कॉलेजचं काम संपलं; मग काय करायचं ! आले लवकर झालं ! "

बाबा गप्प बसत. पण उत्तर पटलेलं नसे.

चार सहा दिवसांनी आईनं स्पष्टच विचारलं, "मृणाल, हल्ली मुकुंद नाही आले ते?"

"अगं आई, त्यांना बरं नसेल!"

"आणि तुला ठाऊक नाही होय!"

"आई, कृपा करून मला यातलं काही विचारू नकोस!"

"भांडण वगैरे नाही ना झालं तुमचं काही?"

"आई......आई!!"

मृणालला बोलवेना. तिचे डोळे भरून आले होते.

"मृणाल, दोघे हिंडलात – फिरलात गावभर, आणि आता हा काय प्रकार! सगळीकडं नाव झालं ना! कारण तरी काय झालं बिनसायला?"

मृणालला रडू कोसळलं. आईच्या गळ्यात गळा घालू ती स्फुंदू लागली.

..................

कॉटवर पडल्या-पडल्या मृणाल खरोखरीच स्फुंदू लागली. तिला त्या प्रसंगाचा पुन: प्रत्यय येत होता, हळूहळू तिला हुंदके येऊ लागले.

नर्स धावत आली तिच्याजवळ.

"मिस् कुळकर्णी, बरं नाही वाटत?"

मृणाल रडतच राहिली. जो जो नर्सनं सहानुभूती दाखविली तो तो तिचं रडणं वाढतच राहिलं.

रात्रीतून तिला सपाटून ताप चढला.

सकाळी डॉक्टर राउंडला आले.

"डॉक्टर, पेशंटला काल रात्री एकदम ताप चढला..."

"असं?"

डॉक्टरनी चार्ट पाहिला.

"सिस्टर, त्यांना सोडा-सॅलिसिलेट मिक्श्चर द्या...ब्लडप्रेशर पाहिलं?"

ते प्रमाणापेक्षा खूपच जास्त होतं.

"यांना आणखी ड्रिप द्या...आणि स्ट्रेप्टोपेनिसिलीन सुरू असू दे..."

आई, दादा थोड्या अंतरावर उभेच होते. डॉक्टर थोडे पुढे गेल्यावर आई हळूच जवळ येऊन बसली. ती लेकीकरता चहा घेऊन आली होती. लाडक्या मृणालकरता तिचा जीव अगदी टांगणीला लागला होता.

"मृणाल, आता बरं वाटतं आहे ना? काल रात्री झोप लागली होती?"

मृणालनं नुसती मान हलवली.

"हे बघा मिसेस कुळकर्णी, लेट हर स्लीप – काल रात्री त्यांना ताप चढला होता – इथं जवळ नाही बसायचं –" नर्सनं बजावलं. आई उठून मुकाट्यानं दूर उभी राहिली.

दादा डॉक्टरांच्या मागे गेला.

"डॉक्टर, काही काळजी करण्यासारखं नाही ना?"

"ओ, नो! मिस्टर कुलकर्णी, पेशंटला काही मनस्ताप वगैरे झाला आहे का? एनी हिस्ट्री–?"

दादा थोडा घुटमळला.

"नाही, सांगण्यासारखं नसेल तर नका सांगू—"

"तसं नाही, पण तुम्हाला वेळ आहे का पाच–एक मिनिटं?"

"हो, व्हाय नॉट?"

दोघेजण व्हरांड्यात खुर्च्यांवर बसले. डोळे मिटल्या मिटल्या मृणाल सावधपणे त्यांचं संभाषण ऐकण्याचा प्रयत्न करू लागली.

"दादा काय बरं सांगेल आता डॉक्टरना!" मृणाल मनाशीच म्हणाली.

"डॉक्टर, आमची ताई माझी एकुलती एक बहीण–बाबांची फार लाडकी आहे ती–अहो, ताईला ॲक्सिडंट झाला आणि ते भोवळ येऊन पडले–अजूनही ते निजूनच आहेत–"

"हं, मग पुढे–?"

"ताई सीनियर डेमॉन्स्ट्रेटर आहे एच. पी. टी. मध्ये. एम. एससी. आहे ती..."

"असं? अरे वा...!"

"कॉलेजात तिची मुकुंद पुरोहितबरोबर ओळख झाली..."

"तो बिटको कॉलेजातला लेक्चरर?"

"हो तोच! ओळखीचं रूपांतर लवकरच प्रेमात झालं... खरं म्हणजे बाबांना हे पसंत होतं–मला सुद्धां! पण मधेच काय बिनसलं कुणास ठाऊक? कालच मी त्याला मीना गोडबोलेबरोबर पाहिला–अहो, ती आहे माझ्या वडिलांच्या मित्राची मुलगी! मला वाटतं, तेच कारण असावं! हल्ली ताई फारच अस्वस्थ असायची–तीनच दिवसापूर्वी, कॉलेजातून घरी यायच्या अगोदर..."

..................

मृणालच्या डोळ्यापुढे स्मृती साकार झाल्या–संध्याकाळी तिचं कॉलेज सुटल्यावर ती मुकुंदाच्या कॉलेजपासून थोड्या अंतरावर उभी राहिली होती. तिला पाहून मुकुंद चमकलाच, कपाळाला आठ्या घालून पुढे चालायला लागला.

"मुकुंद...मुकुंद..."

"काय हवंय? कशाला आलीस इथे?"

"रागावलास माझ्यावर? चुकलं का माझं काही?"

"छे छे! माझंच चुकलं–आता प्लीज जाऊ दे मला."

"मुकुंद, असं रे का वागतोस?"

"काय हा लोचटपणा! मला वेळ नाही आता–"

" का ? दुसरं कुणी वाट पहात आहे का ?"

" होय ! मीनाबरोबर मला जरा शॉपिंगला जायचं आहे...का ? तुझी काही हरकत ?"

" मुकुंद, तुला शोभतं का हे ?"

" तुझ्याबरोबर हिंडतो ते चाललं वाटतं ?"

" पण आपण दोघे लग्न करणार होतो..."

" कुणी सांगितलं ? हा नविनच शोध दिसतोय-"

" पण, मग आपण एकत्र..."

" तूच माझ्याभोवती पिंगा घातलास त्याला मी काय करणार ?"

' पण मुकुंद ! मग कशाला रे सहवास वाढवलास ?"

" हे बघ, सुंदर मुली मला आवडतात-मी त्यांच्याबरोबर राहतो-तुझ्याशी मैत्री व्हायच्या आधी शकुन काळेबरोबर नव्हतो का मी ? तिला सोडून तुझ्यावर प्रेम केलं ते तुला आवडलं ना ? मग आता का ?"

" पण मुकुंद !...मी तुझ्याशिवाय कशी राहू ?"

" ते मी कसं सांगू ?"

" मुकुंद..." मृणालचे डोळे भरून आले.

" हे बघ, तुला रस्त्यात तमाशा करायचा आहे का ?"

" मग...मी जाऊ ?"

" मी निमंत्रण केलं होतं का ?"

मृणाल झटकन वळली. यापेक्षा किती अपमान सहन करायचा ? इतका वेळ कसेबसे आवरलेले अश्रू गालांवर सांडायला लागले. पुढचं काही दिसेना. हातपाय लटलट कापत होते. डोकं सुन्न झालं होतं.

" अशा अवस्थेत मला पाहून लोक काय म्हणतील बरं !" मृणालला वाटलं.

" छे, छे, असं रस्त्यात अवसान गाळता कामा नये." ती मनाशीच म्हणाली आणि तिनं पुढे चालायला सुरुवात केली. " पण छे, समोरचं काहीच कसं दिसत नाही !"

" बस आली-मागे व्हा ! मागे व्हा !!" कुणी तरी ओरडल्याचं तिनं ऐकलं आणि मग...

ती शुद्धीवर आली तेव्हा इथे, या कॉटवर होती...

त्या रात्री डॉक्टरना बोलावणे पाठवावे लागले. " डॉक्टर ताप ५ डिग्री आहे... पेशंट बरळतो आहे. मधून मधून रडणे पण सुरू आहे."

" सिडेट हर ! आणि हे पहा, सिस्टर, सकाळी लवकर मला रिपोर्ट करा..."

सकाळी ताप खाली आला होता.

" नमस्ते डॉक्टर !"

" अरे वा ! यू आर वेल् अगेन..."

मृणाल नुसतीच हसली.

तिच्या म्लान चेहे-याकडे पाहून डॉक्टरांच्या मनात कणव निर्माण झाली. या सुंदर मुलीची काय ही दशा! प्रेम–निराशेचा केवढा हा तडाखा...नर्व्हस् ब्रेक डाउनची केस...हिच्याशी जरा सहानुभूतीनंच वागायला पाहिजे...खरं म्हणजे हिला सायकॉलॉजीकल ट्रीटमेंट द्यायला हवी...

दुसऱ्या दिवशी, राउंडच्या वेळी. डॉक्टर तिच्या बेडपाशी थांबले.

" मिस् कुलकर्णी, आता तुम्हाला लवकर बरं व्हायला हवं हं...!"

" डॉक्टर, कुणाकरता बरं व्हायचं !"

" वा.. वा ! आम्ही सारे आहोत की !"

मृणालनं मंद स्मित केलं आणि डोळे मिटले. नंतर चार–आठ दिवस डॉक्टर प्रत्येक राउंडचे वेळी मृणालशी थोडसं बोलल्या खेरीज पुढे जात नसत. कधी कधी तिच्या कॉटपाशी असलेलं स्टूल पुढे ओढून त्यावर बसून ते तिच्याशी हास्यविनोदही करीत. मृणाल अगदी उत्सुकतेनं त्यांच्या आगमनाची वाट पहात असायची.

" खरंच, डॉक्टर किती चांगले आहेत ! माझ्याशी किती किती चांगलं वागतात !"

ती मनाशीच म्हणाली. डॉक्टरांच्या परिचित बुटाचा आवाज ऐकायला येत होता. डॉक्टर राऊंडला आले होते.

" हं, काय मिस् कुळकर्णी ! हाउ डू यू डू ?"

मृणालनं नुसतीच मान हलवली.

" आम्हा सर्वांना तुम्ही हव्या आहात...." नंतर ते जवळ बसलेल्या आईकडे पाहून म्हणाले, " मी म्हणतो त्याप्रमाणे तुमच्या मुलीनं मनात आणलं तर ती लवकर बरी होईल..."

लहान मुलांसाठी उत्कृष्ट औषध।
डोंगरे बालामृत

" डॉक्टर ! तुम्हीच तिला आता चार गोष्टी सांगा...आमचं काही ऐकायला ती तयार नाही."

" मिस् कुळकर्णी, माझं ऐकणार ना ?"

" डॉक्टर ! मी बरं व्हावं असं तुम्हाला पण वाटतं का ?"

डॉक्टर थोडे थांबले. मग सावरून म्हणाले,

" हो, मलासुद्धा तसं वाटतं..."

आणि मग ते गडबडीनं पुढच्या पेशंटकडे वळले.

" मृणाल बाय, आमचं डाक्तर देवमानूस हायती. मोटार हाय, बंगला हाय, इस्पितळ हाय...पण डाक्तरीणबाई न्हाई " डॉक्टर पुढे गेल्यावर आया म्हणाली.

" का ग ? लग्न नाही केलं त्यांनी अजून ?"

" अवं, बायकु व्हती तुमच्यावाणी...पण ती गेली बिचारी बाळंतपणात ! तवापासून असंच हायती..."

" मग पुन्हा लग्न का करीत नाहीत ?"

" अवं..."

" शांताबाई--! " नर्सनं आयाला हाक मारली आणि बोलणं तेवढंच राहिलं.

..................

मृणालच्या विचारांना आता नवीनच दिशा मिळाली. काल माझ्या सहज बोलण्यामुळे डॉक्टर असे अस्वस्थ कां बरं झाले ? मला बरं वाटावं म्हणून ते इतका का प्रयत्न करतात ? ही माझ्या विषयाची त्यांची ओढ तर नाही ना ? माझं भाग्य इतकं मोठं आहे का ! त्यांचं प्रेम मला मिळू शकेल का ?

मग मृणालनं २–४ दिवस याच चिंतनात घालवले. तिनं सुंदर सुंदर कल्पनाचित्रं काढली आणि ती चित्रं निरखण्यात तिचे तासन् तास जाऊ लागले. तिची प्रकृतिही आता बरी होती. ती हळूहळू एकटीच, कुणाच्याही आधाराशिवाय व्हरांड्यापर्यंत जात येत होती.

" मिस कुलकर्णी, आता तुम्ही अगदी नॉर्मलला आला आहात – चार एक दिवसात तुम्हाला घरी पाठविणार आहे मी."

" डॉक्टर घरी जाऊन मी काय करू ? घरी माझं कोण आहे !"

" वा...वा ! तुमचे आई, दादा, बाबा नाहीत का ?"

" पण डॉक्टर...डॉक्टर ! तुम्ही येत जाल का आमच्या घरी ? ' मृणालच्या डोळ्यातून पाणी ओघळू लागलं. अंगाला कंप सुटला......

डॉक्टरांनी तिला हात देऊन हळूच कॉटवर बसवलं.

" मिस् कुलकर्णी ! असं काय करता ! अशानं पुन्हा प्रकृती घालवून बसाल...'

" डॉक्टर ! मी कुणाकरता बरी होऊ ! मला फसवलंय...मला फसवलंय...!"

मृणाल स्फुदायला लागली.

डॉक्टरांना अतीव सहानुभूती वाटली.

कॉटवर कोसळलेल्या मृणालला हलकेच थोपटून ते म्हणाले, एकानं फसवलं... पण बाकी सगळं जग तर चागलं आहे ना! आता पहिलं सर्व विसरायला हवं..."

"डॉक्टर, तुम्ही विसरणार नाही ना?"

"छे! छे! कसा विसरेन!"

"डॉक्टर..."

"अहं, आता काही बोलायचं नाही! अगोदर चांगल्या बऱ्या व्हा...काय!"

मृणाल स्निग्ध दृष्टीनं डॉक्टरांच्याकडे एकटक पहात राहिली. डॉक्टर पुढे गेले...तरी त्यांची मनोमय मूर्ती तिच्या डोळ्यापुढे होतीच.

..................

सकाळी उठल्या उठल्या दवाखान्यात आज खूपच गडबड होती. आज कशा-करता इतकी घाई? मृणालनं खिडकीतून बाहेर पाहिलं. सदू माळ्यानं बागेला पाणी दिलं होतं. अगदी प्रसन्न वाटत होतं. सदू फुलांचा सुंदर गुच्छ करण्यात अगदी मग्न झाला होता. वॉर्ड बॉय आपली कामं उरकून केव्हाच कुठेसा बाहेर गेला होता. नर्सेस एकमेकींशी हळू आवाजात काही बोलत होत्या. शांताबाईंनी रोजच्यापेक्षा आधीच पेशंट्सचे बेड्स नीट केले.

रामा फिनाईलने फरशा पुसू लागला. खिडक्यांचे पडदेही बदललेले दिसत होते.

"रामा, आज काय गडबड आहे उठल्याबरोबर?"

"मृणालबाय, तुम्हाला ठावं न्हाई? आज आमच्या मालकीणबाई यायच्या आहेत."

"म्हणजे--?"

डॉक्टरांच्या गाडीचा हॉर्न वाजला. नर्सेस, आया, रामा...सर्व धावतच बाहेर गेले.

कोण बरं ही मालकीणबाई? डॉक्टरांची आई तर नाही? मृणाल उठली. हळूहळू पावलं टाकीत ती व्हरांड्यात गेली.

आणि – हे काय? डॉक्टर एका सुंदर तरुणीचा हात धरून तिला अलगत उतरवून घेत होते!

मृणालला घाम फुटला. डोक्यात पुन्हा चक्रं फिरू लागली. 'मला फसवलं! मला फसवलं!' तिच्या मशाला कोरड पडली. डोळ्यापुढे अंधेरी आली. व्हरांड्यातच ती धाडकन् खाली कोसळली.

□ □ □

# पराजित – अपराजित



**बि. स. वाळिंबे** | **लेखांक : पंधरा**

हिटलरची भेट घ्यायला चेंबर्लेन अधीर झाला होता. त्यासाठीच तर त्याने ‘ मी जर्मनीला केव्हा येऊ ’ अशी अजीजी करणारे पत्र हिटलरला धाडले होते. चेकोस्लोव्हाकियाचा प्रश्न निकालात काढण्याची त्या नाझी हुकूमशहालाही घाई झालेली होती. त्यामुळे त्याने चेंबर्लेनच्या पत्राला तारेनेच होकार कळविला आणि त्याप्रमाणे पंधरा सप्टेंबरला चेंबर्लेन बर्खटेसगाडेन येथे येऊन पोचलादेखील. या चर्चेच्या वेळी फ्रेंच प्रधानमंत्र्याला आपल्याबरोबर नेण्याची चेंबर्लेनला गरज वाटली नाही एवढा त्याचा हिटलरवर विश्वास होता.

हिटलरचे पहिले दर्शन चेंबर्लेनला भलतेच प्रेरक वाटले. ज्याच्या शब्दावर कोणीही निःशंक मनाने विश्वास ठेवावा असा हा नेता आहे हे हिटलरसंबंधीचे चेंबर्लेनचे मत त्याच्या आठवणींमध्ये नमूद आहे.

चर्चेला प्रारंभ होताच, हिटलरने चेंबर्लेनला रोखठोक शब्दात सांगितले, ‘ सुडेटन जर्मनांना चेकोस्लोव्हाकियातुन फुटून निघण्याचा अधिकार मिळालाच पाहिजे. मग त्यापायी जागतिक युद्ध पेटलं तरी मला त्याची फिकीर नाही. ’

चेंबर्लेन उत्तरला, "तुमचं म्हणणं मला मान्य आहे. परंतु तसं जाहीर करण्यापूर्वी मला माझ्या मंत्रिमंडळाशी बोललं पाहिजे. त्याचप्रमाणे फ्रेंच सरकारचीही मंजुरी मिळवायला हवी."

"चेकोस्लोव्हाकियाची मंजुरी कशी मिळविणार?" हिटलरने खुलासा करून घेण्यासाठी मुद्दाम विचारले.

"चेक सरकारला विचारायचं काहीच कारण नाही," चेंबर्लेनने उत्तर दिले.

हिटलरला चेंबर्लेनकडून हवे होते ते उत्तर मिळाले.

सुडेटनलँडबाबत चेकोस्लोव्हाकियाच्या रागालोभाची पर्वा करण्याचे कारण नाही हा चेंबर्लेनचा खुलासा हिटलरच्या दृष्टीने महत्त्वाचा होता. फक्त त्यावर ब्रिटिश सरकारच्या मंजुरीचे अधिकृत शिक्कामोर्तब होणे आवश्यक होते. त्याचप्रमाणे हिटलरला फ्रान्सकडूनही तशी कबुली हवी होती. त्यामुळे तो चेंबर्लेनला म्हणाला, "पण हे तुमचं वैयक्तिक मत झालं. मला ब्रिटिश आणि फ्रेंच सरकारांकडून तशी हमी मिळाली पाहिजे."

चेंबर्लेनने उत्तर दिले, "तसंही घडून येईल. पण त्यासाठी मला लंडनला जाऊन आलं पाहिजे."

समजूतदारपणाचा आव आणीत हिटलर म्हणाला, "ठीक आहे. आपण पुन्हा भेटू."

हिटलरचा निरोप घेताना चेंबर्लेन म्हणाला, "मधल्या काळात जर्मनीनं लष्करी कारवाई करू नये असं माझं तुम्हाला सांगणं आहे."

"बरं. तेही मान्य," खुषीच्या स्वरात हिटलरने आश्वासन दिले.

दुसऱ्या दिवशी लंडनला परतताच चेंबर्लेनने आपल्या मंत्रिमंडळाची तातडीची बैठक बोलाविली. या बैठकीला चेंबर्लेनच्या आग्रहावरून लॉर्ड रन्कीमॅन हजर होता. सुडेटनलँडबाबत चेक सरकारने खळबळ करू नये असा चेंबर्लेनच्या वतीने प्रयत्न करण्यासाठी रन्कीमॅन प्रागला जाऊन आलेला होता. त्यामुळे आपल्या सहकाऱ्यांचे मन वळविण्याच्या दृष्टीने यावेळी आपल्यापेक्षा रन्कीमॅन याने बोलणे इष्ट ठरेल हे ओळखूनच चेंबर्लेनने त्याला हजर रहायला सांगितले होते. बैठकीला प्रारंभ होताच लॉर्ड रन्कीमॅन म्हणाला, "चेकोस्लोव्हाकियाच्या ज्या भागात जर्मनांचं बहुमत आहे तो सर्व प्रदेश जर्मनीत समाविष्ट झाला पाहिजे ही हिटलरची मागणी रास्तच म्हटली पाहिजे.'

हिटलरच्या न्यायप्रियतेसंबंधी रन्कीमॅन याला यावेळी इतके भडभडून आले की चेकोस्लोव्हाकियावर भलभलत्या अटी लादून आपण एका स्वातंत्र्यप्रिय आणि स्वाभिमानी राष्ट्राची आत्मघातकी अवहेलना करीत आहोत याचीही त्याला शुद्ध उरली नाही.

रन्कीमॅन म्हणाला, "जर्मनीविरुद्ध चेकोस्लोव्हाकियामध्ये काही व्यक्तींकडून

आणि पक्षांकडून जो अनुचित प्रचार होत आहे तो चेक सरकारनं तावडतोब बंद पाडला पाहिजे. त्याचप्रमाणे आपण जर्मनीवर आक्रमण करणार नाही अशीही चेकोस्लोव्हाकियानं हिटलरला ग्वाही दिली पाहिजे."

हा साराच प्रकार अजब होता.

कोण कोणावर आक्रमण करायला सिद्ध झालेले आहे हे आंधळ्यालाही जाणवावे अशी परिस्थिती असताना लॉर्ड रन्कीमॅन चेकोस्लोव्हाकियावर बेजबाबदार आरोप करीत होता. त्याला आपण हटकावे असे एकाही ब्रिटिश मंत्र्याला त्यावेळी वाटले नाही यावरून हिटलरसंबंधीच्या भयगंडाने ब्रिटिश नेतृत्व किती खचून गेले होते हे दिसून येते. त्यामुळे रन्कीमॅन बोलत होता आणि ब्रिटिश मंत्रिमंडळ मुकाटयाने ऐकत होते. सुडेटनलँडसंबंधीच्या हिटलरच्या सर्व मागण्या मान्य झाल्या पाहिजेत या चेंबर्लेनच्या भूमिकेची री ओढून ब्रिटिश मंत्रिमंडळाची ही महत्त्वपूर्ण बैठक समाप्त झाली.

आता फ्रान्सची मान्यता मिळविण्याचेच काम काय ते उरले होते. त्यासाठी चेंबर्लेननें दलादिए आणि बॉन्ने यांना लंडनला बोलावून घेतले. चेंबर्लेन दलादिएला म्हणाला, "माझ्या कल्पनेपेक्षाही परिस्थिती अधिक चिघळली असल्याचं मला हिटलरच्या बोलण्यावरून जाणवलं. सुडेटनलँडबाबतची त्याची मागणी मान्य करणं एवढा आपल्यापुढं एकच पर्याय आहे असं मला वाटतं."

दलादिए चेंबर्लेनच्या मानाने खूपच जागरूक होता. चेंबर्लेनचा हिटलरवरचा विश्वास अनाठायी आहे हे या फ्रेंच प्रधानमंत्र्याला पक्के ठाऊक होते. त्यामुळे चेंबर्लेनचे सारे बोलणे ऐकून घेतल्यानंतर तो म्हणाला, 'सुडेटनलँड हा नुसता बहाणा आहे सारा चेकोस्लोव्हाकिया गिळंकृत करण्यासाठीच हिटलर आसुसला आहे. बरं, चेकोस्लोव्हाकियावर हिटलरची भूक भागेल ही अपेक्षाही चुकीची आहे. रुमेनियाही त्याच्या नजरेला सलत आहे. अशा रीतीनं एकदा का मध्य आणि पूर्व युरोपवर प्रभुत्व प्रस्थापित झालं की ब्रिटन आणि फ्रान्स यांच्याशी झुंज घेण्याची हिटलर तयारी करू लागेल."

चेंबर्लेनने हाच प्रश्न बर्खटेसगाडेन येथल्या भेटीत हिटलरला विचारला होता आणि हिटलरने उत्तर दिले होते–'एकदा सुडेटनलँडचा प्रश्न निकालात निघाला की मी कशाचीही मागणी करणार नाही."

हिटलरच्या या आश्वासनावर विश्वास ठेवायला चेंबर्लेन तयार झाला होता. तीन वर्षांपूर्वी सार प्रांत जर्मनीत समाविष्ट करताना हिटलरने असेच आश्वासन दिले होते आणि तरीही चेंबर्लेन दलादिएला सांगत होता, "आपण हिटलरवर विश्वास ठेवला पाहिजे. तो आपल्या शब्दाला नक्कीच जागेल."

दलादिएला हा युक्तिवाद मुळीच पटत नव्हता. परंतु फ्रान्स आपल्या एकटयाच्या बळावर काही करून दाखवील या विश्वासाचाही त्याच्यापाशी अभाव होता. प्रधान-

मंत्र्याशी केवळ परिस्थितीचे अचूक विश्लेषण करणारी शोधक बुद्धी असून चालत नाही, त्या परिस्थितीला सामोरे जाणारे कसदार साहसही स्वभावात एकजीव झालेले असावे लागते. दलादिएच्या मवाळ प्रकृतीला ते झेपणारे नव्हते अन् म्हणूनच फ्रान्सच्या दृष्टीने भोवताली विपरित घटना घडत असतानाही, ब्रिटनचे बोट धरून वाटचाल करणाऱ्या फ्रान्सच्या नशिबी अवमानास्पद फरफट आली.

चेंबर्लेनचे म्हणणे पटत नसूनही शेवटी दलादिएने त्याच्या म्हणण्याप्रमाणे वागण्याचे ठरविले. त्यामुळे दुसऱ्या दिवशी चेंबर्लेन आणि दलादिए यांच्या वतीने राष्ट्राध्यक्ष बेनेस याच्याकडे खलिता रवाना झाला. त्यात म्हटले होते–' युरोपची शांतता धोक्यात येऊ नये म्हणून चेकोस्लोव्हाकियाने सुडेटनलँडवर उदक सोडायला तयार व्हावे असे आम्हाला वाटते. तसे करणे चेकोस्लोव्हाकियाच्याही हिताचे आहे. या बाबतीत लवकरच आम्हाला हिटलरशी बोलणी करायची असल्यामुळे आम्हाला चेकोस्लोव्हाकियाचे मनोगत ताबडतोब कळले पाहिजे."

बेनेस याने ही सूचना फेटाळून लावली.

तो म्हणाला, "अँग्लो-फ्रेंचांच्या या मतलबी सूचनेचे परिणाम ओळखण्याइतकं शहाणपण आमच्यापाशी अजून शिल्लक आहे. हिटलरच्या भीतीपायी ब्रिटन आणि फ्रान्स आज आम्हाला सुडेटनलँडचं दान करायला सांगत आहेत. उद्या ते सारा चेकोस्लोव्हाकिया हिटलरला देऊन टाका असंही आम्हाला सांगतील."

चेंबर्लेन आणि दलादिए यांच्या पत्राला बेनेसने जे उत्तर धाडले त्यात त्याने फ्रान्सच्या वर्मावर बोट ठेवले. "फ्रान्सने आमच्याशी मदतीचा जो करार केलेला आहे त्याचे काय" या बेनेसच्या प्रश्नाला दलादिएपाशी उत्तर नव्हते. त्यामुळे बेनेसने हा प्रश्न विचारून पुढे लिहिले होते–' चेकोस्लोव्हाकिया हिटलरला शरण गेला तर त्यामुळे फ्रान्सच्या प्रतिष्ठेचेही दिवाळे वाजणार आहे हे लक्षात घ्या."

फ्रान्सने आपल्याशी दगलबाजी करावी याचा बेनेसला अतिशय संताप आला होता. तरीही आपण एकट्याने त्रागा करून काहीच साध्य होणार नाही हे ओळखण्याइतका तो भानावर होता. त्यामुळे पत्राच्या शेवटी त्याने सुचविले– ' सुडेटनलँडचा प्रश्न १९२५ मधल्या जर्मन-चेक करारानुसार लवादाकडे सोपवायला आमची तयारी आहे."

बेनेस याच्या या पत्राला दलादिए याने जे उत्तर धाडले त्यात तर फ्रान्सने विश्वासघाताचा कळस गाठला होता. दलादिए याने लिहिले–' सुडेटनलँडबाबतची मी आणि चेंबर्लेन यांनी केलेली सूचना तुम्ही फेटाळून लावली असल्यामुळे उद्या जर हिटलरने तुमच्यावर स्वारी केली तर त्याची जबाबदारी सर्वस्वी चेक सरकारवरच राहील. तुम्ही जर आपले हेकेखोर धोरण यापुढेही असेच चालू ठेवणार असाल तर फ्रान्सकडून तुम्ही मदतीची अपेक्षा करणे व्यर्थ आहे."

म्हणजे चेकोस्लोव्हाकियावरील हिटलरच्या संभाव्य आक्रमणाबद्दल चेक सर-

कारच दोषी  ठरणार आहे, हिटलर नव्हे अशी फ्रेंच प्रधानमंत्र्याने आपल्या मनाची समजूत घातली होती.

बेनेस याने आपला हट्ट सोडावा आणि हिटलर जे काही मागत आहे ते त्याला मुकाटयाने देऊन टाकावे यासाठी  बेनेसचे उत्तर आल्यावरही चेंबर्लेन आणि दलादिए यांचा प्रयत्न सुरू होता. त्यासाठी प्रागमधील ब्रिटिश राजदूत सर बेसिल न्यूटन आणि फ्रेंच राजदूत लॅक्रो यांनी वीस सप्टेंबरला रात्री दोन वाजता बेनेसला झोपेतून उठवून सांगितले– 'सुडेटनलँड जर्मनीत समाविष्ट  करायला चेकोस्लोव्हाकियानं आताच्या आता  मान्यता दिली नाही तर चेकोस्लोव्हाकियाच्या भवितव्याबद्दल आम्ही कोणतीही ग्वाही देऊ शकणार नाही.'

अँग्लो–फ्रेंच राजदूतांचे ते शब्द ऐकताच बेनेस अक्षरशः कोसळला. पायाखालची जमीन हादरत आहे असा त्याला भास झाला. कसाबसा तो खुर्चीवर बसला. काही क्षण तर त्याच्या तोंडातून शब्दच फुटेना. रुमालानें कपाळावरचा घाम पुसत आणि हुंदके दाबत बेनेस त्या अँग्लो–फ्रेंच राजदूतांना म्हणाला, "मला माझ्या मंत्रिमंडळाशी विचारविनिमय करण्याइतकी तरी सवड द्याल ना!"

न्यूटन आणि लॅक्रो बेनेसच्या निवासस्थानामधून बाहेर पडले तेव्हा पहाटेचे पावणेचार वाजले होते. आणखी दहाबारा तासांनी हे दोघेजण पुन्हा बेनेसला भेटायला येणार होते आणि त्यावेळी त्याना बेनेसकडून उत्तर हवे होते.

गेली कित्येक शतके चेक जनता स्वातंत्र्यासाठी धडपडत होती. स्वातंत्र्याचा लाभ होऊन आता कोठे एकोणीस वर्षे झाली होती आणि पुन्हा गुलामगिरीचे संकट उभे ठाकले होते. हिटलरसारखा उद्दाम शेजारी दररोज तशा धमक्या देत असतानाही चेक जनतेचे धैर्य हरपले नव्हते. परंतु ऐन संकटाच्या क्षणी मित्रराष्ट्रांनी आपल्याला एकाकी अवस्थेत सोडल्यानंतर आपण काहीही करू शकत नाही हे चेकोस्लोव्हाकियाला कळून चुकले. दिवसभर बेनेस आणि त्याचे सहकारी विचार करीत होते. परंतु दुसरा कोणताच मार्ग सापडेना. सगळयाच बाजूंनी कोंडी झाली होती. त्यामुळे सायंकाळी पाच वाजता बेनेसने जाहीर केले– "सुडेटनलँडबाबतची अँग्लो–फ्रेंचांची सूचना आम्हाला मान्य आहे."

आपला हा निर्णय ऐकताच आपल्या देशबांधवांचा संताप अनावर होणार आहे हे बेनेसला माहीत होते. आपल्या संतप्त देशबांधवांची समजूत काढण्यासाठी हा धीरगंभीर राष्ट्रनेता प्रागमधल्या नभोवाणी केंद्रावर गेला आणि चेक जनतेला उद्देशून तो म्हणाला, "एकाकी अवस्थेत सापडलेल्या राष्ट्राला नमतं घेण्याशिवाय गत्यंतरच नसतं. आपल्या मित्रांनी आपला जो विश्वासघात केला त्याची किंमत आपल्याला ही अशी मोजावी लागत आहे, दुसरं काय?"

आपल्या सरकारच्या कचखाऊ वृत्तीचा जनरल फुशे या प्रागमधल्या फ्रेंच सेनाधिकाऱ्याला इतका राग आला की त्याने आपला फ्रेंच पासपोर्ट फाडून टाकला आणि

तो चेक सेनेत दाखल झाला. चेक सरकारवर आपल्या प्रधानमंत्र्याने अश्लाघ्य दडपण आणावे ही गोष्ट रेनाँ आणि मान्दे या तडफदार नेत्यांना बिलकुल आवडली नाही आणि म्हणून त्यांनी आपल्या मंत्रिपदाचे राजीनामे सादर केले.

विन्स्टन चर्चिल याची प्रतिक्रियाही अशीच होती. तो म्हणाला, "चेकोस्लोव्हाकियाच्या फाळणीबाबत ब्रिटन आणि फ्रान्स यांनी चेक सरकावर आणलेले दडपण म्हणजे दोन लोकसत्ताक राष्ट्रांनी नाझी जर्मनीच्या लष्करशाहीपुढे घातलेलं सरळ-सरळ लोटांगण आहे. या अशा शरणागतीनं आपण सुरक्षित राहू अशी जर ब्रिटन–फ्रान्सची कल्पना असेल तर तो भ्रम आहे. उलट, या असल्या भेकड धोरणामुळं आपण संकटाला निमंत्रण देत आहोत.'

परंतु चर्चिलचा हा इशारा ऐकण्याची चेंबर्लेन आणि दलादिए यांना त्यावेळी मुळीच गरज भासली नाही. चेकोस्लोव्हाकियाने, अनिच्छेने का होईना, आपली सूचना मानली याबद्दल चेंबर्लेनला तर इतका आनंद झाला की हिटलरला आपण केव्हा भेटतो असे त्याला झाले. तो लागलीच गोडेसबर्गकडे रवाना झाला.

एका आठवड्याच्या आत घडून आलेली ही दुसरी चेंबर्लेन–हिटलर भेट होती.

पंधरा सप्टेंबरला चेंबर्लेनने बर्खटेसगाडेन येथे हिटलरची भेट घेऊन सुडेटनलँड-बाबत घाई न करण्याची विनंती केली होती. चेकोस्लोव्हाकियाने आपली मागणी मान्य केल्याची बातमी सांगायला आज बावीस सप्टेंबरला तो ऱ्हाईनच्या तीरा-वरच्या गोडेसबर्ग येथे येऊन पोचला होता. सायंकाळी पाच वाजता हिटलरच्या भेटीला जाताना चेंबर्लेन मोठ्या खुषीत होता. हिटलरला जे अशक्य वाटत होते ते आपण शक्य करून दाखविलेले असल्यामुळे आपण आता सांगू तसा हिटलर वागेल याबद्दल चेंबर्लेनला शंका नव्हती.

चेंबर्लेन हिटलरला म्हणाला, "आमची विनंती चेक सरकारनं मान्य केली असल्याची बातमी तुम्हाला कळली असेलच."

इतक्या अल्पावधीत चेकोस्लोव्हाकियाकडून आपली मागणी मान्य होईल याची हिटलरलाही कल्पना नसावी. त्यामुळे खात्री करून घेण्यासाठी त्याने विचारले, "सुडेटनलँड ताबडतोब जर्मनीत विलीन करायला ब्रिटन, फ्रान्स आणि चेकोस्लोव्हाकिया या तिघांचीही मंजुरी आहे असाच याचा अर्थ होतो ना ?"

"होय."

हिटलरने लगेच आपला पवित्रा बदलला. तो म्हणाला, "माफ करा, पण मधल्या काळात अशा काही घटना घडल्या आहेत की त्यामुळे तुमची योजना मला मान्य करता येणार नाही. मला सुडेटनलँडमध्ये लष्कर धाडलंच पाहिजे."

चेंबर्लेनचा आनंद कोठल्या कोठे मावळला होता. विस्मय आणि संताप या भावना त्याच्या चेहेऱ्यावर उमटल्या होत्या. आपल्यासमोर बसलेला हा माणूस

क्षणार्धात एवढा बदलू शकतो हे पाहून चेंबर्लेनचे सारे शरीर संतापाने थरथरू लागले. पण आता संतापूनही काही उपयोग नव्हता. हिटलरची मनधरणी करण्याशिवाय आपल्याला गत्यंतर नाही हे चेंबर्लेनला जाणवले. केविलवाण्या स्वरात तो हिटलरला म्हणाला, "माझं सारं राजकीय जीवन धोक्यात घालून मी तुमची मागणी मान्य केली, माझ्या मित्रराष्ट्रांना मान्य करायला लावली. भेकडपणापायी मी चेकोस्लोव्हाकिया हिटलरला विकून टाकत आहे अशी माझ्या देशबांधवांकडून माझ्यावर टीका होत असतानाही, युरोपमधली शांतता टिकावी या एकाच उद्देशानं मी इथं आलो आणि आता तुम्ही सरळ सांगता आहात की मला तुमची योजना मान्य नाही म्हणून! मी माझ्या देशबांधवांना जाऊन काय सांगू? फ्रान्सला काय सांगू? चेकोस्लोव्हाकियाला काय सांगू?"

ब्रिटिश प्रधानमंत्र्याच्या या आवाहनाचा हिटलरवर काहीही परिणाम झाला नाही. साऱ्या जगभर ज्या देशाचे साम्राज्य पसरलेले आहे अशा देशाच्या प्रधानमंत्र्याची तडफड पाहताना, सूड घेण्याचा ध्यास लागलेल्या हिटलरला चमत्कारिक समाधान लाभत होते. त्यामुळे चेंबर्लेनचे सांत्वन करायचीही त्याला गरज वाटली नाही.

चेंबर्लेन तेथून बाहेर पडताच हिटलरने आपल्या सेनाधिकाऱ्यांना बोलावून घेऊन सांगितले, "एक ऑक्टोबरच्या आत सुडेटनलँड जर्मनीत समाविष्ट करण्याच्या दृष्टीनं आपल्याला आता सिद्ध असले पाहिजे."

हिटलरने सेनाधिकाऱ्यांना दाखविलेल्या नकाशामध्ये सुडेटनलँडची सीमारेषा पहिल्यापेक्षा बरीच पुढे नेण्यात आलेली होती.

निवासस्थानी परतल्यानंतर प्रथम लंडनला आणि नंतर पॅरिसला फोन करून चेंबर्लेनने आपली मध्यस्थी फसल्याची कबुली दिली. तो दलादिएला म्हणाला, "हिटलरच्या हटवादी धोरणामुळे चेकोस्लोव्हाकियाच्या प्रश्नाची शांततामय सोडवणूक होणं मला तरी अशक्य दिसत आहे. तरी पण उद्या पुन्हा मी प्रयत्न करणार आहे."

चेंबर्लेनने ती रात्र अस्वस्थ मनःस्थितीत व्यतीत केली. दुसऱ्या दिवशी सकाळी त्याने हिटलरला भेटण्याऐवजी पत्र धाडले–'सुडेटनलँडचा लष्करामार्फत ताबा घ्यायला तुम्ही अधीर झालेले आहात. परंतु त्याला चेक सरकारची मंजुरी मिळणे अशक्य आहे."

हिटलरने उत्तर धाडले–"मी जे एकदा ठरवतो त्यात बदल करायची मला सवय नाही."

चेंबर्लेनने दुसरे पत्र लिहिले–"तुम्ही तुमची योजना मला लिहून कळवा. त्याचप्रमाणे तुम्हाला हव्या असलेल्या प्रदेशाचा नकाशाही त्या पत्रासोबत धाडून द्या. म्हणजे मग तुमच्या मनात काय आहे हे मला चेक सरकारला कळविता येईल.'

त्या दिवशी रात्री चेंबर्लेन निरोप घेण्यासाठी हिटलरला भेटायला गेला. त्या वेळी हिटलरने आपल्याला चेकोस्लोव्हाकियामधील कोणता प्रदेश हवा आहे या-संबंधीचा नकाशा चेंबर्लेनच्या हाती दिला. नकाशासोबत लिहिलेल्या पत्रात हिटलरने म्हटले होते–' आमची मागणी स्पष्ट आहे. जर्मनीला हव्या असलेल्या प्रदेशातून चेकोस्लोव्हाकियन अधिकाऱ्यांनी सव्वीस सप्टेंबरला सकाळी आठ वाजल्यापासून बाहेर पडायला प्रारंभ करावा. अठ्ठावीस सप्टेंबरला दुपारी दोन वाजायच्या आत सर्व चेकोस्लोव्हाक अधिकारी आणि नागरिक तेथून बाहेर पडले तर ठीकच नाही तर आम्हाला आमच्या लष्कराचा वापर करावा लागेल."

हिटलरची ही धमकी ' गोडेसबर्ग योजना ' म्हणून ओळखली जाते. ही ' गोडेस-बर्ग योजना ' पाहताच चेंबर्लेन पुन्हा हादरला. तो हिटलरला म्हणाला, " ही काही योजना आहे. ही तर सरळ सरळ धमकीच आहे."

" छे," हिटलर उत्तरला, " या पत्राच्या वरती आम्ही चक्क ' आमचे निवेदन ' असं म्हटलं आहे ना ?"

हिटलर आणि चेंबर्लेन यांचे बोलणे सुरू असतानाच एका सेवकाने हिटलरला चिठ्ठी आणून दिली. त्यावेळी डॉ. श्मिड्ट् हा दुभाषा तेथे हजर होता. हिटलर श्मिड्टला म्हणाला, " या चिठ्ठीतल्या मजकुराचा इंग्रजी अनुवाद तू चेंबर्लेनला वाचून दाखव."

डॉ. श्मिड्ट वाचू लागला, " बेनेस याने आताच सार्वत्रिक लष्करभरतीचा हुकूम दिलेला आहे."

क्षणभर तेथे भयाण शांतता पसरली.

थोड्या वेळाने हिटलर म्हणाला, " आता हे सारं प्रकरण निकालात निघालेलं आहे असंच मी मानतो. सुडेटनलँड जर्मनीला देऊन टाकायला चेकोस्लोव्हाकियाची तयारी नाही हे पुन्हा स्पष्ट झालेलं आहे. आम्हाला आमचा मार्ग मोकळा झालेला आहे."

चेंबर्लेन म्हणाला, " पण आधी जर्मनीकडून आगळीक घडलेली आहे. तुम्ही तुमचं सैन्य चेक सीमेजवळ नेऊन ठेवल्यामुळे स्वसंरक्षणासाठी चेकोस्लोव्हाकियाला हे पाऊल उचलावं लागलं आहे."

आपल्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे आवाज चढवीत अन् मुठी आवळत हिटलर ओरडला, " हे खोटं आहे. चेकोस्लोव्हाकियाची लष्करी तयारी गेले बरेच दिवस चालू असल्याचं आम्हाला कळलेलं आहे."

चेंबर्लेन उत्तरला, " आता यापुढे बोलणं करण्याजोगं काही राहिलेलंच नाही. संघर्ष टळावा म्हणून मी माझ्या परीनं खूप प्रयत्न केले. पण त्यात यश आलं नाही. इथं येताना मी ज्या आशा मनात बाळगल्या होत्या त्यांचा पार चक्काचूर झालेला आहे."

आता आपलें नेहमीचे तंत्र अवलंबण्याची वेळ आलेली आहे हे हिटलरने ओळखले. मोठ्या प्रयासाने आवाजात मार्दव आणीत तो म्हणाला, " मी सहसा माघार घ्यायला तयार नसतो. परंतु तुमची निराशा करणंही माझ्या जिवावर आलं आहे. तुम्हाला समझोत्याचा प्रयत्न करण्यासाठी सवड मिळावी म्हणून मी एक तडजोड सुचवितो. मी माझ्या मागणीत अठ्ठावीस सप्टेंबरचा उल्लेख केलेला आहे. त्याऐवजी एक ऑक्टोबरपर्यंत चेक अधिकाऱ्यांनी आणि नागरिकांनी सुडेटनलँडमधून बाहेर पडावं."

खरे म्हणजे ही तडजोड नव्हतीच. एक तर आपली मूळ मागणी हिटलरने सोडलेली नव्हती. शिवाय त्याच्या मूळच्या योजनेमध्ये एक ऑक्टोबर हाच दिवस नमूद केलेला होता. परंतु तेवढ्यावरही चेंबर्लेनला हायसे वाटले. तो म्हणाला, " मी आताच काही हमी देऊ शकत नाही. पण तुम्ही दिलेली सवलत मी चेक सरकारला अवश्य कळवीन."

दुसऱ्या दिवशी लंडनला परतताच चेंबर्लेनने आपल्या मंत्रिमंडळाला हिटलरची मागणी समजावून सांगितली आणि ब्रिटन, फ्रान्स आणि चेकोस्लोव्हाकिया यांनी ती मंजूर करावी हे आपले मतही सांगून टाकले. परंतु चेंबर्लेनच्या सहकाऱ्यांना त्याचा हा विचार मान्य झाला नाही. ते म्हणाले, " जो जो आपण हिटलरचं ऐकत जावं तो तो त्याची मागणी वाढत चालली आहे. तो तर आपलं काहीच ऐकायला तयार नाही. मग आपण तरी सारखं नमतं का घ्यायचं ?"

चेंबर्लेन उत्तरला, " युद्ध टाळण्याचा तोच एकमेव मार्ग आहे म्हणून !"

चेकोस्लोव्हाकियावर लष्करी आक्रमण करण्याची हिटलरची सिद्धता झालेली आहे ही बातमी चेंबर्लेनकडून कळताच दलादिए यानेही सार्वत्रिक सैन्यभरती करण्याचे ठरविले. एका रात्रीत साऱ्या पॅरिसभर पत्रके चिकटविण्यात आली—' देशाच्या संरक्षणासाठी ताबडतोब सैन्यात दाखल व्हा.' १९१४ नंतर यावेळी प्रथमच फ्रेंच नेतृत्वाला लष्करभरतीची गरज जाणवू लागली होती. ही पत्रके पाहताच पॅरिसमधल्या जर्मन राजदूताने बर्लिनला कळविले—" फ्रान्सने लष्करी तयारीला प्रारंभ केलेला आहे."

फ्रेंच सरकारने यावेळी कितीही उत्साह दाखविला तरी फ्रान्समधील जनमत युद्धाला अनुकूल नाही हे पॅरिसमधला ब्रिटिश राजदूत फिप्स याला पक्के ठाऊक होते. त्यामुळे चौदा डिव्हिजन फ्रेंच सैन्य चोवीस सप्टेंबरला जर्मन सीमेनजीकच्या प्रदेशाकडे कूच करीत असतानाही फिप्स याने आपल्या परराष्ट्रखात्याला कळविले— " फ्रेंच सरकारने लष्करी तयारी आरंभिली असली तरी संसदेच्या मंजुरीशिवाय फ्रेंच सरकारला युद्धाची घोषणा करता येणार नाही. फ्रेंच लोकप्रतिनिधी युद्धाला मंजुरी देणे शक्यच नाही. कारण वरकरणी कोणी काहीही बोलत असले तरी मूठभर लोक सोडले तर सर्वसामान्य फ्रेंच माणूस युद्धाबद्दल उदासीन आहे. म्हणून फ्रान्सच्या लष्करी तयारीमुळे आपण गैरसमज करून घेता कामा नये."

पंचवीस सप्टेंबरला रविवार होता. त्यादिवशी चेंबर्लेनशी वाटाघाटी करण्यासाठी दलादिए लंडनला जाणार होता. जाण्यापूर्वी त्याने आपल्या मंत्रिमंडळाची बैठक बोलाविली. या बैठकीत हिटलरच्या 'गोडेसबर्ग योजने'चा विचार झाला. ही योजना कार्यवाहीत आणायला हिटलरला मुभा दिली तर सर्वच बाजूंनी चेकोस्लोव्हाकियाची कोंडी होणार असल्यामुळे फ्रेंच मंत्रिमंडळाने ही योजना फेटाळून लावली. अशा रीतीने आपल्या सहकाऱ्यांचे मत अजमावल्यानंतर दलादिए आणि बॉन्ने लंडनला रवाना झाले. रात्री नऊ वाजता 'दहा, डाऊनिंग स्ट्रीट' येथे चेंबर्लेन, हॅलिफॅक्स, दलादिए आणि बॉन्ने यांची चर्चा सुरू झाली.

'गोडेसबर्ग योजने'बाबत हिटलर किती आग्रही आहे हे चेंबर्लेनने विशद केल्यानंतर दलादिए म्हणाला, "आपण आता तरी हिटलरला रोखलंच पाहिजे."

परंतु तसे करणे शक्य होणार नाही असे चेंबर्लेनचे मत पडले. हिटलरशी झुंज घेण्याइतकी आपली आणि फ्रान्सची मुळीच तयारी झालेली नाही याबद्दल चेंबर्लेनची इतकी खात्री झाली होती की कोणत्याही परिस्थितीत युद्ध टाळलेच पाहिजे एवढेच तो जाणत होता. चेंबर्लेनने आपल्या या मताचा पुनरुच्चार करताच दलादिए म्हणाला, "हिटलरची नवी योजना माझ्या मंत्रिमंडळानं एकमतानं फेटाळली आहे यावरून आमचं मनोगत तुमच्या ध्यानी येईल. मी पुन्हा सांगतो, पसतीस लाख सुडेटन जर्मनांबद्दल चिंता वाटते म्हणून हिटलर व्यग्र झाला आहे असं नाही. चेकोस्लोव्हाकियानं आपलं गुलाम व्हावं यासाठी तो आसुसला आहे. अशा रीतीनं एक एक देश घशात घालत साऱ्या युरोपचे आपण स्वामी व्हावं या दृष्टीनं हिटलरचं पाऊल पडत आहे."

हिटलरने अठ्ठावीस सप्टेंबरची मुदत एक ऑक्टोबरपर्यंत पुढे ढकलायला संमती दिली याचीच चेंबर्लेन तारीफ करीत होता. तो पुढे तर असेही म्हणाला, "सुडेटनलँडमध्ये दंगाधोपा होऊ नये एवढ्यासाठीच तिथं लष्कर धाडायचा हिटलरचा विचार आहे."

चेंबर्लेनची ही हिटलर-प्रशस्ती उबग आणणारी होती. एकदा एखादा राष्ट्रनेता पराभूत मनोवृत्तीने खचून गेला की शत्रूबद्दल तो किती ममत्व दाखवू लागतो, शत्रूच्या प्रत्येक कृतीचे समर्थन करण्यासाठी तो किती धडपड करतो याचाच हा नमुना होता.

दलादिए त्या मानाने बराच भानावर होता. तो चेंबर्लेनला म्हणाला, 'हिटलरची नवी योजना म्हणजे चेकोस्लोव्हाकियाचा विनाश करण्याचा डाव आहे. त्याचा हा डाव यशस्वी झाला की तो साऱ्या युरोपला डोईजड होईल, म्हणून सुडेटनलँडमध्ये जर्मन सैन्याला प्रवेश करू द्यायची त्याची मागणी आपण मान्य करता कामा नये.'

दलादिए आपले ऐकत नाही हे पाहून चेंबर्लेनने त्याला विचारले, 'तुम्ही काय करायचं ठरविलं आहे?'

दलादिएने उत्तर दिले –" आपण दिलेली पहिली योजना मान्य करा असे आपण हिटलरला बजावलं पाहिजे."

"आणि समजा हिटलरनं नकार दिला तर?"

"तर मग आपणही स्वस्थ बसता कामा नये."

"मला वाटतं, आपण हिटलरवर थोडा तरी विश्वास ठेवला पाहिजे."

"तसं करायला माझी मुळीच तयारी नाही."

'परिस्थिती अशी निर्माण झाली आहे की त्रागा करून भागणार नाही. प्रत्यक्षात काय घडत आहे हे ध्यानात घेतलं पाहिजे. 'गोडेसबर्ग योजना' ही आपली अखेरची मागणी आहे असं हिटलरनं मला आश्वासन दिलं आहे. त्यामुळे आपण जर त्याची ही मागणी मान्य केली नाही तर तो लगेच चेकोस्लोव्हाकियामध्ये सैन्य घुसवील. तसं घडलं तर फ्रान्स जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारणार आहे काय?"

"होय. आम्हाला आमची जबाबदारी टाळता येणार नाही."

"ठीक आहे. पण ती जबाबदारी पार पाडण्याची फ्रान्सची तयारी आहे काय? तुमचे सेनानी युद्धाचं आव्हान स्वीकारायला सिद्ध आहेत ना?"

"होय."

"म्हणजे जर्मनीविरुद्ध झुंज घेण्याची फ्रान्सची सिद्धता झालेली आहे असंच म्हटलं पाहिजे, होय ना?"

ब्रिटिश नेत्यांच्या या मूर्ख प्रश्नांना उत्तर देता देता दलादिएची सहनशीलता संपुष्टात आली. तो चिडून म्हणाला. "आम्ही लष्कराची जमवाजमव कशासाठी करीत आहोत! तशीच वेळ आली तर जर्मनीवर चढाई करण्याचीदेखील आम्हाला तयारी ठेवली पाहिजे. त्याचप्रमाणे जर्मनीच्या औद्योगिक आणि लष्करी केंद्रांवर बाँबफेक करण्याची कामगिरी आमच्या विमानदलाला पार पाडावी लागेल."

यावेळी दलादिएचा आवाज चढला होता. हिटलरला रोखायचे असेल तर आता आपण नेट धरला पाहिजे असे दलादिए पदोपदी सांगत असताना ब्रिटिश नेते मख्खपणाने त्याचे सारे बोलणे नुसते ऐकून घेत होते. 'होय, आम्हीही तुमच्याबरोबर उभे राहतो' असे म्हणायला ते तयार नव्हते. त्यामुळे तर दलादिए अधिकच भडकला. तो म्हणाला, "बाकी साऱ्या गोष्टी बाजूला ठेवल्या तरी आपल्यावरच्या नैतिक जबाबदारीचा आपण विचार करायला नको का? आपण चेकोस्लोव्हाकियाला किती मानहानी सहन करायला सांगणार आहोत? आणि एवढं करूनही हिटलरचं समाधान होत नाही हे आता आपल्याला अनुभवानं कळून चुकलं आहे. हिटलरला खूष करण्यासाठी ब्रिटन कोणत्या मर्यादेपर्यंत जाणार आहे हे तरी आम्हाला कळू द्या. तुमच्याप्रमाणे आम्हालाही शांतता हवी आहे. परंतु हिटलरनं काहीही मागावं आणि शांतता टिकविण्याच्या ध्यासापायी आपण ते निमूटपणानं मान्य करावं हे आम्हाला मंजूर नाही. हिटलरची प्रत्येक मागणी मान्य करायला

आणि काही बांधलेलो नाहीत. हिटलरनं आपलं म्हणणं एकदा तरी मानलं आहे का? मग शांतता-रक्षणाची सारी जबाबदारी केवळ आपल्यावरच आहे असं मानायचं आपल्याला तरी काय कारण आहे?”

रात्र बरीच होऊन गेली होती. त्यामुळे ही चर्चा दुसऱ्या दिवशी सकाळी पुढे सुरू करण्याचे ठरले. रात्रभर चेंबर्लेन दलादिएच्या भूमिकेसंबंधी विचार करीत होता. चेकोस्लोव्हाकियाबाबतची आपली जबाबदारी पार पाडण्याचा फ्रान्सचा निश्चय झाला असल्याबद्दल दलादिएच्या बोलण्यावरून त्याची खात्री पटली होती. त्यामुळे हिटलरने चेकोस्लोव्हाकियावर आक्रमण केले तर ते आक्रमण रोखण्यासाठी आपण फ्रान्सच्या बाजूने उभे राहिले पाहिजे असे त्याला वाटू लागले.

त्यामुळे दुसऱ्या दिवशी चेंबर्लेनने दलादिएला सांगितले, “मी आता सर होरेस विल्सन याला बर्लिनला पाठवत आहे. सुडेटनलँडबाबत जर्मनीनं आततायी मार्ग न स्वीकारता चेक सरकारशी रीतसर वाटाघाटी सुरू कराव्यात असं मी हिटलरला सुचविणार आहे. हिटलरनं ते मान्य केलं तर ठीकच. नाहीतर विल्सन आपल्या-जवळचा दुसरा खलिता हिटलरला वाचून दाखवील.”

दलादिएने विचारले, “त्या खलित्यात तुम्ही काय म्हटलं आहे”


चेंबर्लेनने त्या खलित्यात म्हटले होते – ‘जर्मनीनं चेकोस्लोव्हाकियावर हल्ला चढविला तर आम्ही स्वस्थ बसणार नाही असं फ्रान्सनं आम्हाला कळविले आहे. त्यामुळे जर चेकोस्लोव्हाकियावरून जर्मनी आणि फ्रान्स यांच्यात युद्ध सुरू झाले तर ब्रिटन फ्रान्सच्या बाजूनें उभे राहील.”


हिटलरबाबतच्या ब्रिटनच्या धोरणात प्रथमच बदल होत होता. त्याचप्रमाणे फ्रान्सच्या मैत्रीचे महत्त्वही बऱ्याच दिवसांनंतर चेंबर्लेनला उमगले होते. चेंबर्लेनच्या ताज्या खलित्यासंबंधी हिटलरची काय प्रतिक्रिया होईल याचा मनाशी अंदाज बांधत दलादिए पॅरिसला परतला.

येत्या दोनचार दिवसात काय घडते यावर बरेच काही अवलंबून होते.

(क्रमशः)

## पुढील लेखांक : शनिवार दिनांक १९ सप्टेंबर अंकात





# गणुराया आणि चानी

श्री. गंगाधर गाडगीळांच्या नंतरच्या पिढीतील कथात्मक वाङ्मयाचा विचार करत असताना श्री. चिं. त्र्यं. खानोलकर यांच्या कथा-दीर्घकथा-कादंबरीलेखनाचा आवर्जून विचार करावा लागतो. या लेखकाचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व विलक्षण गुंतागुंतीचे असल्यामुळे त्याबद्दल नेमकी विधाने करणे आज तरी अवघड आहे. श्री. खानोलकरांच्या कथा-कादंबऱ्यात एक घटनांच्या पलीकडे जाणारे अगम्य विलक्षण वातावरण असते. या लेखकाच्या शब्दकळेतून एकीकडे रम्य स्वप्नजगताचे आकर्षण येते आणि दुसरीकडे समाजजीवनातील चित्रमय संदर्भ येतात. मराठी कथावाङ्मयात आजकाल लोकप्रिय झालेल्या प्रादेशिकतेचा श्री. खानोलकरांनी अधिक अर्थपूर्ण वापर केलेला दिसतो. श्री. श्री. ना. पेंडसे आणि श्री. गो. नी. दांडेकर यांच्या लेखनातील कोकणची पार्श्वभूमी, श्री. खानोलकरांच्या लेखनात, त्यांच्या अनुभवाला पोषक असे मंतरलेले वातावरण निर्माण करताना आढळते.

'गणुराया' आणि 'चानी' या श्री. खानोलकरांच्या दोन नव्या दीर्घकथा त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वातील निरर्थकतेची आधुनिक जाणीव आणि रम्यत्वाचे आकर्षण, ही दोन्ही व्यक्त करतात. 'गणुराया' या दीर्घकथेचा नायक गणुराया यापूर्वी अनेकदा श्री. खानोलकरांच्या कथात्मक वाङ्मयात आपल्याला भेटलेला आहे. आजच्या नायकांच्या ठिकाणी असणाऱ्या अलिप्ततेच्या

ही केवळ एक
मधली स्थिती असू दे

जाणीवेश येथे श्री. खानोलकरांनी, भारतीय कुटुंबपरंपरेतून उद्‌भवलेल्या 'मोठा कर्ता मुलगा' या जबाबदारीच्या जाणीवेचा अर्थपूर्ण स्तर निर्माण केला आहे. अशा प्रकारची कथावस्तू असणाऱ्या कथेत घटना, सुसंगत निवेदन इत्यादींची अपेक्षाच नाही.

'गणुराया' या कथेचे निवेदन काहीसे गद्यकाव्याच्या पद्धतीचे आहे. मात्र गणुराया आणि त्याचे वडील यांच्या पत्रव्यवहारातून रचले जाणारे कथानक, घराण्यातील वैमनस्य, त्याचा फायदा घेणारा लोभी मित्र इ. इ. नेहमीच्या प्रादेशिक कथेसारखे आहे. घराविषयी असणारे आपले कर्तव्य म्हणून गणुराया 'तिच्या' आईवडिलांकडून हुंडा मागतो. तो हुंडा त्याला दिला जातो; पण मुलगी दिली जात नाही. तिच्या मनात येते : 'त्याचा काहीसुद्धा नियम नाही, नेम नाही. त्याच्या पायाखाली वाळवंट आहे. चौकटीतलं त्याला काहीच नकोय. सगळंच कोरं हवंय त्याला. त्याचे नियम स्वतःचे त्याचेच आहेत' (पृ. ३८). गणुराया शेवटी एकटाच उरतो, ती तिची होते, पैसे बाबांचे होतात. या कथेच्या शेवटी येणारे पत्र कथेच्या वातावरणाला विशोभित असे भडक वाटते. गणुरायाचा मित्र वेडा लखू, 'तिच्या' जिन्याखालचा केशव, 'तिला' समुद्रावर भेटणारा खोत या साऱ्या पात्रांभोवती असणारे विचित्रतेचे वलय श्री. खानोलकरांच्या वाचकांना परिचित आहे.

ही कथा वाचत असताना अनेक अर्थपूर्ण बिंदू जाणवतात; पण संपूर्ण रचना मात्र विशेष अर्थपूर्ण होत नाही. रचना रचनाच नसावी, आणि तरी त्यातून अर्थपूर्णता प्रतीत व्हावी, असेही होत नाही. श्री. खानोलकरांची शैली आकर्षक आहे; परंतु कधीकधी शंका येते : ते मूलभूत कल्पकता, या शाब्दिक कल्पकतेसाठी बळी तर देत नाहीत?...आधुनिक संज्ञाप्रवाही आविष्कारपद्धतीला लोकवाङ्‌माची लय देण्याचा त्यांचा प्रयत्न मात्र अनेकदा यशस्वी झाला आहे. उदा. 'तिने' विवाहाला आणि पैसे परत घेण्याला नकार दिल्यावर गणुरायाच्या मनात येते :

'आपली द्वारका पाण्यात.
नवरदेवाचा घोडाही पाण्यात.

मातीचा घोडा, घोड्यावरचा स्वार, स्वाराचं लग्न, लग्नाचा मांडव, मांडवाचे बांबू, बांबूवरचं घरटं.' (पृ. ६९) गणुरायाच्या मनातील कोड्यासाठी अशी उखाण्याची लय योजली आहे.

'चानी' या कथेमागील गोष्ट नेहमीची असली तरी त्या अनुभवालाही श्री. खानोलकरांनी लोकवाङ्‌मयातील विलक्षण वातावरणाचो ऊब देण्याचा प्रयत्न केला आहे. जन्मतःच दुर्दैव घेऊन आलेल्या चानीला फक्त अलौकिक सौंदर्याचा आणि तरल कल्पनाशक्तीचा वारसा मिळालेला असतो. गावातील सारे प्रौढ पुरुष सौंदर्यामुळे तिच्यावर आसक्त आहेत, तर एक लहान मुलगा तिच्या तरल कल्पना-

शक्तीच्या वर्तुळात ओढला जातो. त्याच्या सुरक्षित घराने त्याला दिलेल्या अनुभवापेक्षा, त्याची आजी, हलक्या सुरात ओव्या गाणारी धाकटी मामी यांच्यापेक्षा, चानीचे जग खूप वेगळे आहे. अर्धसमजल्या वयामध्ये, चानी विरुद्ध गाव हा संघर्ष समजून घेण्याचा प्रयत्न तो करतो आहे. काही क्षणापूर्वीच मारहाण करणाऱ्या अप्पा बामणाला बिलगून चानी का रडत होती हे कोडे त्याला उलगडत नाही.

एका सांकेतिक गोष्टीला विलक्षण वातावरण निर्माण करून वेगळ्या अनुभवाचे रूप श्री. खानोलकरांनी दिले असले तरी या कथेने, श्री. खानोलकर पुन्हा पुन्हा आपल्याच भाषेच्या, अनुभवाच्या, प्रतिमांच्या आवर्तात सापडत आहेत अशी जाणीव वाचकाला होते.

'सनई', 'कोंडुरा' यामधील अनुभवविश्व आणि 'गणुराया' व 'चानी' या दीर्घकथांचे विश्व यात फार अंतर नाही. अनुभवविश्व स्थिर राहूनही लक्षणीय निर्मिती होऊ शकते. परंतु श्री. खानोलकरांच्या लेखनात काव्यात्मकता, विलक्षण वातावरण, मानवी स्वभावाची विचित्रता आता लकबींसारखी वापरली जाऊ लागली असल्यामुळे ते कलात्मक लक्षणीयतेपासून दूर जात आहेत. त्यांच्या लेखनविशेषांबद्दल आस्था बाळगणाऱ्या माझ्यासारख्या अनेक वाचकांची अशी आशा आहे की ही केवळ एक मधली स्थिती असू दे.

—सौ. पुष्पा भावे

## उपासना

### एका विशिष्ट रचनापद्धतीमुळे बंदिस्त झालेला कथासंग्रह.

'उपासना' संग्रहात सुप्रसिद्ध कथालेखिका वसुंधरा पटवर्धन यांच्या चार दीर्घ स्त्रीकथांचा समावेश आहे.

या प्रत्येक कथेतील स्त्रीची स्वतःची अशी असाधारण जीवनवैशिष्ट्ये आहेत, व्यथा आहेत. या असाधारण वैशिष्ट्यांचे आणि व्यथांचे रेखीव दर्शन प्रत्येक कथेतून घडते.

हे दर्शन घडविताना लेखिकेने एकच एक रचनापद्धती वापरली आहे. यातील निवेदक प्रथमपुरुषी स्त्री किंवा पुरुष आहे. असाधारण अशा निवेद्य व्यक्तीचा या निवेदकाशी प्रथम परिचय होतो. असाधारणतेमुळे निर्माण झालेल्या निवेदकाच्या कुतूहलाला हळूहळू फाटे फुटतात. या नाना प्रसंगातून कुतूहलाची पूर्ती होऊ लागते. निवेद्य व्यक्तिमत्त्व आकार घेते. ते गडद होऊ लागते. आणि मृत्यूसारख्या प्रसंगांनी या व्यक्तित्वविशेषांना पूर्णविराम मिळतो.

साधक आणि उपासना या कथांमधील व्यक्ती एकाच जातीच्या आहेत. फक्त दोन्ही कथांमधील निवेदनसुरात फरक आहे. साधकचे निवेदन गंभीर स्वरूपाचे आहे. तर उपासनातील निवेदन (म्हटले तर) थोडेसे औपरोधिक आहे. निवेदनातील सुराचा हा बदल सोडला तर संबंधित व्यक्तींच्या एकाच पद्धतीच्या गूढ आध्यात्मिकतेमुळे या दोन्ही कथांमध्ये आशयात्मक तोचतोचपणा आलेला आहे. मृत्यूलाही या कथांमध्ये महत्त्वाचे स्थान आहे. पहिल्या तीन कथांतील स्त्रियांचा शेवट हा मृत्यूने झाला आहे. कुतूहलपूर्तीच्या मार्गावरील पहिल्या पावलापासून मृत्यूची स्पंदने वाचकाला जाणवू लागतात आणि अखेर ती खरी ठरतात.

वर उल्लेखिलेल्या विशिष्ट निवेदनपद्धतीमुळे कथांमधील भावाभिव्यक्तीवर अन्याय झाला आहे. कारण एक म्हणजे प्रत्येक कथेतील निवेदकाच्या अस्तित्वामुळे त्या अभिव्यक्तीला एक अनावश्यक बंदिस्तपणा प्राप्त होतो. आणि दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे कुतूहलपूर्ती करणाऱ्या निवेदनामुळे प्रत्येक कथेत भावात्मकतेला बाधक अशी रहस्यमय झाक येते. ही रहस्यमयता भावात्मक परिणामाची प्रत्यक्षता कमी करते. ¤

# सहवासातून

## अपुरी आणि अकलात्मक व्यक्तिचित्रे

भाई माधवराव बागलांच्या आयुष्यात येऊन गेलेल्या लहानमोठ्या अशा अनेक व्यक्तींची शब्दचित्रे या संग्रहात आहेत. राजर्षी शाहू महाराजांपासून ते अगदी सामान्य कार्यकर्त्यांपर्यंत सर्व व्यक्तींना यांत स्थान मिळालेले आहे.

'माझी सहधर्मचारिणी' या पहिल्या प्रकरणात माधवरावांनी आपल्या सहचारिणीने केलेल्या त्यागाची गाथा उलगडलेली आहे. प्रस्तुत पुस्तक तिलाच अर्पण केलेले आहे.

नंतर माधवरावांनी 'सहवासातून' या शीर्षकाचे स्पष्टीकरण केलेले आहे. या पूर्वीच्या त्यांच्या व्यक्तिचित्रात्मक पुस्तकांची नावे 'माझ्या आवडत्या व्यक्ति', 'बहुजनसमाजाचे शिल्पकार', व 'माझा परिवार' अशी होती. ही नावे व्यक्तिचित्रांवर अनावश्यक बंधने घालतात. त्यामुळे त्या नावांना लोकांकडून आक्षेप येण्याची शक्यता आहे. 'सहवासातून' या शीर्षकाखालील लेखनात कोणत्याही पातळीवरच्या व्यक्तींचा समावेश होऊ शकेल म्हणून ते निवडले आहे. असा या स्पष्टीकरणाचा सारांश आहे.

याच प्रस्तावनापर प्रकरणात या व्यक्तींकडे बघण्याचा आपला दृष्टिकोनही माधवरावांनी स्पष्ट केला आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी या चित्रण त दोषाविष्करणाची वृत्ती काढून टाकण्याचा प्रयत्न केला आहे. ते म्हणतात – "तसे काही (दोष) आढळलेच तर मी ते बाजूला सारले आहेत. त्यामुळे पुस्तकाला काही दर्जा मिळेल की नाही याचा मी काही विचारच केलेला नाही. खरं म्हणजे हे मी लिहिण्यात मी स्वत: एक प्रकारचा आनंद भोगू शकलो हेच माझे समाधान."

## महाराष्ट्र साहित्य-पत्रिकेचा नवा अंक

म. सा. परिषदेच्या यंदाच्या निवडणुकांनंतरचा पहिला अंक परिषदेने नुकताच प्रसिद्ध केला आहे. या अंकापासून पत्रिकेचे संपादक मंडळ बदलले आहे; आणि त्यामुळेच बहुधा पत्रिकेच्या रूपातही बदल झाला असावा. मागच्या अंकापेक्षा या अंकाचा आकार लहान केला आहे. (त्यामुळे पृष्ठसंख्येत वाढ झाली आहे.) शिवाय चित्रकार अवचट यांची सजावट आणि कल्पना मुद्रणालयाच्या वेगळ्या टाईपातील छपाई, यामुळे अंक देखणा झाला आहे. (इतका की तो 'पत्रिके'चा अंक आहे हे प्रथमदर्शनी खरेच वाटत नाही!)

पत्रिकेच्या नेहमीच्या अंकाप्रमाणे याही अंकात जुन्या-नव्या मराठी साहित्यावर अभ्यासपूर्ण लेख आहेत. जोडीला डॉ. मालशे यांचा, शोधनिबंध (research writing) लिहिणाऱ्या मराठी अभ्यासकांसाठी शास्त्रशुद्ध लेखनपद्धतीचे मार्गदर्शन करणारा दीर्घ लेख आहे. मराठीमध्ये अशा लेखांची आवश्यकता आहे यात शंका नाही. डॉ. मालशे किंवा डॉ. अशोक केळकर यांच्याकडून अशा प्रकारच्या अनेक टिपणांची अपेक्षा आहे. (कथासंग्रह किंवा नाटके यांवरील, वृत्तपत्रांत येणाऱ्या परीक्षणांसारखी किरकोळ परीक्षणे 'पत्रिके'तून प्रसिद्ध होऊ नयेत, असे वाटते. वार्षिक-समालोचन-अंकातून त्या पुस्तकांचे जे मूल्यमापन होईल ते 'पत्रिके'च्या वाचकाला – आणि त्या पुस्तकांच्या लेखकांनाही – पुरेसे आहे.) नव्या संपादकांमुळे पुण्याबाहेरच्याही अनेक लेखकांचे लिखाण 'पत्रिके'च्या वाचकांना वाचायला मिळणार असे दिसते. त्याचप्रमाणे 'पत्रिके'ला आतापर्यंत निषिद्ध असलेल्या विषयांवरही (उदा. मराठी अनियतकालिकांतील प्रायोगिक लिखाण) शंकर सारडा यांच्यासारख्यांकडून लेख मिळण्याची आशा करायला हरकत नाही!

पत्रिकेचे यापुढचे अंक (–ते महत्त्वाचे आहेत असे या अंकातील एका निवेदतात म्हटले आहे; त्यामुळे त्यांच्याबद्दल आतापासूनच उत्सुकता वाटू लागली आहे!) वेळेवर प्रसिद्ध व्हावेत, अशीही इच्छा शेवटी व्यक्त करावीशी वाटते.

– सुनील कर्णिक

माधवरावांच्या या लेखनात एक प्रकारचा अकलात्मक उत्साह आहे. या उत्साहा-तूनच त्यांचे प्रत्येक वाक्य हे साधे वाक्य न रहाता. उद्गारचिन्ह बरोबर घेऊनच येते. आणि अखेर प्रत्येक उद्गार हा अखेर स्फूर्तीहीन वाटू लागतो. हा उत्साह अकलात्मक आहे याचे कारण चित्रविषय झालेल्या व्यक्तित्वांच्या अंतरंगात शिरण्या-साठी आवश्यक असलेली तटस्थता लेखनात येऊ शकत नाही. या उत्साहामुळेच अनुभवाच्या समग्र चित्रणात चित्रविषयापेक्षा लेखकाच्या 'स्व'लाच बालिश महत्त्व येते. स्वतंत्रपणे हा 'स्व' वाचकाला आवडण्यासारखा आहे. बालिश उत्साह आणि निरागसवृत्ती, स्वतःकडे आणि जीवनाकडेही बघण्याचा एकंदरीत निर्मळ दृष्टिकोन यांनी युक्त असा हा 'स्व' विलोभनीय वाटतो. पण त्याचा इतर व्यक्तींशी जुळ-लेला भावसंबंध वाचकासमोर प्रत्ययकारी स्वरूपात अवतरत नाही. तो फारच क्षीण वाटतो. यामुळे ही सर्वच व्यक्तिचित्रे पुसटसासुद्धा ठसा उमटवू शकत नाहीत. त्यांचे वाङ्मयीन महत्त्व कमी होते. अर्थात् माधवरावांनाही दर्जाचा विचार करायचा नसल्यामुळे वाचकांनी फारशा फिकिरीत पडण्याचे कारण नाही.

या सर्वच वर्ण्यविषयांच्या निवडीमागे माधवरावांची विशिष्ट अशी दृष्टी आहे. माणुसकी या नावाने जो काही गुणसमुच्चय आपल्याला अपेक्षित असतो त्यापैकी एक ना एक गुण यापैकी प्रत्येक व्यक्तीत आहे. माधवरावांनी ज्या कुत्रीचे चित्र रंगविले आहे तिच्यात सुद्धा हा गुण आहे. या गुणाच्या अस्तित्वापुढे माधवरावांनी व्यक्तीच्या दुर्गुणांकडे दुर्लक्ष केले आहे अगर क्वचित त्या दुर्गुणांचेही द्वंद्वात्मक असे वकिली समर्थन केलेले आहे. माणुसकीचा आढळ हा या व्यक्तिचित्रांना जोडणारा समान दुवा असल्यामुळे माधवरावांच्या निवडीला पक्षीय, आर्थिक, धार्मिक, जातीय अशा कोणत्याहि मर्यादा पडलेल्या नाहीत.

असे असले तरी या लिखाणामागे कोणतीही वाङ्मयीन आकारदृष्टी नाही, याची माधवरावांनाही जाणीव आहे. उदाहरणार्थ, शामराव कवाळे या व्यक्ति-चित्रात खुद्द त्या व्यक्तीबद्दल दोनचारच वाक्ये आहेत. बाकी सर्व त्या संदर्भात सुच-लेले विचारतरंग आहेत. अर्थात व्यक्तिचित्रात विचारतरंग येतातच पण त्यांचे संतुलन या लेखात पार बिघडलेले आहे. आणि माधवरावांनी आपल्या या दोषाची कबुली तेथे दिलेली आहे.

एकंदरीत फारसे वाङ्मयीन महत्त्व नसलेली अशी ही अनाकर्षक व्यक्तिचित्रे.

**—सुहास भालचंद्र बापट**

---

**गणुराया आणि चानी** : चिं. त्र्यं. खानोलकर : मौज प्रकाशन : मूल्य साडेदहा रुपये.

**उपासना** : वसुंधरा पटवर्धन : बा. ल. पाठक प्रकाशन : मुंबई : मूल्य पाच रुपये.

**सहवासातून** : भाई माधवराव बागल : व ह. पिटके : कोल्हापूर.

---

मुक्काम | जयप्रभा स्टुडिओ
कोल्हापूर

# सोंगाड्या

चित्रपटाचं चित्रीकरण, स्टुडिओमधील ' फिल्मी ' वातावरण, कलाकारांची, तंत्रज्ञांची धावपळ हा प्रकार मला काही नवा नाही. ' विच्छा ' फेम शाहीर दादा कोंडके यांच्या ' सोंगाड्या ' या चित्रपटाचे चित्रीकरण सध्या कोल्हापूर येथे चालू आहे चित्रीकरण पाहण्यासाठी जाण्याचे ठरवले त्या वेळी चित्रीकरणापेक्षा कलाकारांना-तंत्रज्ञांना भेटून गप्पा मारण्यास मी जास्त उत्सुक होतो.

कोल्हापूरच्या जयप्रभा स्टुडिओमध्ये ' सोंगाड्या ' या चित्रपटाचे चित्रीकरण चालू आहे. आम्ही मंडळी गेलो तेव्हा खेडेगावी चाललेल्या तमाशाचे चित्रीकरण चालू होते. महाभारतातील द्रौपदी वस्त्रहरणाचा देखावा चित्रित करण्यात येत होता. खास तमाशा स्टाईलवर चित्रीकरण होत होते. गर्जना करून दुर्योधन द्रौपदीला घेऊन येतो. आणि दुःशासनाला वस्त्रहरण करण्याची आज्ञा देतो. भोजनापूर्वीच्या या सेशनला वेळेवर सुरुवात होऊ शकली नाही, कारण द्रौपदीची तब्येत (उषा चव्हाण) बरी नव्हती छाया दिग्दर्शक श्री. अरविंद लाड म्हणाले, आज आम्ही वास्तविक चित्रीकरण करणारच नव्हतो. तथापि आम्ही मंडळी खास पुण्याहून आल्याने चित्रीकरण करण्याचा निर्णय घेतला. वर वर्णन केलेल्या प्रसंगापैकी फक्त दोन ' शॉटस् ' घेण्यात आले. चित्रपट मराठी त्यामुळे शॉटपूर्वीच्या तालमी भरपूर. अगदी नाईलाज झाल्याशिवाय रिटेक नाही. त्यामुळे शॉटपेक्षा तालमीवर भर जास्त. आर्टिस्टचं ब्रीफींग झालं, साऊंडवाला तयार होऊन बसला, कॅमेरा संभाळणाऱ्या लाड साहेबांची तयारी होतीच.

दिग्दर्शक गोविंद कुलकर्णी गरजले...सायलेन्स, लाइटस् प्लीज, साउंड स्टार्ट... पलीकडून नेहमीचो आरोळी आली रनिंग-लगेच आज्ञा झाली, कॅमेरा स्टार्ट-लाडसाहेब डोळा लावून बसले होतेच. त्या पाठोपाठ क्लॅप, आणि मग आर्टिस्टना ॲक्शनची सूचना. तमाशातलीच मंडळी. तमाशातलंच दृश्य, आणि भरपूर रिहर्सलस् झालेल्या त्यामुळे पहिलाच टेक ओके झाला. याच पद्धतीनं आणखी एक शॉट झाला. आणि मग लंच ब्रेक. संपूर्ण तमाशाच्या दृष्टीने तमाशादृश्याला फारसे महत्त्व नव्हते. दुर्योधन (वसंत खेडकर) दुःशासन (परशुराम मोहिते) द्रौपदी (उषा चव्हाण) या


कलाकारांनी दृश्यात भाग घेतला. काही न बोलत 'फ्रेम'मध्ये केवळ दिसण्यासाठी बसवलेली पांडव मंडळी (ज्युनिअर आर्टिस्टस्) कंटाळून गेली होती. लंच ब्रेक म्हटल्याबरोबर मंडळी उठून गेली.

चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद, आणि काही गीते वसंत सबनीस यांची आहेत. चित्रीकरण झालेल्या भागाची तमाशात नक्की जागा काय याची उत्सुकता असल्याने वसंतरावांना त्यासंबंधी विचारले. गावाकडं तमाशा चालू आहे. चित्रपटाचा नायक आपल्या मित्राच्या आग्रहाखातर तमाशा पहाण्यास आला आहे. हा सर्व प्रकार त्याला नवीन आहे. मोठ्या उत्सुकतेने तो बघत आहे. इकडे द्रौपदी वस्त्रहरणाचे दृश्य ऐन रंगात आले आहे. दुःशासन द्रौपदीची साडी फेडतो आहे. द्रौपदी ओरडते आहे किसना, किसना, धाव ऽ धाव ऽ. किसनाचा पत्ता नाही. द्रौपदीचा धावा चालू आहेच. वस्त्रहरणाचे दृश्य नको त्या पातळीपर्यंत पोचल्यावर हा भोळा भावडा जीव एकदम बिथरतो. आणि बोर्डावर दाखल होऊन दुःशासनला एक वाजवतो. तमाशातल्या मंडळींना हा सगळा प्रकार नवीन असल्याने ती बिथरून जातात. द्रौपदीही या आगांतूक कृष्णावर भडकते. यचे उत्तर येते–येणार केव्हा सुद्धा किसन देव? वस्त्रहरण झाल्यावर होय. किसन देवांची स्वारी हातभट्टीची ताज्या धारेची घेऊन विंगेत पडलेली असते.

भोजनाचा कार्यक्रम स्टुडिओमध्येच झाला. पाहुणे मंडळींसाठी जिलेबीचा बामणी बेत होता. व्यवस्था साधीच पण पदार्थ चांगले झाले होते. महाराष्ट्रीय पद्धतीची योजना असल्याने टाईट पँटवाल्या पाहुणे मंडळींना हात आखडता घ्यावा लागला. शाहीर कोंडके, आणि वसंत सबनीस जातीने लक्ष देत होते.

मंडळींची दुपारची बैठक एका प्रशस्त हॉलमध्ये पडली. चित्रपटाची सर्व गाणी रेकॉर्ड झाली होती. शाहीर कोंडके, वसंत सबनीस आणि जगदीश खेबुडकर यांची गीते राम कदम यांनी बांधली आहेत. गाण्यांचा हा कार्यक्रम मोठा झकास झाला. मंडळींच्या आग्रहाखातर काही गाणी पुन्हा पुन्हा ऐकवण्यात आली. गाण्यांच्या संदर्भात एक किस्सा सांगण्यासारखा आहे.

एका हिंदी चित्रपटाच्या निर्मात्याने आपल्या वितरकाला निर्मितीखाली असलेल्या आपल्या चित्रपटाची गाणी ऐकवली. चित्रीकरणासाठी आणखी पैसे मिळवण्याचा उद्देश त्याच्या मनात होता. ऐकणाऱ्या मंडळींमध्ये वितरकाच्या नातेवाईकांपैकी काही मंडळी होती. त्यांपैकी एकाला हिंदी चित्रपटातील गाण्यासंबंधी विशेष प्रेम नव्हते. इकडे गाण्यामागून गाणी वाजत होती –१, २, ३, ४, ५ – हा प्रकार त्याला असह्य होऊ लागला. ६, ७, ८ अखेर न राहवून तो म्हणाला, चित्रपटात आपण इतकी गाणी का घेता? वितरकाची 'रिॲक्शन' अजमावणारा निर्माता एकदम बिथरला. – मालूम, ऐसा है. आमचे चित्रपट गाण्यावर चालतात. आता कोणती गाणी हीट ठरतील हे कसं निश्चित सांगणार? हाँ, आता



भवितव्याच्या विचाराने चिंताक्रांत झालेला सोंगाड्या व त्याची जोडीदारीण
दादा कोंडके । उषा चव्हाण

तुम्ही जर सांगत असाल की अमूक दोन गाणी निश्चित हीट जातील तर उरलेली सर्व गाणी एकदम कॅन्सल. हिंदी चित्रपटातील गाण्याचे रहस्य सांगणाऱ्या या बिनतोड उत्तरावर तो बिचारा चौकस प्राणी एकदम थंडावला.

'सोंगाड्या'ची गाणी तशी झकास आहेत. त्यातल्या त्यात 'काय ग सखू बोला दाजीबा, राया मला पावसात नेऊ नका' आणि 'माळ्याच्या मळ्यात कोण ग उभी? वांगी तोडते मी रावजी' ही गाणी मंडळींच्या विशेष पसंतीस उतरली. वन्स मोअरच्या कार्यक्रमास न थांबता छाया लेखक लाडसाहेब उभे होते तिकडे मी मोर्चा वळवला. आपल्या कलेमध्ये लाडसाहेब मोठे निष्णात आहेत. हॉलीवूडला जाऊन ऑब्झर्व्हर म्हणून काम करण्याची संधी त्यांना मिळाली आहे. मुंबईचा जावई, एकटी या त्यांच्या आधीच्या चित्रपटांनी भरपूर यश मिळवले आहे. 'साधी माणसं' या भालजींच्या चित्रपटाचे कामही त्यांनी केले आहे. हिंदी चित्रपटांची कामेही ते करीत असतात. कमाल अमरोही यांच्या 'पकिझा' या चित्रपटाचे काम सध्या ते करीत आहेत. प्रभातच्या परंपरेत मोठ्या झालेल्या या माणसाचे मराठी चित्रपटावर विशेष प्रेम आहे. छायालेखनाच्या दृष्टीने मराठी चित्रपट इतके

दरिद्री कसे ? या माझ्या प्रश्नाला त्यांनी मोठे मार्मिक उत्तर दिले. ' चित्रीकरणा-साठी आवश्यक असलेल्या अनेक गोष्टी अत्यंत आवश्यक असूनही आम्हाला मिळू शकत नाहीत. तुम्हाला खरे वाटणार नाही, पण दोन तीन जुन्या पुराण्या लेन्सेस, आणि वीस बावीस वर्षे वापरलेल्या कॅमेऱ्यावर आम्ही आजही काम करतो. शिवाय लाइटस्ची बोंब असते. वेळेवर मर्यादा असते. स्टॉक कंझमशनवर नियंत्रण असते. अशा परिस्थितीत आम्ही कसे काम करतो ते आमचे आम्हाला माहीत. केवळ हिन्दुस्थानातल्याच नव्हे तर हॉलीवूडच्याही सर्वश्रेष्ठ छाया लेखकाने इथे येऊन आम्ही करतो त्या परिस्थितीत काम करावे आणि आमच्या निम्म्यानं ' रिझल्टस् ' घ्यावेत, आपण धंदा बंद करू '

व्यवसायामध्ये पारंगत असलेल्या या तंत्रज्ञांच्या अपयशाची जबाबदारी अखेर निर्मात्यांवर येते. त्यांच्याही काही अडचणी असतात. अनेक चित्रपटांच्या पदरी अपयश येते. तर कित्येक चित्रपट कल्पना नसताना यशस्वी होतात. गेल्या काही दिवसात ' एकटी, आम्ही जातो आमच्या गावा, सतीचं वाण, अपराध, मुंबईचा जावई ' या चित्रपटांनी चांगले यश मिळवले आहे. या आर्थिक यशाचा वाटा वैय क्तिक संपन्नता वाढवण्यात जावा, आणि मराठी चित्रपट व्यवसायास त्याचा किंचितही लाभ मिळू नये याचे वाईट वाटते. या मंडळींनी वैयक्तिक अथवा संघटीतरीत्या व्यवसायाच्या या आवश्यक गरजा पूर्ण करण्याची वेळ आली आहे. मराठी चित्र-पटाच्या छायालेखकाला गरज असूनही चांगली ट्रॉली क्रेन, पुरेसे लाईटस् उपलब्ध होऊ नयेत ही चीड आणणारी बाब आहे. हिन्दी–मराठी चित्रपटांच्या तुलनेत रॉ स्टॉक वापराचे प्रमाण आश्चर्यकारक आहे. मराठी चित्रपटासाठी हे प्रमाण साधा-रणपणे एकास दोन असे आहे. तर हिन्दीमध्ये हे प्रमाण एका रिळास १४–१५ क्वचित १७–१८ पर्यंत जाते. चवदा पंधरा दिवस छायाचित्रण करून केवळ २५० फूट संकलित फिल्म तयार केल्याचा हिन्दीवाल्यांचा लाड साहेबांनी सांगितलेला किस्सा आश्चर्यकारक आहे.

गाण्यांचं चित्रीकरण हा मोठा इंटरेस्टींग भाग असतो. विशेषत: नृत्याचे चित्री-करण तुकड्या तुकड्यांनी होत असल्याने नृत्यदिग्दर्शक आणि छायालेखक, संकलक व कलाकार या सर्वांची कसोटी या प्रकारात लागते. ' सोंगाड्याचे ' नृत्य दिग्दर्शक माधव खोपकर आपल्या कलेत कुशल वाटले. हिन्दी चित्रपटात सत्यनारायण यांचे सहाय्यक म्हणून काम करणाऱ्या या कलाकाराने सोंगाड्यामधील नृत्य बसवण्याची जबाबदारी उचलली आहे. चित्रीकरणामध्ये भाग घेणारे कलावंत प्रत्येक वेळी विशेषत: तालमीसाठी उपलब्ध होत नसल्याने दुसऱ्या कलावंतांवर नृत्याचे तुकडे बसवावे लागतात. सौ. दमयंती कर्णिक यांच्या सहाय्याने श्री. खोपकर यांनी चित्रपटाची नृत्ये कशाप्रकारे बसवली जातात याचे सुरेख प्रात्यक्षिक दाखवले.

दिग्दर्शक गोविंद कुलकर्णी यांचे नाव फारसे ऐकलेले नव्हते. व्यक्तिगत परिचयही

नव्हता. म्हणून त्यांना मुद्दाम भेटलो. राजकमलच्या तालमीत तयार झालेल्या या तंत्रज्ञाने दिनकर पाटील, राजा ठाकूर, आदि दिग्दर्शकांकडेही काम केले आहे. मराठी चित्रपट हे पडद्यावरील नाटकांसारखे वाटतात. असे का? याला उत्तर देताना त्यांनी वर उल्लेखिलेल्या मर्यादांचा उल्लेख केला. वितरण व्यवस्थेवर निर्मात्यांची हुकमत असल्याखेरीज या मराठी चित्रपट व्यवसायाला भवितव्य नाही असे त्यांचे ठाम मत दिसले. ' सोंगाड्या ' या त्यांच्या नवीन चित्रपटाचे वितरण निर्मात्यामार्फत होईल या अटीवर त्यांनी या चित्रपटाची जबाबदारी स्वीकारली आहे. चित्रपट ही कला असली तरी त्यात निर्मात्याचे फार मोठे भांडवल गुंतलेले असल्याने ते त्यास नफ्यासह परत मिळाले पाहिजे, हाच उद्देश चित्रपटाचे दिग्दर्शन करताना आपल्या मनात असल्याचे त्यांनी सांगितले. काम करण्याची त्यांची पद्धत शास्त्रशुद्ध व पूर्वनियोजित वाटली.

दादांना विचारले ही नवीन वाट तुम्ही का धरली ? दादा कोंडके म्हणाले, ' हा प्रश्न मला अनेकांनी विचारला, चित्रपटाचा मुहूर्त होईपर्यंत अनेकांनी मागे फिरण्याचा उपदेश केला. कित्येकांनी तर या धंद्यापेक्षा लॉजिंग बोर्डींग चालवा असेही सुचवले, पण मी निश्चयाने या व्यवसायात उतरत आहे. अपयश आणि यश हे दोन्ही पचवण्याची मनाची तयारी आहे. कलाकार म्हणून काम करताना चित्रपटाचे तंत्र प्रारंभी थोडे अवघड वाटले. प्रेक्षकांच्या टाळ्या आणि हशांमध्ये लोकांच्या ' इच्छा पूर्ण ' करणाऱ्या या कलावंताला दिग्दर्शकाचे केवळ सायलेन्स, ओके, कट, या शब्दांनी नियंत्रित होणारे हे नवीन माध्यम प्रारंभी अवघड वाटणे स्वाभाविक होते.

प्रत्येक माणसाची खास वैशिष्ट्ये असतात. आवडी निवडी असतात. कोणते तरी क्षेत्र त्याला आपले असे वाटत असते. योगायोगाने अथवा योजनापूर्वक त्याला हे क्षेत्र मिळाले तर तो यशस्वी कामगिरी बजावू शकतो. या सूत्राभोवती सोंगाड्याची कथा गुंफली आहे. असेच योगायोगाने चित्रपटाच्या नायकाला त्याचे क्षेत्र सापडते. आणि आपल्या अशा या क्षेत्रामध्ये तो मोठी कामगिरी बजावतो. दिग्दर्शक गोविंद कुलकर्णी यांनी चित्रपटाला विनोदी ट्रीटमेंट दिली आहे.

चित्रपट निर्मिती अवस्थेत आहे. दादा कोंडके यांच्या या नवीन उपक्रमाचे भवितव्य ठरवण्याची जबाबदारी मराठी चित्रपट रसिकांवर ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये टाकण्यात येईलसे दिसते.

–शरद गोखले



डॉ. नरेंद्र दाभोळकर

विज्ञानेश्वरी

## बोलणारे सांगाडे

मरावे परी कीर्तिरूपे उरावे हे वचन संतांच्या महाराष्ट्राला नवीन नाही. मरण क्रमप्राप्तच, तडजोड नाही. तेव्हा उरलेल्या अर्ध्या वचनाच्या साध्यासाठी प्रत्येकजण धडपड करतो. कुणी कोनशिलेवर वा पुतळ्याच्या चौथऱ्यावर आपले नाव कोरतो. काही महाभाग सहकारी सोसायटी, साखरकारखाने अथवा शाळा–कॉलेजे यांच्या सहाय्याने मरणोत्तर कीर्तीची सोय करतात. पण आपल्यासारख्या सर्वसामान्यांनी काय सोय ? काळजीचे कारण नाही. मरणोत्तर कोणत्यातरी स्वरूपात उरण्याची आणि ओळखले जाण्याची सोय विज्ञानाने केली आहे.

म्हणजे असे की माझ्या मृत्यूनंतर दोनशे वर्षांनी जर 'माणूस'च्या वाचकांना विज्ञानभवन उभारून तेथे माझ्या अस्थी ठेवायच्या असल्या वा माझ्या अस्थींवरच भवन बांधायचे असले तर ती सोय आता झाली आहे. ती सोय म्हणजे निधी गोळा करण्याची नव्हे तर दोनशे वर्षांनीही एखाद्याच्या सांगाड्यावरून मृत माणसाचे वय, लिंग, धर्म, मरून नेमकी झालेली वर्षे, मृत्यूचे कारण या गोष्टींवर आता प्रकाश पडू शकतो. नेपोलियन, डान्टे, शेक्सपिअर या महाभागांच्या अस्थी उकरून त्या त्यांच्याच असल्याची खात्री करण्याचा शास्त्रीय उपद्व्यापही झाला आहे.

शरीराच्या हाडाचा काही शतकानंतर अभ्यास करून त्यासंबंधी वरील स्वरूपाची माहिती देणे हे सोपे काम खासच नाही. शरीररचनाशास्त्र, अस्थिशास्त्र आणि इतर काही शास्त्रांचा त्यासाठी सखोल अभ्यास करावा लागतो. शिवाय जगातल्या निरनिराळ्या भागातल्या निरनिराळ्या प्रकारच्या सर्व पंथातील स्त्री–पुरुषांच्या अनेक सांगाड्यांचा अभ्यास करूनच ह्या विषयाचे तज्ञ बनता येते.

अर्थात या शास्त्राचा उपयोगही तसाच होतो. बुडून मेलेली माणसे, भाजलेली वा जळलेली प्रेते, मोठ्या प्रमाणावर झालेले अपघात, युद्धे यावेळी जेव्हा इतर कोणत्याही प्रकारे माणसे ओळखता येत नाहीत त्यावेळी हे शास्त्र हमखास उपयोगी ठरते.

एक उदाहरण घेऊ. समजा गावातील बाजूच्या जंगलात इतर कोणत्याच खुणा नसलेला नुसता हाडाचा ढीग आढळला तर अस्थितज्ज्ञ त्यावर बराच प्रकाश पाडू

शकतो. ती हाडे पुरुषाची आहेत हे निश्चितपणे सांगता येते. पायाच्या हाडावरून उंचीचा जवळजवळ अंदाज बांधता येतो. इतर छोटया मोठया हाडांची काळजीपूर्वक तपासणी केल्यास वयाचा आणि हाडात रोगामुळे, वयामुळे वा जखमेमुळे झालेल्या बदलाचा अंदाज बांधता येतो. परदेशात तर गावातल्या दंतवैद्याकडून दाताची मोजमापे व इतर माहिती घेऊन त्याच्या सारखेपणाची छाननी केली जाते. माणसाच्या तपासणीत हाताच्या बोटाच्या ठशा खालोखाल महत्त्वाचे ठरते इतके दाताच्या वैयक्तिक वैशिष्टयाचे स्थान असते. याच सुमारास गावातून नाहीशा झालेल्या माणसाचे जात, वय, लिंग त्याचा आजार वा त्याचे नाहीसे होण्याचे कारण याची या माहितीशी सांगड घातल्यास बरेच मौल्यवान पुरावे हातात येतात.

हे शक्य होते याचे कारण सरळच आहे. आपला सांगाडा, आपली हाडे ही जणू जिवंत इंद्रियेच आहेत. ते शरीराच्या प्रमाणात वाढत असते. वयाप्रमाणे त्यात बदल होत असतात. वृद्धापकाळाचे, आजाराचे त्यावर परिणाम होतात. हाताची, पायाची, बोटाची हाडे सुरुवातीला तीन भागात असतात. दोन्ही बाजूला वाढणारी टोके आणि मधला भाग. ह्या तीन्ही भागांचे मिळून एक हाड तयार होण्यापूर्वी ते निरनिराळया अवस्थातून जाते. ह्या अवस्थांची वेळ सर्वात सारखीच असते. त्यामुळे हे कोष्टक माहीत असल्यास सुमारे वीस वर्षापर्यंत तरी वयाचा अचूक अंदाज सांगता येतो.

ह्या स्वरूपाच्या अभ्यासाला सहाय्यभूत ठरणारे सुमारे तीन हजार निरनिराळया देशातील, वयातील स्त्री–पुरुषांच्या सांगडयांचे एक संग्रहालयच स्थापन करण्यात आले आहे. तेथील अभ्यासावरून अनेक प्रकारची नवी तंत्रे, परिमाणे ह्या शास्त्राच्या अचूकपणासाठी निर्माण केली जातात.

अमेरिकेची एक प्रथा हे शास्त्र वाढविण्यास मोठी उपकारक ठरली आहे. युद्धामध्ये कामी पावलेले सैनिक सर्वच राष्ट्रे एकत्रित करून दहन करतात. अमेरिका याला अपवाद आहे. ती सर्व धारातीर्थी पडलेले सैनिक सन्मानाने आपल्या राष्ट्रात आणते आणि त्या देहांची व्यक्तिगत ओळख पटण्यासाठी शक्यतो सर्व प्रयत्न करते. कोरियन युद्धातल्या सुमारे ९७ टक्के सैनिकांची याप्रकारे ओळख पटविली गेली. अर्थातच प्रत्येक व्यक्तीकडे स्वतंत्र लक्ष पुरविले जाते आणि तपासही काळजीने होतो. यातून मिळणाऱ्या अनुभवातून माहिती आणि मोजमापातून दैनंदिन कामात व्यक्तीचा शोध अस्थींच्या सहाय्याने घेण्याच्या तंत्राला परिपूर्णता येत असते.

या अभ्यासातूनच मॅकरन स्टेवार्ट ही आधुनिक पद्धती तयार झाली. pubic या छोटया हाडाच्या सहाय्याने आता कुठल्याही वयाचा अचूक अंदाज सांगता येतो. या पद्धतीचा उपयोग आता सर्व जगभर मान्यता पावला आहे.

'एखादी सवय अगदी हाडात मुरली आहे असे आपण म्हणतो.'

कुणी सांगावे आज अस्थीवरून बाह्यांग वर्तविणारे विज्ञान उद्या अंतरंगालाही हात घालेल.

◻

# वरदान दोघांनाही

स्वभावाला औषध नाही हे खरेच ! पण म्हणूनच स्वभावावर वा मनावर औषध उपचार करून घेणाऱ्यांची संख्या वाढत असावी. डॉक्टर जरा सर्दी पडसं झालंय, थोडं बरं वाटत नाही म्हणून जितक्या सहजपणे आपण डॉक्टरांकडे जातो तितक्याच सहजपणे अमेरिकेतील माणूस मनाला जरा कसंतरी वाटतं म्हणून डॉक्टरकडे जातो.

पण ज्यांच्या मनाला खरोखरच रोग झाला आहे त्या मानसिक विकृती असलेल्या रोग्यांचा प्रश्न निराळा. त्यांना खरोखरच काही झालेले असते आणि सहानुभूतीची आणि तज्ञ उपचारांची गरज असते. या उपचारांबाबत मात्र मानसोपचारतज्ञ अजून प्राथमिक अवस्थेतच चाचपडत आहेत, कारण हे बेटं मन नेमके कुणालाच कळत नाही. मग बिघडलेले मन कळणं तर त्याहूनही अवघड.

तेव्हा शास्त्रज्ञांनी एक नामी सोय केली. मानसिक विकृतीच्या रोग्यांना सुधारण्यासाठी त्यांच्या वागणुकीत, विचारात बदल करण्यासाठी छोटया नलिका मेंदूच्या विशिष्ट भागात बसविल्या बसविण्याचे काम अर्थातच कठीण. पण एकदा बसविल्यानंतर मग पुढचे काम सोपे. त्या नलिकातून विशिष्ट तपमानाची विशिष्ट घनतेची काही औषधी द्रव्ये त्यांनी आत सोडली. आणि यातून त्यांच्या वर्तणुकीत बरेच बदल करण्यात ते यशस्वी झाले.

छोटे विद्युतवाहक (electrik) मेंदूच्या विशिष्ट भागात बसवून आणि त्यातून विद्युतप्रवाह खेळवून काही प्रमाणात वरील गोष्ट साध्य झाली.

पण यापेक्षाही एक पद्धत अधिक आकर्षक आहे. मेंदूतून शरीराच्या विविध भागाकडे मज्जातंतूमार्फत जाणाऱ्या संवेदना त्यांनी थांबविल्या आणि मेंदूचा संबंध परस्पर कॉम्प्युटरशी जोडला. आणि काय आश्चर्य ! कॉम्प्युटरकडून मिळणारे संदेश मेंदू व्यवस्थित ग्रहण करू लागला. प्रामुख्याने हे प्रयोग चिंपँझीवर झाले आणि माणसावर हे प्रयोग अजून अगदीच प्राथमिक अवस्थेत आहेत. पण स्वभावात मूलभूत बदल करण्याची शक्यता यामुळे वाढली आहे. पण त्यापेक्षाही आणखी फायदे आहेत. एक म्हणजे मानसिक रोग्याला प्रत्यक्ष स्पर्शही न करता वा त्याच्याजवळ न बसता, बोलता महिनो न् महिने त्यावर योग्य ते उपचार चालू ठेवता येतील. मानसिक रोगावरच्या उपचाराच्या तंत्रात त्यामुळे आमूलाग्रच बदल होईल. पण ही प्रभावी पद्धत फक्त रोग्यांच्या साठीच वापरली जाईल असे थोडेच आहे. या पद्धतीने आणि वेगाने मेंदू ग्रहण करू लागला तर शिक्षकाचा शिकवण्याचा आणि आपला शिकण्याचा सगळाच त्रास वाचेल. एकदा तेवढा कॉम्प्युटर जोडून टाकायचा की दहा महिन्यात पोरगा पंडित ! ◻

# बहात्तर रोगावरचा रामबाण

माझ्या लहानपणी एक भला मोठा कंद विकणारा माणूस गावात अधूनमधून यावयाचा. त्या कंदाबरोबरच त्याच्याकडे असलेल्या कापडी तक्त्यावर बहात्तर रोगांची नावे लिहिलेली असायची. त्या कंदाच्या एकाच पांढ या शुभ्र फोडीने ते सारे रोग बरे होण्याची खात्री तो छातीवर हात ठेवून द्यावयाचा. लोकही विश्वासाने विकत घेऊन ती फोड खायचे.

आज ए. पी. सी. किंवा अॅस्परीनची गोळी बघितली की मला आठवण येते. ए. पी. सी. देणाऱ्या डॉक्टरला त्याच्या शास्त्रातले काही कळत असावे असे लोक बहुधा मानत नाहीत. कुठल्याही कारणाने येणाऱ्या सुशिक्षित वा अशिक्षित रोग्याने बहुधा ए. पी. सी. चा उपयोग आधीच भरपूर प्रमाणात केलेला असतो.

अॅस्परीनचे शास्त्रीय नाव Acetylsalysylic acid. डोकेदुखी, अंगदुखी, पडसे, खोकला, थोडा ताप, कुठल्याही भागातील वेदना या सर्वांवर अॅस्परीन वय, डोस, परिणाम याचा विचार न करता वापरले जाते. ते वापरणे शक्य असते कारण डॉक्टरांच्या चीठ्ठी शिवाय कुठेही ते मिळू शकते. औषधांच्या दुकानापासून ते पानाच्या दुकानांपर्यंत आणि स्पोर्टक्लबपासून ते हॉटेलपर्यंत कोणत्याही ठिकाणी अॅस्परीन मुबलक मिळते. या सवंगपणामुळेच चुकून भलते औषध घेतल्याने होणारे अमेरिकेतील १।५ अपघात अॅस्परीनमुळे होतात. या शिवाय पाचशेमध्ये एकाला तरी अॅस्परीनची अॅलर्जी असते. मग त्यांच्या अंगावर पुरळ उठणे, सूज येणे वा इतर प्रकार चालू होतात.

बहुतेक वेळा ए. पी. सी. चा उपयोग तात्पुरत्या स्वरूपाचा असतो. रोगाचे मूळ कारण तसेच रहाते. पण रोग्याला तात्पुरते बरे वाटते. सन्धिवाताच्या काही प्रकारावर मात्र अचूक औषध म्हणून त्याचा उपयोग होऊ शकतो.

अॅस्परीन घेताना म्हणूनच काही गोष्टी लक्षात ठेवाव्यात.

नेहमी भरल्या पोटावर घ्या. कारण रक्ताच्या उलटचा होण्याच्या नेहमीच्या कारणात ए. पी. सी. चे अतिरिक्त सेवन हे एक प्रमुख कारण आहे.

गरज संपताच बंद करा. फॅशन बनू देऊ नका.

स्वतःला अॅलर्जी नाही याची खात्री असू दे.

गोळ्या लहान मुलांच्या हातात सहज लागतील अशा ठेवू नका.

थोडक्यात डोके दुखीवर वापरायच्या औषधाने नसता त्रास होऊन नवी डोकेदुखी निर्माण होणार नाही याची काळजी घ्या.

पंडित वि. म. जोशी
ज्योतिष विशारद

# अंदाज

## १२ ते १८ सप्टेंबर १९७०

**मेष** : गेल्या महिन्यात आपल्या व्यवसायात प्रगती होण्याला सुरुवात झाली, पण या आठवड्यात त्याची प्रत्यक्ष फळे दिसतील. विशेषकरून साहित्यक्षेत्रातील लेखक–प्रकाशकांना याचा अनुभव येईल. ता. १६ ला रवी कन्येत जात आहे. आता सर्व कामे चांगले वळण घेऊ लागतील.

धंद्याकरता प्रवासयोग येईल. त्यात शारीरिक त्रास होईल. जरा जास्तच धावपळ होईल. धनलाभ चांगला होईल. सांसारिक सुख चांगले लाभेल. इष्टमित्रांचे आगमन होईल. भागिदारांकडून फायदा होईल. ता. १६ नंतर अनेक अडचणी नाहीशा होऊ लागतील. विद्याभ्यासात थोडे अपयश येण्याची शक्यता आहे. यांत्रिक व्यावसायिकांना हा अनुभव येईल.

स्वभावात हट्टीपणा वाढेल. राग अनावर होईल; पण त्यापासून नुकसान होणार नाही. अचानक धनलाभाचा योग ता. १६।१७ ला आहे. १८ तारखेला घराचे व्यवहार उलगडून घ्या. आता पुढील एक दोन आठवडे सर्व बाबतीत यशस्वी करणारे आहेत. सर्व आठवडाच प्रगतीपर आहे. गुरु-शुक्रांची पूर्ण कृपा आहे.

**वृषभ** : मोठे मोठे कारखानदार आतापर्यंत मालाचा उठाव नसल्यामुळे आर्थिक अडचणीत होते. त्यांना चालना मिळण्याची संधी येऊ लागली आहे. ता. १६ नंतर सरकारी अडचणीसुद्धा दूर होतील. विशेषत: औषधे, रंगसाहित्य, फॅन्सी कापडे याचा व्यापार करणारांवरील बंधने सुसह्य होतील. किंमती मर्यादेबाहेर कमी होणार नाहीत.

ही राशी इंडीकेट गटाची आहे. लग्नेश शुक्र सहाव्या घरात गुरूबरोबर आहे. सार्वजनिक कामात यश मिळेल. ता. १६ नंतर सरकारच्या अडचणी कमी होतील.

चंद्राचे भ्रमण ९।१०।११ या घरातून आहे ते अत्यंत यशदायी आहे. ता. १२ १३ ला कामाकरता प्रवासाचा योग आहे. त्यात हातून पराक्रम होईल. ४२ वयाच्या पुढील व्यक्तींना हा आठवडा सर्व बाबतीत आनंद देणारा आहे. १३ ते १६ ता खास जास्त यशस्वी आहेत. संततीकडून अपेक्षाभंग होईल. एखाद्या व्यवहारात आर्थिक हानी होण्याची दाट शक्यता आहे. जपून रहावे.

**मिथुन** : या आठवड्यात रवी ता. १६ ला बदलेपर्यंत व्यवसायात सरकारकडून अडचणी निर्माण केल्या जातील. भागीदारांकडून सहकार्य मिळणार नाही. धंद्यात नुकसान संभवते. धार्मिक संस्था चालविणाऱ्यांवर गंडांतर येईल. अनैतिक व्यवहाराना प्रोत्साहन मिळून त्यांची वाढ फार होईल.

भाऊबंदाच्या कामाकरता प्रवास घडेल. ता. १६ नंतर केलेल्या प्रयत्नांचे फल

मिळू लागण्याची दाट शक्यता आहे. संततीची प्रगती होईल. विद्याभ्यासात यश येईल. या राशीच्या वागणुकीत दुटप्पीपणा असतो. तशा वागणुकीचा फायदा या आठवड्यात उठविण्याचा योग येईल. वकिलीच्या व्यवसायातील व्यक्तींचे उखळ पांढरे होण्याची संधी चालून येईल.

चंद्राचे भ्रमण ८।९।१०।११ स्थानातून होत आहे. ते शुभफलदायी आहे. पहिले दोन दिवस धनयोग चांगला आहे. ता. १६ ला रवी कन्येत गेल्यानंतर सर्व कामे सुरळीत होण्याला सुरुवात होईल. घरात आनंददायक वातावरण निर्माण होईल. स्थावरासंबंधीचे प्रश्न सुलभ रीतीने उलगडतील. पंचमातील गुरु-शुक्र, भाग्यातील राहू सर्व आकांक्षा पूर्ण करण्याला मदत करीत राहतील. ता. १६ ते १८ यशस्वी काल.

**कर्क :** प्रतिष्ठा व पैसा याचा खडखडाट होईल. ता. १६ ला रवी कन्येत गेल्यावर थोडासा फरक पडेल. भागिदाराच्या तंत्राने चालणे भाग पडेल. घरात वडील माणसे विशेषत: आई किंवा वडील आजारी पडतील.

ता. १२।१३ ला घरात विवाहाबद्दल चर्चा सुरू होईल. मात्र तो ठरण्याला जरा वेळ लागणार आहे. भावंडांकडून व पत्नीच्या नातलगांकडून घर अगर स्थावर मालमत्ता विकत घेण्याला आर्थिक मदत होईल.

ता १६ नंतर सरकारी कामे हातावेगळी करणे सोपे पडेल. प्रवास घडेल. प्रवासात फायदा होईल. आर्थिक अडचणी नाहीशा होऊ लागतील. पूर्णतया नाहीशा होण्याला अजून दोन तीन आठवडे वेळ आहे. संततीला विद्येत यश मिळेल. इंजिनीअरींगच्या विद्यार्थ्यांना हा काल प्रगतीपर आहे. शुभ तारखा १६ ते १८.

**सिंह :** लग्नातील चतुर्ग्रही मानसिक त्रास देईल. व्यवहार व अध्यात्म दोन्ही बाजूंचे विचार सतावतील. नेहमी धडाडीने व निश्चयाने पाय उचलणारे तुम्ही या आठवड्यात प्रत्येक व्यवहारात धरसोडीची वागणूक कराल. तरी पण गुरु-शुक्रांच्या पूर्ण कृपेने तुम्हाला तुमच्या व्यवसायात यश:प्राप्ती खास होईल.

विद्येत यश येईल. साहित्यिकांच्या हातून चांगले लिखाण होईल. तुमचे उपदेशपर बोलणे कोणालाही आवडणार नाही. पैशाची अडचण जाणवेल. हमखास येणारी रक्कम हातात पडणार नाही.

चंद्राचे भ्रमण ६।७।८।९ या स्थानातून आहे. पत्नी व भागिदार सर्व बाजूंनी मदत करतील. शत्रूचा नायनाट होण्याचा प्रबल योग आहे. सरकारी कामात गतिमानता येईल. त्यात यश:प्राप्ती होईल. मनाचा तोल थोड्या थोडक्या कारणांवरून जाईल. शुभ ता. १२।१३ व १८.

**कन्या :** व्यवसायात मनासारखी प्रगती अजून झालेली नाही. बौद्धिक व्यवसायात नेहमीच पुढे असणारी ही राशी आहे. त्यात मनाजोगे योग येत नाहीत. अष्टमातील शनी अडचणी निर्माण करतो. एकच शुभ फल म्हणजे तो शत्रूचा नायनाट करतो. मित्रांकडून ता. १२।१३ ला काही महत्त्वाचे कामात, लेखन व्यवसायात चांगलीच मदत होईल.

संततीकडून उपद्रव दिला जाईल. ता. १४।१५ ला एखाद्या वाईट कामात साप-

डलेल्या मुलाबद्दल अगर सासुरवाडीच्या व्यक्तीबद्दल सरकारकडे कारवाई करणे भाग पडेल. त्यात फार तसदी झाल्यानंतर मुखरूप बाहेर पडता येईल. हातातील कामे लांबणीवर टाकणे सोयीचे आहे. कॉन्ट्रॅक्टर्स—त्यातल्यात्यात मिलिटरीशी संबंध असणाऱ्यांचे नुकसान संभवते.

चंद्राचे भ्रमण ५।६।७।८ या स्थानातून आहे. ते शुभाशुभ फलदायी आहे. शुभ तारखा १२ ते १५ व १८.

तूळ : आठवड्याची सुरुवातच व्यवसायात प्रगती होण्याची तयारी करीत आहे. ता. १२।१३ ला एकाद्या सरकारी दारू पुरविण्याच्या व्यावसायिकांना अनपेक्षित धनलाभ होणार आहे. सरकारी प्रिन्टिंगचे काम करणारांनाही बराच फायदा होईल. सर्व व्यवहार स्वतःच पार पाडावा लागेल. मित्र अगर नातलग मदत करणार नाहीत. ही इंडिकेटची राशी आहे राजकारणातील त्यांची जागा व प्रतिष्ठा कोणीही कमी करण्याचा प्रयत्न केला तरी कमी होणार नाही. यादृष्टीने ता. १८ ला कोणत्याही सार्वजनिक कामात संपूर्ण यश येईल. या आठवड्यात प्रत्येक कार्य सफल होईल.

या आटवड्यात चंद्राचे भ्रमण ४।५।६।७ अशा शुभ स्थानातून आहे. गृहसौख्य चांगले लाभेल. संततीचा उत्कर्ष होईल. मानमरातब वाढेल. अचानक धनलाभ होईल. सबंध आठवडा शुभ फलदायी आहे.

वृश्चिक : या राशीची माणसे केवळ स्वार्थाकडे पाहणारी असतात. त्यांना मान-अपमानाची परवा नसते. हा आठवडा त्यांच्या या वृत्तीला पूर्ण सहकार्य देणारा आहे. त्यांनी कोणतेही बरे—वाईट काम हातात घेतले तर त्यात सरकार नेहमी त्यांच्या पाठीशी उभे राहील. कोणत्याही नैतिक नियमांनी बांधले जाणार नाहीत. 'वैश्यांगनेव नृपनीति अनेक रूपा' हे त्यांचे ब्रीदवाक्य.

पहिले दोन चार दिवस व्यवसायाला फार चांगले आहेत. प्रवासात प्रगतीपर गोष्टी घडण्याचा योग आहे. मोठ्यामोठ्यांकडून ता १४।१५ ला आर्थिक मदत चांगलीच होईल. त्यामुळे धंदा चांगलाच प्रगतिपथावर जाईल.

चंद्राचे भ्रमण ३।४।५।६ या स्थानातून आहे. ते चांगलेच आहे. चंद्र भाग्येश आहे. सोमवार—मंगळवार घरात एकाद्या सार्वजनिक कार्यकर्त्यांचा मेळावा घडण्याचा जोरदार योग आहे. संततीचा भाग्योदय होईल. सरकारी नोकरीतील व्यक्तींना याचा अनुभव जास्त येईल. सर्व सप्ताहच आनंदवर्धक आहे.

धन : व्यवसायातील आजपर्यंतची कुचंबणा गेल्या एक दोन आठवड्यापासून कमी होऊ लागली आहे. हा आठवडा आर्थिकदृष्ट्या फलदायी जाईल. निदान धनोत्पादक काम भरपूर मिळेल. भाग्यातील चतुर्ग्रही व एकादशातील गुरु—शुक्र युती फारच चांगले मैत्रीचे योग घडवून आणतील. कदाचित विवाहाची मागणी होण्याचा शुभयोग येईल.

साहित्य, चित्रकला, नाट्यकला या क्षेत्रातील कलावंतांना सर्वबाजूंनी प्रगति-पथावर नेणार हा काळ आहे. मित्रांकडून व नातलगांकडून भरघोस मदत होईल.

थोडासा संततीकडून अनपेक्षित त्रास होईल. विद्याभ्यासाकडे दुर्लक्ष होईल. शनिवार-रविवार हातात अचानक पैसा पडेल. भाऊबंडांशी थोडा मतभेद होईल.

चंद्राचे भ्रमण २।३।४।५ या स्थानातून आहे ते चांगले आहे. सोमवार, मंगळवार इष्टमित्रांच्या गाठीभेटीत व व्यवसायाची जुळणी करण्यात जातील. ता. १६।१७ ला पाव्हणे येऊन घरात आनंदी आनंद भरून राहील. सर्व आठवडाच शुभ.

**मकर :** विवाहाची मागणी येण्याचा योग पहिले दोन दिवस शनिवार-रविवारी येईल. धंदा-व्यवसाय चांगला चालेल. दशमातील गुरु-शुक्र व चतुर्थातील शनी सुखवृद्धी करतील. प्रतिष्ठा वाढेल. पैशाचा तुटवडा जाणवेल. परंतु शेवटच्या घटकेला गुरूची दृष्टी धनस्थानावर आहे त्यामुळे ही अडचण दूर होईल.

साहित्यिक, लेखक, वृत्तपत्रकार, शिक्षण खात्यातील नोकर यांना सर्व आठवडाच चांगला आहे. नोकरीत प्रमोशन मिळेल. पत्नीकडून सर्व बाबतीत मदत होईल. मात्र सरकारी कामात अपयश येईल. मित्रांकडून फसवणूक केली जाईल.

चंद्राचे भ्रमण १।२।३।४ या स्थानातुन आहे ते वाईट नाही. ता. १४।१५।१८ तारखांना अनेक अडचणी निर्माण होतील. मनःस्वास्थ्य बिघडेल. शुभ तारखा १२।१६।१७.

**कुंभ :** व्यवसायात पहिले दोन चार दिवस अडचणी वाढतील. सरकारी कामे लांबणीवर टाकावी. भागीदार वाईट वागणूक करतील. १६ तारखेला रवी कन्येत जातो आहे तो वाईट नाही. त्यानंतर संततीकडून सहकार्य मिळून उद्योगधंद्याला चांगलीच चालना मिळेल.

विद्याभ्यासात अपयश. डोके नेहमी तापलेले राहील. घरांत भांडणतंटे होतील. फक्त एकच योग चांगला आहे. भाग्यातील गुरु-शुक्र अचानक धनलाभ देतील. त्यामुळे सांपत्तिक स्थिती सुधारेल.

चंद्राचे भ्रमण १२।१।२।३ या स्थानातून आहे ते मिश्रफलदायी आहे. शुभ तारखा १६ ते १८.

**मीन :** व्यवसाय आणि गृहसौख्य यात मनाविरुद्ध गोष्टी घडण्याचा संभव पहिले चार दिवस आहे. मित्रांकडून फसवणूक होईल. घरात वडील आजारी पडण्याचा संभव आहे. कांही केंद्रांचे व भाग्यस्थानचा अधिपती असे पाचही ग्रह अशुभ स्थानात आहेत.

एकच एक शुभ योग आहे. गुरू धनस्थान व चतुर्थस्थानाशी शुभ योग करतो आहे. तो शुक्राबरोबर आहे. धनलाभ लॉटरी सारख्या व्यवसायात होण्याचा जोरदार योग आहे. ता. १४।१५ व १८ ला हा योग जास्त आहे.

चंद्राचे भ्रमण ११।१२।१ या स्थानातून आहे. ते चांगले आहे. ता. १६ ला मातुल घराण्याकडून अगर सासुरवाडीकडून अपेक्षित पैशाची मदत होईल. अगदी विरुद्ध असणाऱ्या व्यक्तीकडून महत्त्वाच्या कामात मदत होईल. शुभ तारखा १६ ते १८.

◻ ◻ ◻

# रेशनिंगच्या रांगा....

पृष्ठ ७ वरून

करतात. त्यांच्याकडून योग्य ते सहकार्य सरकारला मिळत नाही अशी शासनाची तक्रार. ज्या प्रमाणात धान्याचा कोटा येतो त्या प्रमाणात त्याचं सर्वांसाठी योग्य रीतीनं वाटप करावं लागत असल्याने दरमहा वाटपासंबंधीचा निर्णय घ्यावा लागतो. त्याचप्रमाणे चांगलं वाईट जे येईल ते धान्य योग्य रीतीनं लोकांना द्यावं लागतं. त्यात आम्ही समतोलपणा राखण्याचा प्रयत्न करतो असं एका अधिकाऱ्यानं मला सांगितलं. सणासुदीला जास्त साखर, त्याचप्रमाणे चांगला गहू वा तांदूळ देण्याचा प्रयत्न सरकार नेहमीच करीत असतं. पण हे सर्व फूड कॉर्पोरेशनकडून येणाऱ्या कोट्यावर व धान्याच्या बरेवाईटपणावर अवलंबून असल्यानं सरकारपुढेही हा यक्षप्रश्न असतो असं सरकारचं म्हणणं.

'सरकारला यंत्रणेतील उणीवांची जाणीव आहे व त्या नाहीशा करण्याचा प्रयत्न केला जातो पण लोकांकडूनही हवं ते सहकार्य मिळत नाही. प्रत्येक दुकानात तक्रारीची नोंदवही असते. पण लोक त्यात तक्रारी लिहीतच नाहीत. कोणा दुकानदाराविरुद्ध काही तक्रारी असल्यास साक्षी द्यायला लोक तयार होत नाहीत. लोकांच्या तक्रारी रूपशा खऱ्या असतात व आम्ही त्यांची तात्काळ दखलही घेतो पण तक्रारी येणं जरूर असतं.' इति सरकारी अधिकारी.

बेकायदा तांदूळ आणणाऱ्या बायकांवर खटले भरले जातात पण तरीही त्या पुन्हा या उद्योगाकडे वळतातच असंही त्यांचं म्हणणं. धान्यातील घाणीसंबंधी त्यांचं म्हणणं असं की पंजाबातून गहू येतो. तेथे सरकारी निरीक्षक असतात. शिवाय येथे तो येताच गव्हाची तपासणी होते. गोडाऊनमध्येही तपासणी होते व दुकानांचीही तपासणी होते.

लोकांनी सहकार्य देणे आवश्यक आहे. त्यांची शिस्त व सहनशीलता वाखाणण्याजोगी आहे. पण त्यांनी आपल्या खाण्याच्या सवयीसुद्धा हळू हळू बदलणं आवश्यक आहे – सरकारी अधिकारी.

सरकारचा या प्रश्नासंबंधी महत्त्वाचा मुद्दा हा की आपली शेती पावसावर अवलंबून असते. त्यामुळे रेशनिंग उठवलं आणि पुन्हा एखादं वर्ष वाईट गेल्यास एवढी ही प्रचंड यंत्रणा तात्काळ उभारणं जड असतं. पण तरीही केंद्र सरकारने मुंबईच्या तांदूळ पुरवठ्याची हमी दिल्यास वा धान्य विभाग रद्द केल्यास मुंबईतील शिधावाटपावरील बंधने रद्द करता येतील, तोपर्यंत नाही.

– विजय वैद्य

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Biweekly) : 40 Paise : Regd. No. M–H 649




“एक मात्र निश्चित ! जुन्या आश्वासनांच्या बाबतीत सामान्य जनता अन् संस्थानिक यांच्यात सरकार कोणताही भेदभाव करीत नाही...”